
१ सप्टेंबर १९६५ : ३० पैसे

# माणूस





॥ श्री ॥

कळविण्यास आनंद वाटतो की

श्री. ब. मो. ऊर्फ बाबासाहेब पुरंदरेकृत

# राजा शिवछत्रपति

या दोन खंडांतील हजार पृष्ठांच्या ग्रंथाची 'तृतीय डी-लक्स आवृत्ती' अवघ्या तीनच महिन्यात निम्म्याहून अधिक संपली.

शंभर रुपयांची ठेव पाच वर्षांसाठी राजहंस प्रकाशन संस्थेकडे ठेवणाऱ्यास व्याजाच्या ऐवजी हा छत्तीस रुपये किमतीचा ग्रंथ घरपोच देण्याची खास योजना यापुढे २५ ऑक्टोबर १९६५ पर्यंतच चालू ठेवणे शक्य आहे.

प्रकाशक.

[ अधिक तपशील पान १६ वरील प्रकटनात पाहावा ]




वर्ष पाचवे : अंक सातवा : १ सप्टेंबर १९६५

संपादक : श्री. ग. माजगावकर

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २.    दूरध्वनी : ५७३५९

या अंकात श्री. ब. मो. पुरंदरे यांच्या पावनखिंडयात्रेचा उत्तरार्ध प्रसिद्ध होणार होता, पण त्याऐवजी श्री. वसंतराव पवार यांच्याविषयीचा एक लेख प्रयत्नपूर्वक मिळवून दिला आहे. कालदृष्टचा श्री. पवार यांच्यासंबंधीचा हा लेख याच अंकात जाणे उचित होते. वाचकांनी श्री. पुरंदरे यांच्या लेखाची पुढील अंकापर्यंत वाट पाहावी अशी नम्र विनंती.

पण या अंकाचा घाट एकूण बरा जमलेला दिसतो. विनोद कुलकर्णी यांच्या 'वर्षे'च्या काव्यधारात रसिकांची अंगप्रत्यंगे भिजविण्याचे सामर्थ्य आहे. लीला श्रीवास्तव यांचीही कथा वेगळी आहे, चांगली आहे. 'माणूस'मधील त्यांच्या मागील एका कथेसंबंधी वाचकांची प्रतिक्रिया जरा टीकेची आल्याने मुद्दाम हे सांगणे आले.

'नाझी भस्मासुराचा' भला मोठा हप्ता आहेच.

'गारंबीचा बापू'—दोन प्रतिक्रिया नमूद केल्या आहेत.

शिवाय एका उदयोन्मुख विनोदी चित्रकाराचे सामाजिक परिस्थितीवरचे मार्मिक व्यंगचित्र देऊन 'माणूस' एका नव्याच दालनात प्रवेश करीत आहे.

मुखपृष्ठासंबंधी : गेल्या १ सप्टेंबरला 'माणूस'चे मासिकातून पाक्षिकात रूपांतर झाले. या पाक्षिकाच्या पहिल्या अंकावर ओंकारगजाननाचे चित्र देऊन 'माणूस'ने सश्रद्ध अंतःकरणाने पाक्षिकाचे प्रस्थान ठेवले. या अंकावर तेच चित्र देऊन 'माणूस' पाक्षिकाच्या वर्षदिनाचे स्मरण करीत आहे. शिवाय अनेकांना हे चित्र संग्राह्य वाटण्याचीही शक्यता आहे. चित्राचे चित्रकार आहेत—श्री. ब. मो. पुरंदरे यांचे पूज्य वडील—कै. **मोरो बळवंत पुरंदरे.**

—संपादक

★

## किंमत तीस पैसे : वार्षिक वर्गणी आठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# दिल्ली दरबार

**या खेपेस आला नाही. बहुधा पोस्टखात्याचा विलंब असावा.**

पण तो काय असेल याची कल्पना सहज करता येते. कारण दिल्ली दणाणून सोडणारी एकच घटना या पंधरवड्यात घडली. ती म्हणजे जनसंघाचा प्रचंड मोर्चा.

या मोर्च्याच्या प्रचंडपणाविषयी मात्र गमतीदार मतभेद आहेत. मेननगटाच्या 'पेट्रियट' या वर्तमानपत्राने मोर्च्याचा आकडा ८० हजार दिला आहे, तर लंडनच्या बी. बी. सी. ने दिलेली मोर्च्याची संख्या '५ लाखांपेक्षा अधिक' आहे. दोन ते तीन लाख हा सर्वमान्य अंदाज दिसतो. 'असा मोर्चा पूर्वी झाला नाही,' याविषयी मात्र दुमत नाही. दिल्लीचे 'स्टेट्समन' पत्र लिहिते–

"By far the biggest ever witnessed in the capital so far."

मोर्च्यातील काही घोषणा : 'भीख की रोटी कायर (भित्रे) राज, कैसे माने इसे स्वराज' (हिंदी), 'Shastri, You cannot beg peace, you have to win it' (इंग्रजी), 'कच्छ नु दान, राष्ट्रनु अपमान' (गुजराथी), 'देशम् विट्टी कुडुप्पाना–भारतम् निगड तखाडे' (तुकड्या तुकड्यांनी द्यायला भारत काय तुमची खासगी मालमत्ता आहे?) (मल्याळम्)......आणि इतरही अशाच पुष्कळ घोषणा–एकात्म भारताचे आणि प्रखर राष्ट्रभक्तीचे दर्शन घडविणाऱ्या.


कम्युनिस्ट पक्ष सोडून इतर विरोधी पक्षनेत्यांनी मोर्च्याचे स्वागत तर केलेच; पण काही कॉंग्रेसी खासदारही यात सामील झाले, हे या मोर्च्याचे एक खास वैशिष्टच.

या मोर्च्याला राजकीय महत्त्व तर उघड आहेच. देशातील कच्छकराराविरोधी वातावरणाची तीव्रता त्यामुळे राज्यकर्त्यांच्या ध्यानी येईल व हा अपमानास्पद करार त्यांना लवकरच रद्द करावा लागेल. पण मोर्च्याचे सामाजिक महत्त्व अधिक डोळ्यांत भरणारे आहे. चार-पाच लाखांच्या समुदायाचे नियंत्रण, व्यवस्थापन व शिस्तबद्ध संचलन ही आपली मान उंच व्हावी अशी एक घटना आहे. मुंबईला भरलेल्या युकॅरिस्ट कॉंग्रेसच्या शिस्तबद्ध व्यवस्थापनावर वर्तमानपत्रांनी स्तुतीचे रकानेच्या रकाने भरले. तोंड फाटेपर्यंत केलेली ही स्तुती म्हणजे 'हे आम्हाला कधीच जमणार नाही,' अशी नामुष्कीने दिलेली एकप्रकारची मनोमन कबुलीच होती; पण या मोर्च्याने हे दाखवून दिले, की आम्हालाही संघटना व शिस्त अशक्य नाही. शिवाय एक महत्त्वाचा फरक– युकॅरिस्ट कॉंग्रेसच्या सेवेसाठी दिल्ली आणि मुंबई सरकार हात जोडून उभी होती. येथे सरकारचा संपूर्ण असहकार. मध्यप्रदेशातील एका कॉंग्रेसी खासदाराने केलेले यावरील भाष्य मार्मिक आहे. ते म्हणाले,




" हा मोर्चा म्हणजे एक आश्वासन आहे. सुमारे दोन लाखांची ही शिस्तबद्ध व प्रचंड मिरवणूक पाहून असे वाटले, की देशातील अंतर्गत परिस्थिती काबूत ठेवून शांतता निर्माण करू शकणारी ही नागरी शक्ती (Civil Force) आहे."

या मोर्च्यासाठी पुण्याच्या जवळील तळेगावदाभाड्याहून एक कलापथक गेले होते. या कलापथकाने सादर केलेला पोवाड्याचा कार्यक्रम मोर्च्यात फार गाजला म्हणे. लंडनच्या बी. बी. सी. ने या कार्यक्रमाचे चित्रण केले आहे. —सं.



प्रदर्शनाचा प्रेक्षकवर्ग

# पूना कॅन प्रिंट

## एक वैशिष्टयपूर्ण समारंभ

व्यावसायिक संघटना आपल्या कार्यक्षेत्रात निरनिराळे समारंभ नेहमीच घडवून आणीत असतात. व्यवसायापुढील अडचणींचा विचार करण्यासाठी भरलेल्या संमेलनांचे वृत्तान्त वाचकांच्या डोळयांसमोर अनेकदा येत असतात. परंतु पुण्यातील मुद्रण–व्यवसायाच्या संघटनेने एक नवा उपक्रम केला आणि त्याबद्दल दि पूना प्रेस असोसिएशनच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन करावयास हवे.

मुद्रकांनी आपल्या ग्राहकांना आग्रहाने आमंत्रिले. पुण्याच्या परिसरातील दीडशे-पावणेदोनशे मुद्रक-ग्राहक आवर्जून आले आणि पुण्यात काय काय छापले जाऊ शकते, याचे प्रदर्शन ' पूना कॅन प्रिंट ' या नावाने भरविलेले पाहून गेले. हे घडले जुलैच्या ४ तारखेला. कारखानदार आणि त्यांचे ग्राहक एकत्र येण्याचा हा पहिलाच समारंभ महाराष्ट्रात असावा असे वाटते. अखिल भारतीय मुद्रक संघटनेचे नवे अध्यक्ष श्री. नोमन कॉन्ट्रॅक्टर मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते आणि पद्मभूषण श्री. शंतनुराव किर्लोस्कर हे फेडरेशन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्स अँण्ड इण्डस्ट्रीज या अखिल भारतीय उद्योगपतींच्या संघटनेचे अध्यक्ष प्रदर्शनाचे उद्घाटक म्हणून उपस्थित होते.



निमंत्रितांच्या उपस्थितीत...

## यांनाही आवडावे असे मुद्रण आता पुण्यात होऊ शकते

*

मुद्रकांना कामे हवीत, कामे कमी पडतात, चांगल्या दराने कामे मिळावीत असली व्यावसायिक दुखणी मांडण्यासाठी हा समारंभाचा खटाटोप नव्हता. पुण्याचा परिसर आता मोठमोठ्या कारखानदारांनी व्यापलेला आहे. केवळ शैक्षणिक आणि सांस्कृतिक महत्त्व असलेल्या या पुणे शहराचा चेहरामोहरा बदलला जात असून, तो झपाट्याने औद्योगिक तेजस्विता धारण करू लागला आहे. येथे येणाऱ्या नवनवीन कारखान्यांना लागणारे मुद्रणकाम मुंबई–कलकत्ता–मद्रास येथील मुद्रणकामाप्रमाणे उच्च दर्जाचे हवे असेल तर येथील मुद्रकांपुढे कोणत्या अडचणी निर्माण झालेल्या आहेत, याची जाणीव उद्योगपतींना करून देणे आणि त्यांच्या मनातील पुण्यातील मुद्रणव्यवसायाबद्दलच्या गैरसमजाचे व आशंकांचे निराकरण करणे, हा मुख्य हेतू या समारंभामागचा होता. मुद्रणव्यवसायास जे महत्त्व आहे, ते सरकार पूर्णपणे ओळखत नाही आणि त्यामुळे उत्तम यंत्रसामग्री आणण्यासाठी आयातपरवाने मुद्रकांना मिळत नाहीत, ही मुद्रकांची तक्रार रास्त वाटते. त्याचप्रमाणे संरक्षण-खात्यातील मुद्रणालय विभागांना मात्र गरज नसलेले आयातपरवाने दिले जातात, हा मामलाही अजब म्हणावयाचा. मुद्रण–कामगारांना तंत्रशिक्षण देण्याबाबत



डॉ. हृदयनाथ कुंझरू यांची प्रदर्शनाला भेट

*

सरकार अतिशय उदासीन होते आणि अखिल भारतासाठी फक्त चार मुद्रणशाळा चालवून ही उदासीनता झटकल्याचा आभास सरकार करीत आहे,- ही गोष्ट योग्य नाही, असेच कोणीही म्हणेल. मुद्रकांपुढे या व अशा ज्या काही समस्या आहेत, त्या ग्राहकांपुढे नीटपणे या समारंभात मांडल्या गेल्या; हा समारंभाचा मोठाच फायदा झाला आहे.

या समारंभाचे निमित्ताने 'पूना कॅन प्रिंट' हे मुद्रणकामाचे प्रदर्शन ६ जुलै ते ९ जुलै या मुदतीत खुले ठेवले होते. सुमारे दोन हजार प्रेक्षक येऊन प्रदर्शन पाहून गेले असे समजते. गेल्या दहा-पंधरा वर्षांत पुण्यातील मुद्रणालये खूपच चांगले काम करू लागली आहेत, असे हे प्रदर्शन पाहणाऱ्या जाणकारांस वाटल्यावाचून राहिले नसेल. सर्वसामान्य नागरिकाचा मुद्रितवस्तूंशी हरघडी संबंध येत असल्यामुळे तोही उत्तम मुद्रणभोक्ता होऊ लागला आहे, असे म्हणावयास हरकत नाही. मुद्रणाचा ग्राहक हा रसिक असला तरी तंत्रविषयक ज्ञान त्यास असणार नाही; परंतु चांगले काय आणि वाईट काय यातला फरक तो चांगले डोळ्यांसमोर आल्याशिवाय जाणू



डॉ. कुंझरूंसमवेत

[ डावीकडून ] श्री. वसंतराव देवकुळे, श्री. कडुस्कर, श्री. भिडे, श्री. अनंतराव कुलकर्णी, डॉ. कुंझरू, श्री. पमासाहेब पटवर्धन, श्री. दादासाहेब जोशी व श्री. सोनार

★

शकणार नाही. यासाठी पुण्यातील मुद्रणसंघटनेने अशी प्रदर्शने प्रतिवर्षी भरवावीत. त्या त्या वर्षात प्रत्येक मुद्रणालयाने छापलेले उत्तम व्यावसायिक काम या प्रदर्शनात ठेवले जावे. चांगले काम ग्राहकाचे डोळ्यांसमोर आले तर तसे काम देण्याविषयी तो आपल्या परिचित मुद्रकास आग्रह करील आणि ग्राहकाच्या चोखंदळपणाने का होईना, मुद्रणकामाचा दर्जा सुधारत जाईल, असे वाटते. 'पूना कॅन प्रिंट'सारखी प्रदर्शने फक्त एकदाच भरवून हा हेतू साध्य होणार नाही. ग्राहकांची आवड बनविणे, त्याच्या मनात मुद्रितवस्तूंविषयी आकर्षण निर्माण करणे आणि त्यास सौंदर्यदृष्टी प्राप्त करून देणे हे कार्य मुद्रणव्यावसायिकांच्या संघटनांनीच केले पाहिजे. अशा सांघिक प्रयत्नांचा उपयोग कोणा एकट्यादुकट्यास होणार नसून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे तो सर्वांनाच होऊ शकेल, हा उदार दृष्टिकोन व्यावसायिकांनी बाळगला पाहिजे. या समारंभाचा हा संदेश प्रत्येक मुद्रकापर्यंत जाऊन पोचला असेल, तर या समारंभाचा हेतू पुष्कळ अंशी सफल झाला, असे म्हणावयास हरकत नाही.

आमच्या प्रतिनिधीकडून

चटकदार नाही,
पण काळजाला चटका लावणारी
ही आहे एका कलंदर कलावंताची
दर्दभरी कहाणी.

# गम से अब घबराना कैसा

वसंत पवार म्हणजे 'मुलखावेगळा माणूस!' या माणसाच्या बहुरंगी, बहुढंगी व्यक्तिमत्त्वाविषयी लिहावे तेवढे थोडे! या कलंदर कलावंताचे व्यक्तित्वच मुळी आगळे नि वेगळे होते. वरवर पाहणाराला बावळट वाटणाऱ्या वसंतरावांच्या 'अंतरी' किती नाना कळा होत्या; हे सांगूनसुद्धा खरे वाटणार नाही!

नारदाचा संचार जसा त्रिभुवनात, तसाच वसंतरावांचा संचार सर्वत्र असायचा. त्यांच्या संचाराला काळाची, स्थळाची आणि वेळेची मर्यादा नव्हती. सकाळी उठल्या-पासून त्यांची पदयात्रा सुरू व्हायची; ती रात्री सर्व गात्रं गलित होऊन आपण होऊन जमिनीला पाठ टेकेपर्यंत अखंड चालूच असे. वसंतरावांच्या पायाला जर एखादे मायलो-मीटर बसविले असते, तर त्यात हजारो मैलांचा आकडा मीटरने दाखविला असता!

कपड्याच्या बाबतीतही वसंतराव नेहमीच बेफिकीर असत. पांढरा शर्ट, फार पूर्वी शिवलेली एकच वुलनची ॅट आणि पायांत चपला हा त्यांचा नेहमीचा पेहराव. या थाटात मित्रांच्या घोळक्यात 'काव्य–शास्त्र–विनोदाचा' फवारा उडवीत ते चाललेले असायचे. एकटं–दुकटं असणे हे वसंतरावांच्या हिशेबी कधीच नव्हते. फक्त जन्माला येताना आणि जातानाच काय ते एकटे आले आणि गेले. रस्त्याने सरळ जाणे तर त्यांना कधी ठाऊकच नव्हते. शनिवारवाड्यासमोरील गारुड्याचा खेळ बघ, तर शनिवारी सुटी असल्याने मंडईत चाललेला पवाडा, वग अथवा एखाद्या भिकाऱ्याचे गाणे ऐक. लक्ष्मीरोडवरील पादपथावर ठिकठिकाणी असलेली मराठी,

लेखक :



माणूस

चित्रपट क्षेत्रात
उभी हयात घालवून
मागे साधा फोटोही न ठेवणारे
संगीत दिग्दर्शक कै. श्री. वसंतराव पवार

# गम सौ बार मिले ! !

इंग्रजी पुस्तके, मासिके चाळ–हे त्यांचे धंदे आणि मग अशातच कुणी चिरपरिचित भेटला, की वसंतरावांची टकळी सुरू होई. नानाविध गोष्टींवर ते 'बातचीत' करीत. प्रत्येक वाक्याची सुरवात ते 'भिडू' या शब्दाने करीत. त्यांचा स्वभाव मुळातच गोष्टीवेल्हाळ होता. पंचतंत्र, इसापनीती, गुलबकावली, तोता–मैना, पुराणे, छंद, कटाव, लावण्या, पवाडे, लोकगीते यांचा 'अजब खजाना' त्यांच्या संग्रही होता. शेर, शायरी, गझली, ठुमऱ्या यांचा तर ते पाऊस पाडीत ! विलक्षण स्मरण-शक्ती हा त्यांचा विशेष गुण होता. त्यांच्याशी बोलताना त्याचा वारंवार प्रत्यय येई. अतिरेक आणि अतिशयोक्ती या दोनही गोष्टी वसंतरावांना जास्त प्रिय होत्या. यापैकी अतिरेक दैनंदिन वागण्यात व अतिशयोक्ती बोलण्यात व्यक्त होई. आणि इतके असूनही वसंतराव चारचौघांत अप्रिय कधीच झाले नाहीत, याचं कारण निष्कपटी स्वभाव. आत एक, बाहेर एक असे कधीच नव्हते.

**जादूसाठी इंग्रजी शिकले**

वसंतराव शाळेत कधीच गेले नव्हते. तथापि त्यांना इंग्रजी भाषा उत्तमपणाने लिहिता वाचता येई. ते कसे ? पण केवळ जादूच्या छंदापायी ते इंग्रजी शिकले, हे सांगूनही खरे वाटणार नाही. जादूविद्येवरील उत्तमोत्तम ग्रंथ इंग्रजीत असल्याने त्यांनी इंग्रजीचा सराव केला. नवीन नवीन जादूचे प्रयोग बसवून मी मी म्हणणाऱ्या जादूगारांनाही त्यांनी थक्क करून टाकले ! जादूच्या परिश्रमपूर्वक केलेल्या अभ्या-साने त्यांना या क्षेत्रात एक अधिकारही प्राप्त झालेला होता. महाराष्ट्रातील विद्य-

**श्री. गजानन अनवलीकर**

मान जादूगारांपैकी अनेकांनी वसंतरावांच्याकडून जादूचे 'अवघड घडे' घेतले होते. जादू विषयावरील मौल्यवान व दुर्मिळ ग्रंथ खरीदण्याचा वसंतरावांना विलक्षण छंद होता, पण त्यांचे 'तंत्र आणि मंत्र' ज्यांना माहिती होते, अशा काही जादूगारांनी आपले स्वतःचे तंत्रमंत्र वापरून वसंतरावांची ही पुस्तके हातोहात लांबविली !

वसंतराव अतिशय छांदिष्ट होते. एकदा एखादी गोष्ट करायची ठरवली, की ते ती केल्याशिवाय राहात नसत--मग ती वाईट असो वा चांगली असो !

एकदा वसंतरावांनी काचेवर लिहिलेली अक्षरे उलट दिशेने प्रतिबिंबित झालेली पाहिली आणि साहजिकच त्यांच्या मनात कल्पना चमकून गेली, की पारदर्शक काचेत जशी उलट अक्षरे दिसतात, तशी आपण लिहिली तर ? आणि मनात विचार आल्याबरोबर तो कृतीत आणला नाही तर ते वसंतराव कुठले ? तावड-तोब त्यांनी उलटे लिहिण्याचा सराव केला. काही दिवसांतच ते असा उलटा मजकूर तीनतीन चारचार पाने लिहू लागले, एवढेच नव्हे तर वाचूही लागले.

एखाद्या गोष्टीचे वेड घेतले, की ते पुरे करायचे असा त्यांचा खाक्या होता. नृत्याच्या बाबतीतही असेच. ते स्वतः तर नृत्य शिकलेच, पण चित्रपटांतही त्यांनी नृत्य-दिग्दर्शन केले. 'पुढचं पाऊल' चित्रपटाचे या संदर्भात उदाहरण सांगता येईल.

## कवी येडगूळकर

नवीन नवीन शब्द संकेताने रूढ करण्याचा त्यांना विलक्षण छंद होता. 'भिडू' हा शब्द त्यांनी मित्र या नात्याने खूपच प्रसिद्धीस आणला. एखाद्या व्यक्तीसंबंधीं तिरस्काराने बोलावयाचे असेल, तर ते त्यास 'येडगूळकर' म्हणत. त्याचीही कथा गमतीदार आहे. एकदा काय झाले, की एका नवोदित कवीला घेऊन मी वसंतरावां-कडे गेलो. आपल्या कविता चित्रपटात याव्यात, अशी त्याची मनापासूनची इच्छा होती. स्वतःच्या काव्याविषयी तो अफाट बोलत होता. वसंतरावांनी ते सर्व शांत-पणाने ऐकून घेतले. शेवटी या कवीची गाडी घसरली माडगूळकरांवर. माडगूळ-करांच्या काव्यावर त्याने सडकून टीका करण्यास प्रारंभ केला. वसंतरावांचे माड-गूळकर हे आवडते कवी. शेवटी वसंतराव त्रासून म्हणाले, "तुम्हाला जर कुठे चान्स असला तर कळवतो."

कवी गेल्यावर मी विचारले, की कसे काय काव्य वाटले त्याचे ?

"अहो, कुठे माडगूळकर आणि कुठं हा. तो महाकवी आणि हा- हा तर येडगूळकर- अगदी 'येडा' !"

त्यांच्या हप्ता या शब्दानेही असाच गमतीदार प्रसंग निर्माण झाला. आमचे एक विमा-व्यवसायी मित्र वसंतरावांकडे गेले आणि त्यांनी विमा उतरविण्यासंबंधी वसंतरावांना विनंती केली, गळ घातली. गृहस्थ शेवटी खूपच गळचात पडला. वाट-ल्यास पहिला हप्ता मी भरतो, नंतरचे तुम्ही 'भरा,' असे तो म्हणाला.

वसंतराव थोडेसे हसले आणि म्हणाले, " महाराज, हल्ली रोजच्याच हप्त्याची पंचाईत झालीय् आमची, त्यात विम्याच्या हप्त्याची भर कशाला ? "

रोजचा हप्ता म्हटल्यावर विमा– व्यावसायिक चांगलाच गोंधळला. वसंतरावांच्या लक्षात येताच त्यांनी ' हप्ता ' म्हणजे काय हे स्पष्टीकरण केलं.

वसंतराव पट्टीचे पिणारे होते. पाण्यापेक्षाही ते दारू आणि तीही हातभट्टीचीच पीत. त्यालाही मर्यादा नव्हती. उमरखय्यामनंतर ' इतका ' पिणारा प्राणी म्हणजे वसंतराव पवारच !

**' एकच प्याला 'त संपलेला कलावंत**

वसंतरावांचे आयुष्य जवळजवळ संपुष्टात आले, ते दारूच्या व्यसनापायी ! पण केवळ ' व्यसनी ' म्हणून त्यांच्यावर शिक्का मारणे, हे एकतर्फी होईल. व्यसनी पवार हीच बाजू अनेकांनी बुद्धिपुरस्सर पुढे केली. गुणांची, कर्तृत्वाची बाजू सदैव अंधारातच राहिली आणि त्यामुळेच त्यांच्या कर्तृत्वाचे योग्य ते मूल्यमापन त्यांच्या हयातीत कधीच झाले नाही. ' वाचन आणि दारू ' या दोन्ही गोष्टी एकाच वेळी ते करीत. वाचनाचे इतके जबरदस्त व्यसन होते, की दारू घेतली असली तरीही ते वाचन थांबवीत नसत ! घेतल्यानंतर वसंतरावांच्या सहस्रविषयस्पर्शी जिव्हेला पाय फुटत. वाचनाने व अनुभवाने विचारांना एक प्रकारची प्रगल्भता आलेली

**रंग बसंती**

यात्रेनिमित्त आमच्याकडे काही वारकरीपंथाचे लोक उतरले होते. वसंतरावांचे आमच्याकडे नेहमीच जाणे–येणे जास्त. या सर्व मंडळींना वसंतरावांचा परिचय करून दिला, चहापाणी झाले आणि वसंतरावांनी पानाचा ' बार ' भरला. वारकरीमंडळींनाही त्यांनी पानाचा आग्रह केला, पण त्या दिवशी एकादशी होती. वारकरी पान खाईनात. त्यावर वसंतराव म्हणाले,

' अहो, ज्या तोंडाने हरिनाम घ्यायचं, ते तोंड रंगलं नाही, तर हरिनाम घेताना भजनात रंगाल कसे ?' मंडळी मनमुराद हसली.

त्यानंतर वसंतरावांनी एक झकास अभंग म्हटला—

हाती नाही बळ दारी नाही आड
त्याने फुलझाड लावू नये
नाम संकीर्तना गवसेना वेळ
त्याने गळा माळ घालू नये

होती. तशातच ते 'एकपाठी' असल्याने जे जे काही चांगले वाचलेले असेल, त्याला आपल्या पदरचा मालमसाला घालून ते अधिक रंजक करीत. संगीत तर त्यांचा प्राण होता. 'घेऊन' मगच ते गायला बसत. अशा मैफली पहाटे पहाटेपर्यंत चालत विषयांची त्यांना कधीच उणीव भासत नसे. मैफिलीत विविधता, वैचित्र्य यांची रेलचेल असे.

मध्यंतरी वसंतरावांची प्रकृती फारच बिघडली. त्यांचा धीर पार सुटला. आम्ही काही मित्र म्हणालो, "वसंतराव, काळजी करू नका. नवे नवे संशोधन झाले आहे. औषधेही नवी निघालीत. बहुतेक सर्व रोगांवर उपाय आहेत. नाहीतर शस्त्रक्रिया करू–"

त्यावर वसंतराव म्हणाले, "अहो अंगात रक्त असले तरच ऑपरेशन करतात. माझं ऑपरेशन केलं, तर रक्ताऐवजी दारूच बाहेर पडेल."

वसंतरावांना गंभीरपणा कसला तो ठाऊकच नव्हता आणि उपदेश तर मुळीच आवडत नसे. एकदा आमच्या मित्राने वसंतरावांना दारूबद्दल थोडा उपदेश केला. दारू हे वाईट व्यसन आहे वगैरे वगैरे. वसंतराव म्हणाले, "काहो ! तुम्ही कधी घेऊन पाहिलीत का ? – नाही ना. मग ज्या गोष्टीचा आपण कधी अनुभव घेतलेला नाही, त्यावर उगाच भाष्य का करता ? मेल्याखेरीज जसा स्वर्ग दिसत नाही, तसे 'घेतल्या' खेरीज गंमत कळणार नाही."

दारूच्या व्यसनापायी वसंतराव प्रसंगी दाढीच्या दोन आण्यांच्या ब्लेडला महाग होत. रस्त्यात भेटले की म्हणायचे, 'भिडू, चार आणे द्या. दाढी आणि चहा होईल.'

त्यांची ही गरज अनेकांचा फायदा ठरला. वसंतरावांच्या या छोटया गरजेसाठी अनेकांनी त्यांना बनविले. रुपयाची दारू पाजून हजारो रुपयांची कामे करून घेतली.

वसंतरावांना देणी अनेकांची असत. अनेक चित्रपटांच्या रौप्यमहोत्सवानिमित्त मिळणाऱ्या मौल्यवान वस्तू या कर्जापायीच गेल्या. 'पुढचं पाऊलं' या चित्रपटातील नृत्ये त्यांनी अतिशय सुंदर बसविली होती. त्याबद्दल अभिनेत्री हंसा वाडकर यांनी वसंतरावांना एक सुंदरसे घड्याळ भेट म्हणून दिले होते, पण तेही त्यांना विकावे लागले– अगदी स्वस्तात. नुकत्याच रौप्यमहोत्सव झालेल्या चित्राबद्दल एक 'स्मृतिचिन्ह' मिळाले होते. त्याचीही हीच स्थिती.

मौल्यवान वस्तू मिळाल्यानंतर कमी वेळात नाहीशा होत. वसंतरावांच्या या मूल्यवान वस्तू कवडीमोलाने खरेदी करण्यास 'सावकार मंडळी' अशा प्रसंगी न चुकता हजर राहात. हे झाले भेट मिळालेल्या वस्तूंच्याबाबत, पण त्यांनी गिटारी, सतारी, वाजाच्या पेट्या, सायकली व इतर वस्तू अनेकवेळा खरेदी केल्या आणि तशाच विकूनही टाकल्या. अगदी अल्प किंमतीला !

त्यांची मोजदाद करायची म्हटले, तर या वस्तूंचे त्यांना एक दुकानही थाटता आले असते !

## काळजाला भिडलेली जखम

गेल्या महिन्या–दोन महिन्यांपासून वसंतराव अतिशय उदास असत. मिरजला उपचारासाठी राहिले होते, पण ते नावालाच. नेहमी, कोल्हापूर, पुणे आणि मुंबई अशी त्यांची त्रिस्थळी यात्रा असायची. मित्रांच्या सांगण्यावरून पिण्याचेही थोडे कमी केले होते.

कधी कधी ते अंतर्मुख होत. विचार करीत. जवळजवळ शंभरहून अधिक चित्रपटांना यशस्वीपणाने संगीत दिले, विक्रम केले, रौप्यमहोत्सव झाले, पण समाजाने आपणास मानाने वागविले नाही, त्याची त्यांना खंत वाटत असे. लोक केवळ व्यसनाकडे बघतात–कलेकडे कोण पाहतो ? असे ते म्हणत.

आणखी एका गोष्टीचे त्यांना नेहमी वैषम्य वाटे. (आणि ते बोलूनही दाखवीत.) ज्यांना मित्र म्हणून जवळ केले, आपले मानले, त्याच व्यक्ती तुच्छतेने आपल्याशी वागतात, अपमानास्पद बोलतात, याचे वाईट वाटे. ते म्हणत, " भिडू, आपण एकदा मित्र मानला म्हणजे मानला. " आणि हेही खरे होते. एका नामवंत दिग्दर्शक–निर्मात्याला त्यांनी मित्र मानले. रात्री–बेरात्री केव्हाही ते बोलावीत. वसंतरावांनी कधीही तक्रार केली नाही. प्रसंगी कोऱ्या व्हाउचरवर सह्याही केल्या. या दिग्दर्शकाला पुढे आणण्यात, त्याच्या चित्रपटाला नावलौकिक मिळवून देण्यात

### एक्स्ट्रा वसंतराव

अलीकडे अनंत माने यांच्या चित्रपटांतून 'गर्दीच्या दृश्यांतून' वसंतराव अनेकवेळा पडद्यावर आलेले आहेत, पण त्यापूर्वीसुद्धा अनेकवेळा ते पडद्यावर आलेले आहेत. धर्माधिकारींच्या 'महात्मा' चित्रपटात 'याचिसाठी होता केला अट्टाहास, शेवटचा दिवस गोड व्हावा' हे गाणे एकतारीवर वसंतरावांनीच म्हटले आहे. सुधीर फडके यांच्या 'वंशाचा दिवा' चित्रपटात 'रंगू बाजारला जाते, हो जाऊ द्या !' या नृत्यगीताच्या वेळी डोकीला फेल्ट हॅट, अंगात कोट, नेकटाय व खाली धोतर व बूट अशा धेडगुजरी पोशाखात नाचून अगदी धमाल करणारे वसंतरावच आहेत. त्यांचा चित्रपटसृष्टीत संगीत विभागात प्रवेश होण्यापूर्वी वसंतराव प्रथमच पडद्यावरच चमकले शालिमार कंपनीच्या 'पृथ्वीराज–संयुक्ता' या चित्रपटात. संयुक्तेच्या सतार वाजविणाऱ्या दासीची भूमिका त्यांनी केली.

बराचसा वाटा संगीत-दिग्दर्शक या नात्याने वसंतरावांचा होता, पण हीच मंडळी वसंतरावांच्या व्यसनाचा गैरफायदा घेऊ लागली. त्यांचा अनेकदा अपमानही करण्यात आला.

"ही जखम फार मोठी वाटते," असे ते सांगत.

या सर्व गोष्टी विसरूनही वसंतराव पुन्हा याच तथाकथित मित्रांकडे जात. दिलाचा साफ, मनाचा निर्मळ व प्रेमळ स्वभावाचा, असा हा माणूस पुन्हा अवमानाचे शल्य हृदयी घेऊन येई. आणि ते विसरण्यासाठी पुन्हा मद्याचा पेला.

नुकताच त्यांच्या एका चित्रपटाचा रौप्यमहोत्सव झाला. या चित्रपटात जर वसंतरावांचे संगीत नसते, तर काय झाले असते ? हा प्रश्न न विचारणे हेच बरे. 'सांगत्ये ऐका' या चित्रपटानंतर हाही चित्रपट विक्रम निर्माण करील असे वाटते. असे असताना आपणासही समारंभास बोलवावे, कोपऱ्यातली का होईना पण मानाची खुर्ची मिळावी, आनंदात सहभागी व्हावे, अशी इच्छा होती. पण दुर्दैव असे, की वसंतरावांना हा मान मिळू शकला नाही. साधे 'प्रीमियर'चे बोलवणेही नव्हते, असे तेच सांगत.

'मल्हारी मार्तंड'चे नऊ गाण्यांचे दोन दिवसांत विक्रमी ध्वनिमुद्रण होण्यापूर्वी ते पुण्यास आले होते. एका निर्मात्याकडे त्यांनी हा अपमानाचा असह्य झालेला भार हलका केला. त्या रात्री वसंतराव रडले आणि 'लोकांनी आपणास ओळखले नाही,' असे सांगितले. एवढेच नव्हे तर या अवमानित जिण्यापेक्षा मरणे बरे, असेही बोलून दाखविले. वसंतराव सर्वांना भेटून गेले. काही दिवसांपूर्वी आपले वडील शंकरराव, बंधू बाबू व इतर मित्रांचीही त्यांनी गाठ घेतली. आमच्या घरी येऊन सर्वांना भेटून गेले. पुन्हा न भेटण्यासाठी—!

## वसंतरावांच्या हिट्स



- हच्यो हच्यो पावना बरा दिसतोय्
- बुगडी माझी सांडली ग...
- अरे संसार संसार
- बाळा जो जो रे
- स्त्री जन्मा ही तुझी कहाणी
- एका तळ्यात होती बदके पिले...
- मज वेड लाविले तू, सांगू नको कुणाला
- दिलवरा दिल माझे ओळखा
- कसं काय पाटील बरं हाय का
- माझ्या संग, पंक्तीत बोलू नका
- मामाच्या गावाला जाऊ या ऽऽऽ

आणि अकस्मात त्यांच्या निधनाची वार्ता ऐकताच घटनांची संगती लागली, पण अर्थबोध होईना–

वसंतरावांचे निधन झाले आणि मग त्यांच्या गुणांची स्तुती–अफाट स्तुती बरळणारांची स्पर्धा सुरू झाली, पण त्यांच्या निधनापूर्वी पंधरा दिवस अगोदर त्यांना भेटलेल्यांना या चित्राची स्पष्टपणे कल्पना येत होती.

वसंतरावांच्या निधनाच्या दिवशीच एका वृत्तपत्रात त्यांच्या निधनाची वार्ता पहिल्या पानावर व एक चित्रपट त्यांच्याकडून काढून दुसऱ्या संगीत-दिग्दर्शकाला दिल्याची बातमी आतील पानावर होती.

मृत्यूनंतरही या विरोधाभासाने वसंतरावांचा पाठपुरावा केला. मिरज येथे त्यांचे शव ख्रिश्चन स्मशानभूमीत नेण्यास व धार्मिक पद्धतीने संस्कार करण्यास धर्मगुरूंनी नकार दिला. अखेर मोठ्या मिनतवारीने मृत्यूनंतर दहा-बारा तासांनी

## व्ही. शांताराम आणि वसंतराव

राजकमल स्टूडिओत 'मल्हारी मार्तंड' चित्रपटाच्या गाण्याचे ध्वनिमुद्रण चालू होते. ख्यातनाम चित्रपटदिग्दर्शक व्ही. शांताराम 'रेकॉर्ड रूम' जवळून जात असताना संगीताचे स्वर त्यांच्या कानावर पडले आणि ते थबकले. शेजारीच श्री. देवताळे होते. त्यांनी विचारले, "संगीत–दिग्दर्शन कुणाचे आहे ?"

"वसंत पवार यांचे," देवताळे उत्तरले.

"पवारांना मला भेटायचे आहे, असे सांगा–" शांताराम.

त्या दिवशी वसंतरावांचे कपडे नीटनीटके नव्हते. कसेबसे उभ्या उभ्याच ते शांतारामबापूंना भेटले. वसंतरावांकडे पाहून त्यांना करुणा वाटली. त्यांची प्रकृतीही खालावली होती.

"हे काही ठीक दिसत नाही बुवा." शांताराम म्हणाले. "सवडीने मला भेटा. 'मल्हारी मार्तंड'चे संगीत एकूण गाजणार."

वसंतराव तेथून झटकन सटकले. त्यांची व शांतारामबापूंची पुन्हा कधीच भेट झाली नाही !

श्रेष्ठ साहित्याचा संग्रह
किफायतशीर गुंतवणूक

# राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

- मोठ्या रॉयल आकाराची एक हजार पृष्ठे (दोन भाग)
- उत्कृष्ट कागद, टिकाऊ बांधणी
- दलालांची आकर्षक रेखाचित्रे व बहुरंगी मुखपृष्ठे
- ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे, नकाशे

**किंमत ३६ रुपये**

**100 रुपयांची ठेव**
**५ वर्षांसाठी**

- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे ठेवल्यास सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा लोकमान्य व राजमान्य ग्रंथ ताबडतोब विनामूल्य आपल्याला घरपोच मिळेल.
- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे आपली ठेव आजच पाठवा व आपली प्रत राखून ठेवा.
- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.
- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास १ रुपया वटणावळ अधिक पाठवावी.

राजहंस प्रकाशन पुणे

४१९ नारायण, पुणे

त्यांना चिरकाल समाधी मिळाली आणि या कलंदर जीवनाचा शेवट झाला.

वसंतराव अखेरपर्यंत कलंदर आणि निष्कांचन राहिले. त्यांनी जगाचा चांगलाच अनुभव घेतला, पण जग त्यांना कधीच ओळखू शकले नाही. स्वतःवर त्यांनी कधीच कुणाची बंधने लादून घेतली नाहीत. स्वतः त्रास भोगलाच, पण दुसऱ्यांना कधी तो जाणवूही दिला नाही. त्यांच्या जीवनाचे सार 'साहीर' भाषेत सांगायचे झाल्यास असे सांगता येईल–

इसकोहि जीना कहते है तो–
यूँ ही जी लेंगे ।
उफ् ! न करेंगे, लब्ज सी लेंगे ।
आँसू पी लेंगे–
गम से अब घबराना कैसा
गम सौ बार मिले ।

[ यालाच जीवन म्हणायचे असेल, तर ते असेच जगू. हू की चू करणार नाही. ओठ बांधून ठेवू, दुःख गिळून टाकू. दुःखाला आता घाबरायचे कारणच काय. ते तर शेकडो वेळा अनुभवले आहे. ]

## मृत्यूने इन्कमटॅक्स चुकविला !

शंभर-सव्वाशे चित्रपटांचे संगीत–दिग्दर्शक वसंतराव पवार यांच्याकडे खूप मोठी रक्कम असावी, अशी इन्कमटॅक्स खात्याची कल्पना !

या कल्पनेनुसार या खात्याने पवारांच्यावर ३५,००० रुपये बाकीची नोटीस काढली.

सबंध ह्यातीत एवढी रक्कम मिळाली नाही, मग एवढा इन्कमटॅक्स कुठला ? असे पवार म्हणाले. ते घाबरले. अखेर एका मित्राला घेऊन ते इन्कमटॅक्स कचेरीत गेले, पण अधिकाऱ्यांची समजूत पटेना.

अशातच त्यांचा मृत्यू झाला आणि वसंतराव इन्कमटॅक्सच्या भानगडीतून मुक्त झाले.

ही नोटीस रद्द करावी, अशी त्यांच्या काही मित्रांनी खात्याला विनंती केली आहे.

वर्षा !
प्रीतिगीत गायला यापेक्षा सुंदर वेळ कोणती ?
पण अडचण ही की सगळ्याच गोष्टी
शब्दांत पकडता येत नाहीत.
धुंद झालेल्या दोन पारव्यांची ही कथा—

# वर्षा :

विनोद कुलकर्णी

सरत्या ग्रीष्मातल्या एका सरत्या दुपारी आकाश एकाएकी मळभांनी व्यापून जाते. दिवसभर उन्हाची काहिली जाणवत असते आणि शुष्क, रखरखीत दुपार दुखणाईत म्हातारीच्या लांबलेल्या जिण्यासारखी अगदी नकोशी वाटते. किती पाणी प्याले तरी तहान शमत नाही. वाळ्याच्या पंख्याचा वारा उकाडा दूर सारू शकत नाही. अशावेळी ईशान्य कोपऱ्यात काळपट–पांढरे ढग उठले, की मनाला थोडासा दिलासा लाभतो. उन्हाने जळणारी ही दुपार धारांनी झोडपून निघेल, डोळ्यांना सलत राहणारी बाहेरची आग थंड होईल, अशी आशा वाटते. ढग झरझरा वर चढू लागतात. पूर्वेकडून तांबडमातीचा हात धरून वारा सुसाट वाहू लागतो. झाडे गदगदून हलतात. पानापानांत लपलेले पक्षी पंख फुलारून दूर झेप घेतात. क्षणापूर्वी नितळपणे चकाकणारे निळेभोर आकाश अर्धेअधिक मेघांनी भरून जाते. पण तरीही मन साशंकपणे विचारत असते, हे ढग हुलकावणी तर नाही दाखविणार ? एप्रिल-फूल तर नाही करणार ? पूर्वेकडून अनाहूतासारखे आलेले हे ढग जराही दखल न घेता तसेच पश्चिमेकडे निघून नाही ना जाणार ? पण आज ह्या शंका खोट्या ठरतात. वाऱ्याचा मोठा झोत खिडकीच्या गजातून आत शिरतो, तोच मुळी दोन-चार मोत्यांसारखे टपोरे थेंब घेऊन आणि मग चीर पडल्याने पोत्यातून जोंधळे सरसरा खाली ओघळावेत, तशा धारा बरसू लागतात. बघता बघता क्षितिजापर्यंतचे आकाश ढगांनी झाकले जाते. वाराही मोकाट सुटलेल्या खोंडासारखा वाहत असतो. मेघगर्जनेने जणू धरणी दुभंगणार की काय असे वाटते. जनावराच्या पाठीवर आसूड



फटकारावा, तशी वीज चमकून जाते. झाडे झोडपून निघतात. मातीतून तृप्तीचे निश्वास बाहेर पडतात. खिडकीच्या काचेआड उभे राहून बाहेरच्या पावसाचे तांडव पाहणाऱ्या नि मृत्तिकागंध हुंगणाऱ्या प्रियकराला वाटते, की तप्त भूमीला भेटणाऱ्या, तिला चिंब भिजवणाऱ्या धारांचे नि तिचे हे मीलन दोन प्रणयी हृदयांच्या मीलनासारखेच आहे. म्हणूनच तो आपल्या प्रियेला म्हणतो,

तप्त धुळीवर जलबिंदूंचे घडले नर्तन
दिशादिशांना मातीचे घमघमले अत्तर
'दो हृदयांचे घडते कैसे मीलन ?'
आज तुझ्या प्रश्नाचे तुजला कळेल उत्तर

हा पाऊस म्हणजे वर्षेच्या आगमनाची नांदी. वैशाखवणव्याने होरपळून निघालेला प्रत्येक जीव वर्षेसाठी आसुसलेला असतो. जेष्ठाचे कंटाळवाणे, रूक्ष दिवस तो कसेतरी घालवतो आणि आषाढाच्या पहिल्या दिवसाची प्रतीक्षा करीत बसतो. आषाढ हा संततधारेचा महिना. आकाश पूर्णपणे मेघांनी आच्छादून गेल्याने दिवस अंधारून येतो आणि रात्र अधिक काजळी वाटते. जेव्हा पाहावे तेव्हा आभाळ गळती लागल्यासारखे टिपकत असते. रानकिडयांच्या किरकिरीत बेडकांचा षड्ज मिसळून जातो. सगळीकडे चिकचिक होते, दलदल माजते. खऱ्या पावसकाळाला सुरवात झालेली असते. अशावेळी एखादी विरहिणी उघडया दरवाजातून काळयाभोर मेघाकडे पाहते आणि अलगद तिचे लक्ष दाराला येऊन भिडलेल्या पायवाटेकडे असते. पायवाट

मोकळी असते, उदास असते. कुणाच्याच पावलांचा ठसा तिच्यावर उमटलेला नसतो. त्या विरहिणीचे अंतर पिळवटते. अजून किती विरह सहन करायचा ? कधी येणार माझे राजे ? मग त्याला पत्रच लिहावे, असे तिला वाटते. पण त्याचा पत्ता ? ती मनातच पुटपुटते;

आषाढाच्या पहिल्या दिवशी
मेघांवर मी पत्र लिहावे
'दूर देशीच्या माझ्या रमणा
आता लवकर परतून यावे.'

त्या वेडीला वाटत असते, की वाऱ्याच्या वेगाने धावणारे हे मेघ आपला सांगावा आपल्या साजण्याला पोचता करतील. नव्या आशेचा अंकुर तिच्या हृदयात पालवतो. तिचे अश्रुसिक्त डोळे पायवाटेवरच खिळलेले असतात. प्रियकराच्या आगमनाचे गीत गात ती तशीच बसून असते.

परत कधी येणार सख्या तू ?
आज माझिया अंगणातली
तुळस तुझ्याविण सुकत चालली...

या सुकत चाललेल्या तुळशीला एके दिवशी अचानक बहर येतो. खिन्न चेहऱ्याने, 'डबडबल्या' डोळ्यांनी ती उदासपणे बसून असते नि एकाएकी पदरव ऐकू येतो. आसवांमुळे प्रथम तिला अस्पष्ट दिसते, पण त्याची स्पष्ट मूर्ती तिच्या बाहुल्यांत उमटते, तेव्हा तिच्या आनंदाला पारावार राहात नाही. दाही दिशा भरून तिचे सुख उतूच जात असते. परत आलेल्या प्रियकराला ती किती आवेगाने मिठी मारते. आषाढाच्या रात्री मग अधिकच गडद होतात. हवेतल्या गारठ्याला निराळीच ऊब येते. बाहेर पाऊस रपरपत असतो, त्याची ह्या युगुलाला दादच नसते. मंडुकांचा षड्ज त्याला ऐकू येत नाही. ती त्याच्या ओठांत पुटपुटत असते, 'पुन्हा मला एकटीला सोडून तुम्ही नाही ना जाणार ? तुम्ही नसलात, की काळी रात्र मला नागिणीसारखी डंख मारू लागते !'

आषाढाचे दिवस फार लवकर संपतात. अनेक दिवसांनंतरच्या मीलनाच्या घटिका कशा व्यतीत झाल्या, हेच कळत नाही. मग एके दिवशी हातात हात घालून ते प्रणयी युग्म कुटिरातून बाहेर येते आणि दारातच थबकते. जादूने भारलेल्या दृष्टीने सभोवार ती दोघे पाहू लागतात. किती पाहिले, तरी समाधान असे होतच नाही. हे नवे दर्शन अद्भुत असते, उन्मेषशाली असते. म्हणूनच तो तिच्या कानात सांगतो;

आकाश घनांनी जरा वाकले खाली
झेलून पिसांवर धारा हंस उडाला
तू मूक राहा नि बघ ही अद्भुत किमया
जलतरंग घुमवत श्रावणराजा आला

श्रावण ह्या शब्दातच जादू आहे, अपार सुख सामावलेले आहे. त्या श्रावणाच्या आगमनाने ती दोघे हर्षनिर्भर होऊन जातात. आषाढातली संततधार आता जरा स्थिरावलेली असते. मधूनमधून सरवटे येऊन जातात.-क्वचित एखादे वेळेस तुफान उठते. दर्यावरच्या लाटा उंच उंच झेपावतात. झपाटल्यासारखे माड माना डोलावतात. असे एखादे तुफान रात्री उठले, की रात्रच घुसळून निघाल्यासारखी वाटते. वादळाचा कर्कश ध्वनी कानाचे पडदे चिरणार की काय असे वाटते. गर्द जंगलातले वाघरू मधूनच डरकाळी फोडते. फांद्या फांद्यांना घसटतात. मोठमोठाले वृक्ष उन्मळून पडतात. पक्षी किंचाळून जागे होतात. बेजार झालेले हत्ती गर्जना करू लागतात. हे सगळे ऐकून तिचे स्त्रीहृदय थरथरते. तिचा अवघा देह कंपायमान होतो. ती म्हणते;

गर्जत बाहेर वादळवारा
या एकांती आपण दोघे
मी भ्यालेली अबोल हरिणी
प्रिया मला तू आलिंगनी घे

त्याच्या पोलादासारख्या दणकट बाहूत ती हळूच शिरते. आपल्या कोमल करांचा वेढा त्याच्या मानेभोवती टाकते. मग तिला त्याच्या हृदयाच्या स्पंदनाशिवाय काहीच ऐकू येत नाही ! बाहेरचा पिसाटवारा हलके हलके शांत होतो आणि तिच्या नसानसांत फोफावलेले वादळही शमते ! दुसरे दिवशी सकाळी उठून पाहावे, तर काल रात्री वादळ झाले की नाही, अशी शंका यावी, अशी स्तब्धता, शांतता, एक तऱ्हेची मरगळ सगळीकडे पसरलेली असते. तशी एखाददुसरी खूण बाकी असते. हे पाहिल्यावर तो तिला सांगतो;

तुफानलेल्या त्या रात्रीचा
दूर राहिला सखे किनारा
आता नाही मागे वळणे
आपण शोधू नवा आसरा

बाहेरचे जग पाहायला ती दोघे पहिल्यांदाच बाहेर पडतात. ठिकठिकाणी गढूळलेल्या पाण्याची डबकी साचलेली असतात. ते पाणी हळूहळू निवळत असते नि माथ्यावरच्या आकाशाचे प्रतिबिंब त्या पाण्यात डोकावत असते. त्याच्या डोळ्यांच्या आरशात ती स्वतःचे बिंब पाहते आणि लज्जेच्या काजळाची रेषा तिच्या पापणकाठांना स्पर्शून जाते. पाऊस थांबलेला असतो नि विसावलेले पंख हवेत पुन्हा गिरक्या घेऊ लागतात. जमिनीवर हिरवा गालिचा अंथरलेला असतो. ह्या हिरव्या गालिच्यावर नाना रंगांची नटरंगी फुले मोठी शोभून दिसतात. अशा धुंद मोसमात गद्य भाषेत कोण बोलेल ? त्याचे हृदयच कवीचे होते आणि तो म्हणतो;

पाहिलीस ही हिरवी धरणी
इथे शेकडो पुष्पे फुलली

अगवळामधे मला खोवू दे
यातिल एकच फूल रसेली

लालभडक रंगाचे, नाजूक नि मुलायम पाकळयांचे एक फूल तो तिच्या केसात खोवतो. तिच्या गोऱ्यापान पाठीवर धबधब्यासारखा वाहणारा काळाभोर केशसंभार आणि त्यात शोभणारे ते सुंदर फूल. त्याला वाटते, जणू वनदेवताच हिच्या रूपाने आपल्यासमोर उभी ठाकली आहे. सृष्टीचे लोभस सौंदर्य पाहत ते रानोमाळी भटकत असतात. कबूतरासारखी एकमेकाला खेटून चालत असतात. मधूनच एखाद्या वनात पिसारा फुलवून उन्मत्तपणे थयथयणारा मयूर दिसतो. त्याचे लक्षलक्ष डोळे माणकांसारखे झगमगत असतात. त्याने दिलेली केकावलीची साद थेट अंतराळाला भिडते आणि अधूनमधून गर्जना करणारा मेघांचा तांडा माथ्यावर येतो. सावळे सावळे मेघ झारीतून पाणी शिंपावे तसे ते बरसतात. इकडे पाहावे तर पश्चिमाकाशात सूर्य दिमाखाने तेवत असतोच. ऊन आणि पाऊस यांचे अनोखे मीलन घडते. एखाद्या वडाच्या आसऱ्याला आपल्या सखीसमवेत उभा राहून तो सांगतो;

झिमझिमत्या बरसातीमध्ये
आज कोवळी उन्हे मिसळली
थांब मदनिके इथे क्षणभरी
इंद्रधनूची कमान सजली

इंद्रधनुष्याच्या रंगाची मोहिनीच अजब असते. किती पाहिले तरी समाधानच होत नाही. आपल्या हृदयातील प्रीतीचे विविध चित्रमय त्या इंद्रधनूच्या रंगांतून प्रकट झाले, असे त्या दोघांना वाटत असते. पण थोडयाच वेळात पश्चिमेकडचे वारे वाहू लागते. ढग विखुरतात आणि इंद्रधनुष्याचे तुकडे तुकडे होऊन जातात. कुठेतरी एखादा पांढरा ढग तेवढा उनाड पोरासारखा मन चाहेल त्या दिशेला भटकत राहतो. वर खिळलेली त्यांची नजर समोर जाते आणि त्याला थोडासा धक्काच बसतो. एरवी जवळजवळ कोरडी असणारी समोरची नदी बेफाटपणे, तुडुंब भरून वाहत असते. जणू तिला झिंग चढलेली असते. वाहणे हा एकच धर्म तिच्या ठायी शिल्लक उरतो आणि वाटेत आडव्या आलेल्या वस्तूंची तमा न बाळगता, त्यांनाही ती लीलया वाहवत नेते. हे तिचे रुद्र, अक्राळविक्राळ रूप पाहून तो तिला म्हणतो;

दो काठांचे बंधन विसरून
या तटिनीने बाहू पसरले
इथले जीवन, इथली वस्ती
पुरात सारे वाहून गेले

चलच्चित्राप्रमाणे श्रावणाचे रोजचे दृश्य बदलत असते. कालचे दृश्य आज नसते— मघाचे दृश्य आता नसते. केव्हा एखादी सर ओघळून जाते. केव्हा चकचकीत ऊन पडते. केव्हा वळचणीला दडलेल्या साळुंक्या छपरावर येऊन गात बसतात. केव्हा

सारसांचे शुभ्र थवे झपाट्याने आकाशोड्डाण करताना दिसतात. केव्हा रात्रीचा चंद्र पिकलेला नि फिकाफिकासा दिसतो. केव्हा सारे आकाश चांदण्यांनी लहडून गेलेले नजरेला येते. म्हणूनच—

हिरव्या ओल्या पानांमधुनी
ऊन केसरी हळू उतरले
सोनपिसांचे एक पाखरू
लकेर छेडत उंच उडाले

असे दृश्य दिसते. नित्य नवी अशी ही दृश्ये टिपत ते प्रणयी जोडपे फिरत असते. कधी एखादे जलाशय कमलिनींनी फुललेले आढळते. वाऱ्यावर पद्मकेसर वाहत येतो. भ्रमरांच्या गुंजारवाने आसमंत दुमदुमतो. चंदनवनातून येणारा वारा सुगंधाचे फवारेच्या फवारे उडवत येतो. ह्या मंदसमीरणाने सुखवून गेलेला तो आपल्या प्रियेला सांगतो;

टपटपली श्वेतफुले अन् हसले पानपान
रम्य निळ्या डोहावर भिरभिरली एक तान
एक तान अस्फुटशी ओठांतून ओघळली
गा सखये एखादे सुंदरसे प्रीतगान

प्रीतगान गायला यापेक्षा सुंदर वेळ कोणती ? पण लज्जा हा तर स्त्रीचा धर्म. ती प्रथम आढेवेढे घेते, 'नाही नाही' म्हणते, पण शेवटी तिला गावेच लागते. तिचा दाणेदार, सुरेल स्वर पक्ष्यांच्या तानेत मिसळतो. एखाद्या वृक्षाच्या बुंध्याला माथा टेकून, डोळे मिटून तो तिचे गाणे ऐकत असतो. तिच्या शब्दाशब्दांतून पोवळ्यातून मध ठिबकावा, तसे प्रेम ठिबकत असते, स्नेह झिरपत असतो. प्रणय-गीताच्या धुंदीत ती दोघेही इतकी बेहोष होऊन गेलेली असतात, की आकाशात ढग आले केव्हा नि बरसातीला सुरवात झाली केव्हा हेच कळत नाही. एकाएकी पाऊस येतो आणि उघड्यावर असलेली ती संकोचते, पावसात भिजू या भीतीने ती आडोशाला येऊ पाहते, पण ते त्याला नापसंत असते. तो तिला विनवणी करतो;

घे अंगावर या जलधारा
मुक्त राहू दे कुरळे कुंतल
नकोस लाजू वसंतसेने
पुन्हा न येतिल हे क्षण मंगल

ती विनवणी ती मानते. तो दूर उभा राहून तिच्याकडे पाहात असतो. पाहता पाहता ती ओलीचिंब होते. तिच्या देहावरचे झिरमिरीत वस्त्र अंगाला चिपकून बसते. त्यातून तिच्या संगमरवरी देहाची वेलांटी न् वेलांटी त्याला स्पष्ट दिसते. ओलेतीचे हे मादक, अपूर्व सौंदर्य डोळ्यांनी किती प्याले तरी त्याची तृषा शमत नाही. अलगद तिचे लक्ष, तो ज्या डहाळीखाली उभा आहे, त्या डहाळीवर जाते

आणि स्त्रीसुलभ लज्जा प्रकट करीतच ती सांगते;

प्रणयानंदी धुंद जाहले
दोन पारवे त्या फांदीवर
रानफुलांचा सुंदर गजरा
तुझ्या बांधते मणिबंधावर

क्षणभरातच ती ओटीभर फुले गोळा करते: धुंद वासाची, नाजुक पाकळ्यांची. तिची लांबसडक, तांबूस बोटे ती फुले एकमेकांत गुंफतात आणि बघता बघता गजरा तयार होतो. तो गजरा त्याच्या मणिबंधावर बांधताना तिच्या गालांवर जास्वंदी फुलते. डोळ्यांतील काजळ उगाच लाजते. तिचे हृदय धडधडू लागते. अपार सुखाच्या नुसत्या जाणिवेनेही स्त्री भीते का? मणिबंधावरील गजरा हुंगत तो तिला जवळ घेतो. तिच्या रेशमी कुंतलांवर आपले ओठ टेकतो. मीलनाची आस लागलेले ते दोन देह पुन्हा एकत्र येतात. स्थळकाळाचे बंधन विसरून जातात. त्यांच्यातले भिन्नत्वच नाहीसे होते. बाहेरचा गडद, ओला अंधार, उगाचच रेंगाळल्यासारखा पडणारा पाऊस, कुठूनतरी येणारी सुगंधाची पसरत जाणारी वलये, मिठीतले गुलाबी नि रसरसणारे यौवन— अशावेळी त्याच्या आणि तिच्याही मनात अनंत ऊर्मी येतात. तो तिला म्हणतो;

या पावसरात्री मनात येते असेच काही
असेच काही असेल आले मनी तुझ्याही
ते सांगाया शब्दांचा आधार कशाला?
स्पर्शामधुनी गूज मनीचे उमजत जाई

स्पर्शाच्या भाषेत एकमेकांशी गुफ्तगू करीत रात्र सरते केव्हा कळत नाही. पिकलेली पाने एकेक करून गळावीत, तसे वर्षेचे दिवस सरत असतात. ते कसे सरतात हेच कळत नाही. आकाश पुन्हा पूर्वीप्रमाणे निरभ्र होते. भूमीबाहेर डोकावलेले तृणांकुर झपाट्याने वाढू लागतात. त्यांच्या पात्यांवरचे दवबिंदू तिरप्या किरणात चमकतात. सगळी सृष्टी बिलोरी आरशासारखी चकचकीत दिसते. पुष्ट खिल्लारे पठारापठारांवर मुक्तपणे बागडत असतात. त्यांच्या पाठीवर बगळे मोठ्या दिमाखाने बसतात. मंजुळ कूजनाने रान भरून जाते. वर्षा सरत आलेला असतो, तरीही ती दोघे अजून मिठीत असतात. तो तिच्याकडे निरखून पाहतो. तिच्या डोळ्यांत खळ्कन् अश्रू येतात. गुलाबातल्या दवासारखे ते तिच्या गालांवर स्थिरावतात. तो चमकतो. त्याला कळत नाही, की आज हिच्या डोळ्यांत आसवे का? तो विचारतो;

आज तुझ्या मी मिठीत असता
का ग झाले डोळे ओले?

गदगदलेल्या स्वरात ती उत्तर द्यायचा प्रयत्न करते,

उद्या तुम्ही जाणार दूर नि...

...वर्षर्तूंचे दिवस सपले !

किती सत्य पण कटु असते तिचे सांगणे. खरेच, उद्या त्याला निघायला हवे. धुंद अशा पावसाळी रात्रीची आठवण मनात वागवत, जड पावलांनी तो बाहेर पडेल. अगदी शेवटच्या क्षणी तिला एकदा मिठीत घेईल, आपल्या ओठांनी तिचे अश्रू पुसेल आणि मग तो पाऊलवाटेला लागेल. मागे वळून पाहण्याचे धैर्यच त्याला होणार नाही. सज्जात उभी राहून, दूर दूर जाणाऱ्या त्याच्या पाठमोऱ्या आकृतीला ती प्रश्न विचारीत राहील;

परतून कधी येणार सख्या तू ?
आज माझिया अंगणातली
तुळस तुझ्याविण सुकत चालली...

• • •



साठे
ऑरेंज बिस्किटें
* संत्र्याचा मधुर स्वाद
आणि
* पौष्टिक
साठे बिस्किट अॅण्ड चॉकोलेट कं. लि., पुणे-२
243 MAR

# चरित्रहीन



चाळिसाव्या वर्षी मॅडमनी लग्न केलं, ही बातमी पसरली होती. पोरी थक्क झाल्या. एकच धिटुकली पुढे झाली आणि म्हणाली, " बाई, अभिनंदन ! "

## लीला श्रीवास्तव

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □

छोट्या पप्पूला बालक मंदिरात घालायचं होतं, म्हणून 'बालकमंदिर' अशी पाटी लावलेल्या त्या जुनाट घरात मी शिरले. आत कुणी दिसेना, तेव्हा जरा जोरानंच मी दरवाजावर टकटक केलं.

ती टकटक ऐकून आतल्या खोलीतून एक स्त्री बाहेर आली. मिलची एक स्वस्तशी धुवट पांढरी नेसून, मूल्यवान किनखापावर पावलं मोजीत चालत असल्या-सारखी. ही चाल... ही चाल आमच्या कॉलेजच्या प्रिन्सिपॉलसारखी होती. मी आता चेहऱ्याकडे निरखून बघितलं. तोच सामान्य चेहरा, तोच सावळा रंग आणि तेच धारोष्ण दुधासारखे निर्मळ अन् स्निग्ध डोळे ! शंकाच नको. ही स्त्री म्हणजे आमच्या कॉलेजची ती प्रिन्सिपॉलच आहे. आम्हा सर्व विद्यार्थिनींची 'प्रिय मॅडम.' ... मोठ्या बाई ... पण ही घरची धुवट बारापंधरा रुपयांची स्वस्तशी साडी ? आजच्या या वेशभूषेची संगती आठ वर्षांपूर्वीच्या मॅडमच्या सुंदर, उंची वेषभूषेशी मला एकदम जोडता येईना. पन्नास रुपयांच्या खालची साडी नेसून कॉलेजमध्ये आलेलं आम्ही पाहिलं नव्हतं कधी बाईंना. बाईंचं हे सामान्य रूप प्रिन्सिपॉल-शिपच्या रुबाबात अन् अती सुंदर रंगसंगती साधलेल्या वेशभूषेत कुठंच्या कुठं दडून जाई. बाईंच्या नानाप्रकारच्या नित्य नवीन साड्या अन् त्यांचे मॅचिंग हा आम्हा विद्यार्थिनींच्या कौतुकाचा अन् चर्चेचा एक रोजचा विषय होता. बाईंच्या शिक-वण्यातही दारूसारखी नशा होती. त्या कीट्स शिकवू लागल्या म्हणजे लिटरेचर न घेतलेल्या विद्यार्थिनीही बाईंच्या पीरियडला गर्दी करू लागत. शिरीननं लिहिलं होतं, की बाईंना कॉलेजमधून काढून टाकलं अन् लिटरेचर घेणाऱ्यांची संख्या कमी झाली ...

त्या 'मॅडम'मध्ये एवढं परिवर्तन ? आठ वर्षांत एवढा फरक ? घरीसुद्धा ज्यांना परीटघडीचीच साडी नेसायला लागते, असा ज्यांचा लौकिक होता, त्यांची ही घरी धुऊन धुऊन पिवळसर पडलेली साडी ? ते लग्न केल्यावर कॉलेजच्या बॉडीनं त्यांना प्रिन्सिपॉलशिपवरून काढून टाकलं होतं, हे मान्य केलं तरी अभि-रुची अन् परिस्थितीत एवढा फरक पडू शकतो ? मी मॅडमकडे आणखी निरखून पाहिलं. चेहऱ्यात तसा फरक नव्हता. मोठाले डोळे अजून तसेच स्वच्छ, निर्मळ होते. एकेकाळी उच्चपदस्थ असलेला, वैपुल्यात लोळणारा माणूस तुटून तुकडे

तुकडे झाला तर त्याच्या डोळ्यांत जे कारुण्य, जी व्यथा असते, त्याचा मॅडमच्या डोळ्यांत लवलेशही नव्हता. वयाच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षीही त्यांच्या चालण्यातही ती ऐट, ते वैशिष्ट्य अजून कायम होतं ... फक्त भांगाजवळचे पाच सात केस रुपेरी झाले होते एवढंच ... आठ वर्षांत काळ आणि परिस्थितीनं त्यांच्यावर मात केली ती एवढीच.

मॅडम समोरून येत असल्या म्हणजे आम्ही विद्यार्थिनी थोड्याशा आदरानं अन् थोड्याशा भीतीनं दोन चार पावलं मागं सरकत असू. आठ वर्षांनंतरही मी आपोआपच दोन पावलं मागं सरकले !

" मॅडम, तुम्ही ओळखलं मला ? " हा प्रश्न विचारताना माझा आवाज कापत होता. जणू मॅडमनं वर्गात विचारलेल्या कठीण प्रश्नाचं चुकीचं उत्तर देत होते मी.

साऱ्या प्रोफेसर्सच्या पीरियडमध्ये उलट सुलट बेधडक प्रश्न करणारी शिरीन, वात्रट शिरीनसुद्धा लिटरेचरच्या पीरियडमध्ये दातखिळ बसल्यासारखी चुपचाप बसत असे. मग आमच्यासारख्या समोरच्या बेंचवर बसणाऱ्या व नाकासमोर चालणाऱ्या विद्यार्थिनींची तर गोष्टच सोडा !

" तू ... तू ... कमल ना ? " बाईच्या चेहऱ्यावर ते नेहमीचं टपोरं हास्य फाकलं. बाई अशा हसल्या म्हणजे आमच्या कॉलेजची कवयित्री सुनंदा म्हणायची, " कमल, बाई अशा हसू लागल्या म्हणजे आजूबाजूला मोगऱ्याच्या फुलांची बाग घमघमल्याचा भास होतो, नाही का ग ? त्यांच्या ह्या हास्याचा अजून एकाही पुरुषाला मोह पडला नाही म्हणजे काय ? "

यावर शिरीन वात्रटपणा करायची– " ए कवित्री बाई, त्यांच्या ह्या नुसत्या हसण्याकडे पाहून हा काळा ढोल जन्मभर गळ्यात बांधून घेण्याचा कोण मूर्खपणा करील ? " एवढ्या पाच-सहाशे विद्यार्थिनींत बाईंना माझी नावासकट आठवण आहे हे पाहून मला आश्चर्य वाटलं. " तुला कशी विसरेन मी कमल ? मी ते लग्न केल्यावर काँग्रॅच्युलेशन्स देणारी तूच पहिली, शेवटची आणि एकमेव व्यक्ती होतीस. बाकी सारं जग दात विचकीत होतं, नावं ठेवीत होतं. "

काँग्रॅच्युलेशन्स ! ते दृश्य माझ्या डोळ्यांपुढं एकदम साकार झालं.

आम्ही साऱ्या टोळक्या टोळक्यांनी उभ्या होतो. एखादा साथीचा रोग ज्या झपाट्यानं फैलावतो, त्याच झपाट्यानं शिरीननं आणलेली ती बातमी कॉलेजमध्ये पसरली होती.

वयाच्या चाळिसाव्या वर्षांत पदार्पण केलेल्या आमच्या मॅडमनं म्हणे काल चुपचाप लग्न उरकून घेतलं होतं !

वयाच्या चाळिसाव्या वर्षी स्त्रीनं लग्न करावं, ही कल्पनाच मुळी आम्हांला त्या कोवळ्या वयात विचित्र वाटली होती. काहीतरी अचाट, चाकोरीबाहेरचं करणाऱ्या व्यक्तीबद्दल आदर वाटणाऱ्या ह्या वयात कदाचित आम्ही मॅडमचा उदो-

उदोही केला असता, पण ... !

त्यांनी ज्याच्यांशी लग्न केलं होतं तो माणूस म्हणे त्यांच्याहून चक्क चार वर्षांनी लहान होता. त्याच्या दोन लहान मुलीही होत्या आणि टी. बी. नं मरू घातलेली एक बायकोही होती.

शिरीननं बातमीचा समारोप करताना म्हटलं होतं, "ही त्याची बायको गेल्या दोन वर्षांपासून टी. बी. हॉस्पिटलमध्ये पाय घासत पडली आहे. ती आतापावेतो मरेना, ती ही बातमी ऐकून आठवड्याच्या आतच शॉक लागून मरेल बघ."

"वाटलं नव्हतं हं, की मोठ्या बाई असं काहीच्या बाहीच करतील म्हणून."

"कमाल आहे बाई. हे लग्न करण्याचं का वय आहे? लग्नावाचून एवढं राहवत नव्हतं, तर एवढे चाळीस पावसाळे डोक्यावरून जाईपर्यंत वाट कशाला पाहिली?"

"असेल एखादा उपटसुंभ, नाहीतर कोण बांधायला बसणार होतं गुडघ्याला बाशिंग?"

नेहमीच्या रुबाबात चालत येणाऱ्या मोठ्या बाई पोरींना दुरून दिसल्या अन् पांगापांग झाली. जमेल तिथं दडून शिरीननं आलेली ती बातमी मोठ्या बाईंच्या शरीराशी त्या पडताळून पाहू लागल्या.

बाई त्या दिवशी वीतभर जरीकाठ असलेली नवी कोरी साडी नेसल्या होत्या. त्यांच्या गळ्यात सोन्याची नवी नेकलेस चमचम करीत होती अन् भांगात होती एक अगदी बारीकशी कुंकवाची रेषा! सौभाग्यनिदर्शक कुंकवाची रेषा! घनदाट केसांच्या मधोमध पाडलेल्या नितळ भांगात ती बारीकशी लालचुटुक रेषा फार शोभून दिसत होती...दोन क्षण माझी नजर मोठ्या बाईंच्या भांगातच अडकली. मग मला काय झालं कोणास ठाऊक, मी एकदम पुढे झाले अन् म्हटलं,

"हार्टी कॉंग्रॅच्युलेशन्स, मॅडम."

मॅडम थबकल्या. ह्या कॉंग्रॅच्युलेशन्सचा संदर्भ जुळताच ते विशिष्ट टपोरं हास्य त्यांच्या चेहऱ्यावर फुलून आलं. एखाद्या अमूल्य भेटीचा स्वीकार करताना म्हणावं, तसं त्यांनी म्हटलं होतं, "मेनी थॅंक्स, डिअर गर्ल."

"बैस ना? उभी काय आहेस आल्यापासून."

बसण्यासाठी खोलीत फक्त एक जुनाट सतरंजी अंथरलेली होती. सतरंजीच्या एका कोपऱ्यावर मी अवघडून कशीबशी बसले.

माझ्या डोळ्यांसमोर त्यांची आठ वर्षांपूर्वीची ड्रॉइंग-रूम फिरून गेली. तो प्रशस्त आरामदेह सोफासेट, ते डेकोरेशन पीसेस्... अमृता शेरगिलचे ते निवडक पेंटिंग्ज...

क्षणभर माझी व मॅडमची दृष्टादृष्ट झाली.

माझ्या डोळ्यांत उफाळणारे कैक प्रश्न त्यांनी ह्या एका क्षणातच वाचून टाकले असावेत.

" बॅनर्जीशी लग्न केल्यामुळं कॉलेजच्या बॉडीनी मला काढून टाकलं, हे तू ऐकलंच असशील कमल. त्यांनी माझ्यावर चारित्र्यहीनतेचा आरोप केला होता. किती गंमत आहे पाहा कमल. सरळ सरळ लग्न करणारी मी चारित्र्यहीन आणि घरात लग्नाची बायको बसलेली असून, गावभर उकीरडा फुंकणारे, कॉलेजमधल्या कोवळ्या पोरीवर अन् अविवाहित स्टाफवर नजर ठेवणारे ते सारे चारित्र्यवान... मला या जगाची फार फार गंमत वाटते बघ." मॅडम बोलत होत्या. मी ते खालच्या मानेनं ऐकत होते. अजून बरंच विचारायचं होतं, ऐकायचं होत, पण विचारायची हिंमत होत नव्हती.

एवढ्यात एक नऊएक वर्षांची मुलगी आत आली व पुस्तकं फेकून मॅडमच्या गळ्याला झोंबत म्हणाली, " ममी, आम्हाला भूक लागली."

" जा. पोळी खा."

" फक्त पोळीच ? तू काल म्हणाली होतीस ना की लाडू करीन आज म्हणून. रोज रोज आम्हाला फसवतेस ? "

" उद्या नक्की करीन हा ! आज शहाण्यासारखी पोळी खाऊन घे बघू."

मुलगी अनिच्छेनं आत गेल्यावर त्या म्हणाल्या, " ही माझी धाकटी हं, मोठी पण येतच असेल."

मला आठवलं, लग्नापूर्वी मि. बॅनर्जीला दोन मुली असल्याचं ऐकलं होतं, त्याच दोन असाव्यात ह्या.

" मुलींचे वडील केव्हा येतात घरी." शेवटी मी मोठी हिंमत करून विचारलं.

" ते इथं नसतात. जबलपूरला असतात." क्षणभर थांबून त्याच पुढे म्हणाल्या, " जेमतेम चार-साडेचार वर्षंच आम्ही एकत्र राहिलो. माझी नोकरी गेली, पाठोपाठ त्यांचीही नोकरी गेली. दोन वर्षांच्या बेकारीत जवळची सारी पुंजी संपली. माझ्याहून ते लहान आहेत, हे तू ऐकलंच असशील. माझ्याजवळचं पद गेलं, पैसा गेला, अधिकार गेला. तारुण्य आधीच ओसरलं होतं. माझ्याशी बांधून राहण्यासारखं आता काहीच उरलं नव्हतं. मला ते कळलं. मग मी त्यांना खुषीनं मुक्त केलं."

" अन् ह्या मुली ?"

" ह्या मीच मागून घेतल्या आणि त्यांनी अगदी आनंदानं दिल्या. मातृसुख बिचाऱ्यांच्या नशिबात नव्हतंच. आता माझ्याशी लागलेला लळा पोरींना तोडणं जमलं नाही, तसंच मलाही जमलं नाही. आता ते तिसरं लग्न करायला अगदी मोकळे आहेत." मॅडम अगदी स्वाभाविकपणं बोलत होत्या. हे सारं सांगताना वेदनेची, कारुण्याची अस्पष्टशीसुद्धा छाया पडली नाही त्यांच्या चेहऱ्यावर. वेदना मला झाल्या ते ऐकताना; एखादी जहरी सुरी शरीरात खुपसत जावी तशा !

त्या संधिसाधू बॅनर्जीचा मला विलक्षण संताप आला. मी संतापानं म्हटलं, " मॅडम, यांनी फसवलं तुम्हाला अन् वर दोन्ही पोरी 'तुमच्या पदराला बांधून दिल्या.'

त्यांच्यापायी तुमची एवढी सोन्यासारखी नोकरी गेली, छी:थू, झाली. आता वर हे धिडवडे ! उलटचा काळजाचा..." मी आणखी काय काय बडबडत राहिले असते कोणास ठाऊक, पण वाईंनी मला मध्येच थांबवलं.


"त्यांचा दोष नाही यात कमल. दोष असलाच तर माझा आहे, त्या निष्ठुर देवाचा आहे. जो जन्माच्या वेळीच प्रत्येक मुलीच्या हृदयात एक तृष्णा ठेवून देतो. ही तृष्णा जन्मापासून मृत्यूपर्यंत तिच्या रक्ताबरोबर शरीरात वाहात राहते. लहानपणी आई-बापाच्या, भावाबहिणींच्या प्रेमाची तृष्णा, मोठेपणी पुरुषाच्या प्रेमाची, स्पर्शाची तृष्णा, आपलं सर्वस्व अर्पण करण्याची, दुसऱ्याचं सर्वस्व प्राप्त करण्याची तृष्णा, मातृत्व प्राप्त करण्याची, मातृप्रेम देण्याची तृष्णा, ह्या अनंत तृष्णा फक्त मृत्यूबरोबरच शांत होतात. आयुष्याच्या चाळिसाव्या वर्षी मला एक पुरुष भेटला अन् मी त्याच्याशी लग्न केलं, याचा मला कधीच पश्चात्ताप होत नाही."

"मॅडम, पण आजच्या तुमच्या अशा अवस्थेला तेच कारण आहेत ना." मी न राहवून म्हटलं. माझी नजर मॅडमच्या धुऊन धुऊन पिवळट पडलेल्या साडीवर खिळली होती.

"कमल, आयुष्याच्या प्रत्येक अवस्थेत जे जे प्राप्त झालं, त्याचा मी पूर्णत्वानं स्वीकार केला अन् उपभोग घेतला. एकेकाळी उच्च पद अन् पैसा होता, त्याचा मी अगदी पुरेपूर उपयोग केला. त्यानंतरच्या काळात मिळालं नवऱ्याचं प्रेम अन् प्रणयसुख. तेही पूर्णत्वानं उपभोगलं मी. आज पैशाचा संपूर्ण अभाव आहे. दोनचार टच्यूशन्स अन् हे छोटसं बालक–मंदिर, यात आम्हा तिघींची पोटं जेमतेम भरतात, पण त्याबद्दल माझी कसलीही तक्रार नाही. कारण ह्या दोन अनाथ पोरींच्या निरागस प्रेमानं माझ्या आयुष्याचा कोपरान्‌कोपरा उजळून गेला आहे."

बोलता बोलता मोठ्या वाईंच्या चेहऱ्यावर ते विशिष्ट टपोरं हास्य फुलून आलं आणि मोगऱ्याची हजारो फुलं माझ्याभोवताली घमघमू लागल्याचा मला भास झाला !

● ● ●



# उपदेश

## यारास्लाव्ह हाशेक

जावई होण्यासाठी तो आला होता. त्याला हाकलून देण्यात आले. तो पुनः आला नाही, पण .......

" नाही, कधीच शक्य होणार नाही ते. " – सुप्रसिद्ध पेढीवाले मि. विल्यम्स यांनी आपल्यासमोरच बसलेल्या त्या तरुणाला शांतपणे सांगितलं. त्यांच्यासमोरच अगदी आरामात तो तरुण बसला होता.

" नाही मि. चेव्हियन. " मि. विल्यम्स त्याला म्हणाले, " मी जे काही सांगतो आहे, ते नीटपणे ऐकून घे अन् त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न कर ह्यापुढं. माझ्या मुलीशी, लुट्टीशी लग्न करायची तुझी इच्छा आहे. ह्या लग्नामुळं माझ्या इस्टेटीमधून थोडा-फार पैसाअडका आपल्या खिशात पडेल, असं तुला वाटतं, नाही का ? थोड्याच वेळापूर्वी मी तुला जेव्हा तुझ्या घरच्या परिस्थितीबद्दल विचारलं, तेव्हा तुझ्याजवळ शेदोनशे डॉलर्सच असल्याचं तू मला सांगितलं होतंस ! "

टेबलावर पाय पसरीत, खुर्चीत आणखी थोडं रेलत विल्यम्स पुढं बोलू लागले. ते म्हणाले, " अन् त्यावर लगेच तू अशीही मल्लीनाथी केलीस, की मीही एकेकाळी गरीबच होतो. माझ्याजवळ एका जमान्यात तर तेवढीही दौलत नव्हती. तुझं म्हणणं मी काही नाकारीत नाही, पण त्यावर उत्तर द्यायचं झाल्यास तुझ्याएवढं माझं वय होण्यापूर्वीच मी तुझ्यापेक्षा कितीतरी जास्त पैसा गाठी बांधला होता अन् त्याचं कारणही उघड आहे. मी जशा व ज्या उचापती करू शकलो, तशा उचापती करण्याची कुवत तुझ्या अंगात मुळातच नाही. पुचाटपणा तुझ्या...ह्या शब्दांनी तुझा मना-वरचा ताबा उडतोय् हे मला दिसतंय्, पण असं संतापून माझ्यासमोर चालणार नाही. मानगूट धरून तुला बाहेर फेकील, असा तगडा निग्रो नोकर माझ्या घरात आहे. तेव्हा मी जे सांगतोय् ते नीट ऐक अन् त्याप्रमाणं वागायचा प्रयत्न कर. "

ते पुढं म्हणाले,

" वयाला सोळा वर्षं होतात तोच माझ्या काकांच्या घरी, नबारास्का गावी मी गेलो. व्यवहार म्हणून, व्यवहारात चार पैसे सुटावे म्हणून. आमच्या शेतातच एका निग्रोला लाथाबुक्क्यांनी ठार करण्याची योजना मी काकांच्या गळी उतरविली. गाववाले त्या निग्रोला नाहीतरी रानात खतम् करणारच होते. मग आमचं शेत त्यासाठी काय वाईट होतं ? मारेकऱ्यांनी त्या निग्रोला लाथाबुक्क्या मारीत



आमच्या शेतात खलास केलं. ह्या खेळ पाहण्यासाठी, गावात सर्वत्र मी जाहिराती वाटल्या व तिकीट लावून गावकऱ्यांनी हा खेळ ठेवला. तिकीटविक्रीचं काम माझ्याच हाती होतं. जेव्हा गावकऱ्यांनी त्या निग्रोला अखेर फासावर चढविलं, तेव्हा सारा पैसा मी खिशात भरला अन् त्याच रात्री गावातून पोबारा केला. ज्या निग्रोला गावकऱ्यांनी मारलं, त्याच्यामुळंच माझं नशीब उघडलं होतं अशा प्रकारानं. कारण हा पैसा घेऊन, अशी आवई उठवून त्या पैशांतून अनेक जमिनी खरेदी केल्या. जमिनीचे भाव कडाडताच त्या जमिनी विकून मी तो पैसा कारखान्यांत गुंतविला. त्यानंतर माझ्यावर चिडलेल्या एका माझ्या हितशत्रूनं माझ्यावर गोळी झाडली. ह्या गोळीनं माझ्या डाव्या हाताचं हाड मोडलं; तरी त्यातूनच मला दोन हजार रुपये नुकसानभरपाई मिळाली."

"ह्या अपघातातून बरं होताच जवळच्या पैशातून मी एका धार्मिक संस्थेचे घर खरेदी केले. मागासलेल्या टापूत पक्की घरे ही संस्था बांधणार होती. ह्या संस्थेला जो शंभर डॉलर्सचं दान देईल, त्याला आम्ही एक मानपत्र द्यायचो. तेवढाच आमचा कार्यक्रम होता. घरं वगैरे बांधतो कोण ? नंतर मोका साधून आम्ही ह्या संस्थेचं दिवाळं काढलं. अर्थात दिवाळं काढण्यापूर्वी, संस्थेतील मी माझे शेअर विकून चामडयाच्या धंद्यात शिरकाव केला. कारण चामडयाचे दर तेव्हा वाढत

चालले होते. ह्या धंद्यात मला अमाप फायदा मिळाला. कारण उधारीत माल खरेदी करून रोखीनं त्याची विक्री करण्याचं व्यापारी–तंत्र तोवर छान जमलं होतं."

"ह्या धंद्यात मिळालेला सारा पैसा मी कॅनडाच्या एका बँकेत जमा केला व पुन्हा दिवाळं काढलं. लगेच माझ्या देणेकऱ्यांनी मला तुरुंगात डांबलं, पण खटला चालू होताच वेड लागल्याचं सोंग काढून मी खटल्यातून सुटलो. जवळ पैसा नाही, हे दाखविण्यासाठी लगेच भाड्यासाठी मुद्दाम भीक मागून मी पैसे उभे केले. त्यातून कॅनडाला जायचं तिकीट काढलं. नंतर ब्रुकलिन येथील लक्षाधीश मि. ईमलस्ट यांच्या मुलीला फसवून, तिला घऊन, सॅनफ्रान्सिस्कोला पळून गेलो- त्यांना आपल्या मुलीचं माझ्याशी लग्न लावायला भाग पाडील, अशी परिस्थिती तेथे मी निर्माण केली. कारण ... त्यांच्या मुलीला माझ्यापासून दिवस गेले होते. 'मुलगी द्या, नाहीतर वर्तमानपत्रांतून तुमची अब्रूच काढतो. एका भणंगापासून...' असा दम त्यांना दिला."

"हे बघ मि. चेव्हियन, मी तेव्हा असा धडपड्या होतो. नाहीतर तू-तुझ्यात काही धमक आहे, हे दाखविण्यासारखं तू आजवर काय केले आहेस? माझी मुलगी सहलीला गेली असताना, समुद्रात पडून बुडत होती तेव्हा तू तिला वाचविलंस, एवढं तुझं म्हणणं ना ? तिला वाचविलंस हे छान केलं, पण ह्या परोपकरानं तुझा काही फायदा झाला का ? ह्या प्रयत्नात तुझा नवा बूट खराब झाल्याचं तूच सांगितलंस. आता माझ्या मुलीवर तुझं प्रेम बसलं असलं, तरी ज्याला काडीइतकी व्यवहाराची अक्कल नाही, त्याचा सासरा होण्याइतका मी बुद्दू आहे का ?"

"पुन्हा तुझा ताबा सुटत चाललाच. पण हे बघ, मुकाट्यानं जागच्या जागी बस व माझ्या प्रश्नांची उत्तर दे. सांग, तू कायद्याविरुद्ध कधी वर्तन केले आहेस ?"

"नाही."

"तुझ्याजवळ पैसाअडका आहे ?"

"नाही."

"माझ्या मुलीबरोबर तुला लग्न करायचं आहे ?"

"हो."

"माझ्या मुलीचं तुझ्यावर प्रेम आहे ?"

"हो, आहे."

"ते असू दे. आता शेवटचा प्रश्न. आता तुझ्या खिशात किती पैसे आहेत ?"

"शेहेचाळीस डॉलर."

"ठीक. तुझ्याबरोबर सुमारे अर्धा तास मी बोललोय्. पैशाच्या प्रश्नावर माझा सल्ला घेण्यासाठी तू आला होतास. मिनिटाला एक डॉलर ह्या हिशेबानं आतापर्यंत माझी फी तीस डॉलर झालीय."

"पण .... मि. विल्यम्स." थोड्याशा तक्रारीच्या स्वरूपात तो तरुण म्हणाला,

"काय नाही ? हे बघ मी तुला स्पष्ट सांगतोय." आपल्या घड्याळाकडं

पाहात मि. विल्यम्स म्हणाले, " आणखी एक मिनिट झालं. म्हणजे एकतीस डॉलर फी झाली एकूण. "

काहीच न सुचल्यानं मि. चेव्हियनने, त्या तरुणानं खिशातून एकतीस डॉलर काढून मि. विल्यम्सना दिले. पैसे खिशात टाकीत मि. विल्यम्स हसत म्हणाले, " आता मुकाट्यानं माझ्या घरातून चालता हो चेव्हियन. नाहीतर...धक्का मारून..."

" अन् तुमची मुलगी. " दरवाजाजवळ जाताच किंचित थबकून तो तरुण म्हणाला.

" एखाद्या बावळटाच्या गळ्यात मुलगी बांधायला माझं काही डोकं फिरलेलं नाही. " विल्यम्स म्हणाले, " आता मुकाट्यानं गेला नाहीस तर तुझे दात ... "

मि. चेव्हियन बाहेर पडताच त्याच्याकडं पाहात मि. विल्यम्स म्हणाले, " माझा जावई व्हायला आला होता बेटा. " नंतर आपल्या मुलीकडं पाहात उपहासानं ते म्हणाले, " हा तुझ्या गळ्यातला ताईत तर ! अगदी मद्दड आहे की ग. "

" म्हणजे आमचं लग्न होण्याची आता ... " त्यांची मुलगी चाचरत म्हणाली.

" अशा स्थितीत तर नाहीच नाही. " ते म्हणाले, " त्याला जोवर डोकं चालवून जगण्याचं जमत नाही, आपली हुशारी तो जोवर सिद्ध करीत नाही, तोपर्यंत आशा नाही. " आपल्या मुलीला त्यांनी मग सारी हकीकत सांगितली. नंतर ते म्हणाले, " आज मी त्याला असा धडा दिलाय की जन्मभर याद राहील बेट्याला. "

अन् दुसऱ्या दिवशी व्यापारी कामानिमित्त ते परगावी निघून गेले.

एक आठवड्यानी ते परत येतात तो त्यांचं घर रिकामं होतं अन् त्यांच्या टेबलावर एक पत्र त्यांची वाट पाहात होतं. त्या पत्रात लिहिलं होतं—

" माननीय तीर्थस्वरूप,

एका आठवड्यापूर्वी आर्थिक प्रश्नावर आपण मला दिलेल्या बहुमोल सल्ल्याबद्दल धन्यवाद. आपला उपदेश मला इतका पटला, की आपल्या मुलीला घेऊन मी कॅनडाला चाललोय्. जाताना आपल्या तिजोरीतील सारी रक्कम अर्थातच उचलली आहे.

आपला

**चेव्हियन.** "

त्या पत्राखाली खालील मजकूर होता.


" पूज्य पिताजी,

आम्हा उभयतांना आपण आशीर्वाद द्याल, असं माझं मन मला सांगतंय. तिजोरीची चावी न मिळाल्यानं, नाइट्रो–ग्लिसरीनचा वापर करून आम्ही तिजोरीचं कुलूप तोडलं.

आपली

**लुट्टी.** "

●



" Any man or state who fights on against Nazidom, will have our aid. Any man or state who marches with Hitler is our foe. That is our policy and that is our declaration......"

२२ जून, १९४१ ला पहाटे जर्मन सैन्याने रशियावर हल्ला चढविल्याचे वृत्त जाहीर होताच त्याच रात्री ९ वाजता ब्रिटिश जनतेला व जगाला उद्देशून केलेल्या चर्चिल यांच्या भाषणातील हा भाग आहे. चर्चिल यांनी निःसंदिग्धपणे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे महत्त्वाचे शाश्वत सूत्र यात सांगितले.

" जी कोणी व्यक्ती वा राष्ट्र नाझीराजवटीच्या विरुद्ध लढू लागेल, त्याला आम्ही मदत करू. जी कोणी व्यक्ती वा राष्ट्र हिटलरच्या गळ्यात गळा घालील, ते आमचे शत्रू समजले जाईल. हे आमचे धोरण आहे आणि हीच आमची घोषणा आहे– "

वस्तुतः चर्चिल हे कम्युनिझमचे कट्टर विरोधक होत. या भाषणाच्या सुरवातीलाच चर्चिल यांनी ही गोष्ट सांगून टाकली... " कम्युनिझमची जी अत्यंत वाईट अंगे आहेत, त्यात व नाझीवादात फारसे अंतर नाही. " 'गेली २५ वर्षे मी कम्युनिझमला विरोध करीत आलो आहे... ' ही आपली ओळख न लपवता भाषणाच्या अखेरीस त्यांनी रशियन जनतेला आश्वासन दिले,

" जी जी मदत आम्हाला शक्य असेल, ती ती आम्ही तुम्हाला देऊ... ! "

चर्चिल यांना इंग्लंड वाचवावयाचे होते. इंग्लंड खड्डयात गेले तरी चालेल, परंतु

उत्तरार्ध

लेखांक : ११ वा

# नाझी

## भस्मासुराचा उदयास्त

**रा. म. शास्त्री**

आपण जगातील एक शांततावादाची ज्योत म्हणून तेवत राहावे, या भ्रांत विचाराने चर्चिल पछाडलेले असते, तर ते काय बोलले असते ?

‘ आमचा नाझींशी लढा चालू आहे... परंतु कम्युनिझमशीदेखील आमचे शत्रुत्वच आहे. यासाठी आम्ही रशियाला कसलीही मदत करणार नाही, उलट रूसो-जर्मन सरहद्दीवर तावडतोब शस्त्रसंधी व्हावा, म्हणून आम्ही जगातल्या शांततावादी राष्ट्रांची तावडतोब परिषद बोलावीत आहोत. रूसो-जर्मन प्रश्न वाटाघाटींनीच सुटले पाहिजेत.’

इंग्लंडचे नशीब, की असले दुधखुळे त्यावेळी इंग्लंडमध्ये नव्हते. राजकारण म्हणजे फार गुंतागुंतीचे असते हो ! त्यात आर्थिक प्रश्न असतात. इंग्लंड कुठे, आपण कुठे ? असल्या भाकड कथा कुणी सांगू नयेत. राजकारणातले नियम हे साधे व्यवहाराचेच नियम असतात. ‘ भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे माथा हाणू काठी ।, ’ ‘ झाला नारू तेथे लावावा कापरू ’–‘ व्हावे अधमासि अधम – ’ या साध्यासुध्या तुक्या वाण्याच्या नीतीनेच राजकारणाचा उदीम चालू असतो.

देशातल्या सामान्यातल्या सामान्य नागरिकाला, मग अशा राजकारणाचा अर्थ सांगायला पोतेभर पुढारीदेखील नकोत. चर्चिल काय बोलत होते, ते इंग्लिश जनतेला कसल्याही मखलाशीशिवाय समजतच होते ना ? कारण तो व्यवहार ठणठणीत होता. कम्युनिझमशी लढायचेच आहे, परंतु आज नाझीवादाला गाडायला रशिया उभा ठाकत असेल, तर एखाद्या भयानक ढोंगापायी ती मदत मी नाकारणार नाही... असा हा स्वच्छ व्यवहार होता !

## मेस्की व चर्चिल

चर्चिल यांनी रशियाला सर्व मदत देऊ केली. त्यांच्या जर्मनीशी सुरू झालेल्या युद्धाचे महत्त्व जाणून सारी किल्मिषे तात्पुरती नजरेआड केली, पण चर्चिल यांनी रशियाचे लांगूलचालन असे कधीच केले नाही.

मागील अंकात वर्णन केल्याप्रमाणे फील्ड मार्शल रुडन्स्टेंड, फील्ड मार्शल बॉश् व फील्ड मार्शल लीन यांच्या सैन्यांनी रोस्टोव्ह, मॉस्को व लेनिनग्राडपर्यंत मुसंड्या मारून लाल सैन्याचे मोठाले पराभव करताच, सप्टेंबर, १९४१ मध्ये अशी परिस्थिती निर्माण झाली, की मॉस्कोच्या उपनगरांत जर्मन सैन्ये येऊन थडकली.

क्रेमलीनच्या नेत्यांना आपल्या पापाचा घडा भरला, असे क्षणभर वाटले. फ्रान्समध्ये ब्रिटिश सैन्य उतरले, तरच मॉस्कोभोवतीचा फास सुटेल, ही गोष्ट स्पष्ट होती. म्हणूनच ४ सप्टेंबर, १९४१ ला लंडनमधील रशियन वकील मेस्की (M. Maisky)याने चर्चिल यांची भेट घेतली. मेस्की हा जेव्हा उघडपणे – 'दुसरी आघाडी उघडण्यात दोस्त हेळसांड करीत आहेत,' असा आरोप करू लागला, तेव्हा चर्चिल यांनी त्याला व्यवस्थित आडवा केला.

"Remember that, only four months ago, we in this Island did not know whether you were not coming in against us on the German side ! We thought it quite likely. We never thought our survival was dependent on your action either way. You of all people have no right to make reproaches to us."

[लक्षात ठेवा, चार महिन्यांपूर्वी अशी परिस्थिती होती, की या बेटातल्या आम्हा लोकांना, तुम्ही जर्मनीच्या वतीने आमच्याविरुद्ध उभे राहता की काय, अशी धाकधूक वाटत होती ! ही गोष्ट घडली असती, तर नवल वाटले नसते ! तुम्ही काय करता, यावर आमचे भवितव्य टांगून ठेवलेले नव्हते. निदान तुम्हाला तरी दुसऱ्या आघाडीच्या बाबतीत आम्हाला काही बोलण्याचा अधिकार नाही... ]

चर्चिल यांनी हा जमालगोटा देताच मेस्कीची मिजास खाडकन उडाली ! हिटलरशी चर्चिल यांनी युद्ध करणे आणि जर्मनीशी रशियाने लढणे, यात जमीन अस्मानाचे अंतर होते. हिटलरवाद गाडण्याकरता इंग्लंडने स्वतःहोऊन जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले व जगात या कार्याला जे जे मदतनीस ठरतील, त्या राष्ट्रांकडे सहकार्याची याचना मांडली होती. रशियाच्या बरगड्या हिटलरने खिळखिळ्या केल्या; तेव्हा आता रशिया युद्धास सिद्ध झाला होता. परंतु पोलंड व फ्रान्सवर जर्मन सैन्याला तुटून पडण्याला अनुकूलता निर्माण करून देणाऱ्या रूसो-जर्मन अनाक्रमणाच्या कराराच्या पापाचा हा फक्त पश्चात्ताप होता.

## अटलांटिक चार्टर

इंग्लंडचा भरवसा रशियावर अजीबात नव्हता. रशियाने जर्मनीविरुद्ध युद्ध

पुकारावे, असा कसलाही प्रयत्न इंग्लंडने केला नव्हता. या उलट अमेरिकेला जर्मन-विरुद्ध युद्धात सामील होण्यासाठी चर्चिल यांनी निकराचा प्रयत्न चालविला होता. इंग्लिश भाषाच बोलणारी इंग्लंड व अमेरिका ही तशी रक्ताच्या नात्याची होती. म्हणूनच अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट यांनी जर्मन सैन्य मॉस्कोनजीक ठाकताच हॅरी हॉपकिन्स यांचेवरोबर चर्चिल यांना भेटीचे निमंत्रण पाठविले होते. 'प्रिन्स ऑफ वेल्स' या इंग्लंडच्या नव्या युद्धनौकेतून चर्चिल यांनी ४ ऑगस्टला रुझवेल्ट यांच्या भेटीसाठी प्रस्थान ठेवले. ९ ऑगस्टला अटलांटिकमध्ये ही भेट झाली. तीन दिवस अमेरिकन अध्यक्षांशी बोलणी करून १२ ऑगस्ट, १९४१ ला चर्चिल–रुझवेल्ट यांनी आपले संयुक्त घोषणापत्र प्रसिद्ध केले. 'अटलांटिक चार्टर' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या आठ कलमी घोषणेत सहावे कलम असे आहे–

" नाझी जुलमी शक्तीचा पुरता नाश झाल्यावर जगातील सर्व राष्ट्रांना आपआपल्या चतु:सीमेत सुखाने व सुरक्षितपणे नांदता येईल ... "

हा जाहीरनामा नाझी–आक्रमणाविरुद्ध आहे, हे अमेरिकेच्या अध्यक्षांकरवी अधिकृतरीत्या जाहीर करवून घेण्यात यश मिळवून, चर्चिल यांनी अमेरिकेला युद्धात खेचण्याच्या दृष्टीने महत्त्वाची कामगिरी उरकली.

परंतु योग कसे विचित्र असतात पाहा ! अमेरिका अखेर चार महिने उलटण्यापूर्वीच युद्धात पडली, ती जपानने अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारल्यामुळे ! जपानी विमानांनी पर्ल हार्बरवर ७ डिसेंबर, १९४१ ला अघोरी हल्ला चढवल्यानंतर ! !

**जपान 'बडा देश' बनला !**

१९०५ मधे रशियासारख्या बलाढ्य देशाचा आरमारीयुद्धात व मांचुरियात प्रत्यक्ष लढाईत धूळ चारून, जपानने आंतरराष्ट्रीय राजकारणात तडाखेबंद पदार्पण केले. या घटनेचा यथायोग्य अर्थ चर्चिल यांनी लावला आहे. चर्चिल यांनी जपानची त्यावेळची मनस्थिती चित्रित करणारा लहानसा उतारा उद्धृत केला आहे–

" When we sent you the beautiful products of our ancient arts and culture, you despised and laughed at us, but since we have got a first class Navy and Army with good weapons, we are now regarded as a highly civilised nation. "


[ गोऱ्या जनतेला जपान जणू सांगत होता— आम्ही आजपावेतो आमच्याकडील पूर्वापार कला, संस्कृतीतील सुंदर गोष्टी तुमच्याकडे धाडीत होतो, तेव्हा तुम्ही आमचा तिरस्कारच करीत होता व आम्हाला हसत होता, पण आज जेव्हा आमच्याजवळ पहिल्या दर्जाचे आरमार व अत्याधुनिक अस्त्रांनी सुसज्ज असे सैन्य आले, तेव्हा लगेच तुम्ही आमच्या देशाला मोठा सुसंस्कृत देश समजू लागला आहात ! ]

जपानी विचारातील हे वेचक टिपण मोठे उद्बोधक आहे नाही ? इंग्लंड काय,

# स्वातंत्र्याच्या १९व्या वर्षात पदार्पण करतांना –

अन्नाच्या बाबतीतील आपले
परावलंबन आता दूर झालेच पाहिजे,
अन्नोत्पादन वाढविण्यासाठी
शेतीला विज्ञानाची जोड दिली पाहिजे.







त्यासाठी—

★ मशागतीच्या सुधारलेल्या पद्धती

★ सुधारलेली बियाणी

★ सुधारलेली अवजारे

वापरण्याचा शेतकऱ्यांनी आज निर्धार केला पाहिजे.

# स्वातंत्र्य दिन १९६५

प्रसिद्धी संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई

चीन काय किंवा रशिया काय, हे देश मोठे का ? तर आज या राष्ट्रांजवळ सर्वांत मोठी विध्वंसक अस्त्रे आहेत हेच ना ? चीन याच रांकेत एकदम कसा बसला...? त्यानेही अण्वस्त्र पैदा केले आणि 'बिग पॉवर्स'ची संख्या एकाने वाढविली ! १९०५ साली रशियाला धूळ चारताच जपान जागतिक राजकारणात बिगपॉवर ठरले !

जपानच्या इतिहासातील रशियाचा पराभव हे सुवर्णपान अगदी अलीकडील, परंतु यापूर्वी म्हणजे सतराव्या शतकात जपानमध्ये मिशनऱ्यांनी ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराकरता प्रवेश करून, जपानमधे ख्रिश्चनांची संख्या दोन लाख पन्नास हजारांवर नेली ! धर्मांतरानंतर राष्ट्रांतर होतेच होते, याची जाणीव जपान्यांना होतीच. 'बुद्धाला' खुंटीला टांगून १६३८ च्या आसपास जपान्यांनी ख्रिश्चनांची कत्तल उडविली. जपान सोडून मिशनरी पळाला व परद्वेष्टा ख्रिश्चनधर्म नाहीसा झाला ! ख्रिश्चन धर्मियांपायी देशात झालेल्या रक्तपाताच्या आठवणी एकोणिसावे शतक उजाडले तरी जपानी मनातून पुसल्या गेल्या नाहीत. ख्रिश्चन धर्मियांची पूर्वेकडील साम्राज्ये जपानच्या डोळ्यांत सलत असत. पॅसिफिकमधील अमेरिकन आरमार, हाँगकाँग, मलाया, सिंगापूर येथील ब्रिटिश साम्राज्य, डचांच्या ताब्यातील बेटे या गोष्टी जपान्यांनी कायमच्या म्हणून कधीच स्वीकारल्या नाहीत ! हा द्वेष तसाच त्यांच्या शरीरात मुरत गेला होता.

शंभर टक्के राष्ट्रवादी, अत्यंत कडवे व पॅसिफिकमधील उपऱ्या गोऱ्या राष्ट्रांचे द्वेषी, अशी मोठी जनसंख्या जपानमधे असली तरी व्यापारीवर्गदेखील संघटित होता. १९४० सालापर्यंत राजकारणावर या वर्गाचे वर्चस्व होते. त्यांना युद्धसाहसे नको होती. युरोपात युद्ध पेटले होते. ब्रिटन जीवनमरणाच्या युद्धात अडकले होते व जर्मनीच्या हिशेबात युरोपबाहेरील जग फारसे नव्हतेच ! अशा परिस्थितीत युरोपेतर जगातील सर्व बाजारपेठांचा कबजा करावा, अशी माफक अपेक्षा ठेवून त्यांचे राजकारण चालत होते.

चीनमधील यादवीचा फायदा घेऊन पूर्व चीनचा बराच भाग जपानने गिळंकृत केला होता. मांचुरिया त्यांनी जिंकून घेतला होताच. प्रिन्स कोनोये त्यावेळचा जपानी प्रधानमंत्री कर्तबगार होता. राजघराण्याशी त्याचे संबंध होते व सैन्याला फारसे वरचढ होऊ न देता त्याने सेनाधिकाऱ्यांशी चांगले संबंध राखले होते. जून ४० मधे फ्रान्सचा पराभव होताच, त्याने पराभूत फ्रेंच सरकारशी बोलणी करून फ्रेंच इंडोचायनात विमानतळ मिळवले व सप्टेंबर १९४० मध्ये मागे सांगितल्याप्रमाणे जपान व इटालीशी त्याने त्रिपक्षीय करार करून टाकला.

त्रिपक्षीय कराराचा मुख्य भाग हा होता, की जर ब्रिटनच्या वतीने अमेरिका युद्धात पडली, तर जर्मनी, इटलीच्या वतीने जपानने युद्धात पडले पाहिजे. हा करार करून प्रिन्स कोनोये याने एका दगडात दोन पक्षी मारले होते. जर्मनी युरोपात

रणांगणामागे रणांगण जिंकीत असल्यामुळे जर्मनीशी झालेल्या या मैत्रीकराराचे 'युद्धखोर' सेनाधिकाऱ्यांनी स्वागतच केले व प्रिन्स कोनोये याला जी गोष्ट अभिप्रेत होती, ती साध्य झाली—ती म्हणजे आहे त्या परिस्थितीत जर्मनीच्या व इटलीच्या मदतीला जाण्याचा प्रश्न निकालात निघाला होता. जर अमेरिका युद्धात पडली, तर जपानने युद्धात पडावयाचे होते !

त्रिपक्षीय कराराचा इटली हा सभासद लिमलोणचा होता. इटलीला स्वतंत्र असे धोरण नव्हतेच. जी फ्यूरर ठरवील तीच ड्यूसची पूर्वदिशा ठरणार होती. म्हणूनच या त्रिपक्षीय करारामागील हिटलरचा उद्देश फक्त महत्त्वाचा होता. हिटलरचा मुख्य हेतू हा होता, की जपानच्या भीतीने अमेरिकेने युद्धात पडू नये व इंग्लंड एकाकी राहावे. जोपर्यंत हिटलरने रशियावरील हल्ल्याचा निर्णय घेतला नव्हता, तोपर्यंत त्याची एवढीच अपेक्षा सहज पुरी होऊ शकत होती.

१९४१ साल उजाडले आणि हिटलरने रशियावरील हल्ल्याचा विचार पक्का करण्यास सुरवात केली. अर्थात ही गोष्ट जपानला कळवू नये, असा निर्णय त्याने केला होता.

## बर्लिनमध्ये जपानी परराष्ट्रमंत्री

२६ मार्च, १९४१ ला जपानचा परराष्ट्रमंत्री मात्सुओका बर्लिनमध्ये दाखल झाला. दुर्दैवाने त्याच रात्री युगोस्लोव्हियात बेलग्रेड येथे प्रतिक्रांती होऊन गडबड उडाली होती. (त्याची हकीकत मागील अंकात आली आहे.) त्या गडबडीत बेलग्रेड बेचिराख करण्याच्या योजनेचा हिटलर विचार करीत होता. २७ मार्चला दुपारी मात्सुओका व हिटलर यांची भेट झाली. या भेटीत हिटलरने एकच मुद्दा सतत मांडला—

"आताचा क्षण मोलाचा आहे. इंग्लंडच्या हातात चौपदरी घेण्याची पाळी आलेली आहे. यावेळी जपानने पॅसिफिकमधे आपला डाव साधून घेतला पाहिजे..."

हिटलरला २७ मार्चला भेटून मात्सुओका रोमला मुसोलिनीला भेटण्यास गेला. मुसोलिनीने मात्सुओकाला सांगितले—

"अमेरिका हाच खरा शत्रू आहे– रशियाचा क्रमांक दुसरा ठेवावा लागेल."

मुसोलिनी काय किंवा मात्सुओका काय, या दोघांना हिटलरने रशियावर हल्ला करण्याचा निश्चय पक्का झाला आहे, याची गंधवार्ताही लागू दिली नव्हती. परंतु मात्सुओकाच्या एक गोष्ट ध्यानी आली–हिटलर अमेरिकेशी युद्धाची भाषा बोलत नाही व पॅसिफिकमध्ये ब्रिटिशांना जपानने झोडावे असे सुचवितो, तर या उलट मुसोलिनीला मात्र अमेरिकाच खरा शत्रू वाटते ! या संदर्भात मात्सुओकाला जर्मन परराष्ट्रमंत्री रिबेन्ट्रॉपशी झालेल्या संभाषणातील एक भाग आठवला.

"मी परत जाताना मॉस्कोला थांबून रूसो–जपान अनाक्रमणाच्या करारासंबंधी प्राथमिक बोलणी करीन म्हणतो." मात्सुओका.

"नको, नको. शक्यतो मॉस्कोमधे यासंबंधी आपण तूर्त काहीच बोलू नये."
–रिबेन्ट्रॉप

मात्सुओका विचार करू लागला–पॅसिफिकमध्ये जपानने उचल करावी, असे फ्यूरर सांगतो, परंतु जपानने रशियाशी अनाक्रमणाचा करार करावा, अशी मात्र यांची इच्छा दिसत नाही ! हे काय गौडबंगाल आहे ? रशियाशी अनाक्रमणाचा करार करून पिछाडी बंद केल्याखेरीज जपान पॅसिफिकमधे पुढे कसा सरकणार ?

जपानी परराष्ट्रमंत्र्याला काहीतरी काळेबेरे शिजत असावे, असा वास आला. परंतु निश्चित सुगावा मात्र लागला नाही. मात्र त्याने एक गोष्ट निश्चित केली, की जपानला रशियाशी युद्ध अभिप्रेतच नसल्यामुळे रशियाशी अनाक्रमणाचा करार करून मोकळे व्हावे, हे चांगले ! बर्लिनमधून परतताना मात्सुओका मॉस्कोमधे थांबला व त्याने या कराराची प्राथमिक बोलणी करून रशियन वकिलाला टोकियोत निमंत्रण दिले.

१३ एप्रिल, १९४१ म्हणजे रूसो–जर्मन संबंध बिघडत चालल्याचा वास लागल्यापासून पंधरा दिवसांत मात्सुओकाने जपान–रशिया अनाक्रमणाचा करार घडवून आणला. या करारात एकच कलम होते––

"जपान व रशिया यांपैकी कुणी एक युद्धात गोवले गेले, तरी दुसऱ्याने करार मोडून शत्रूला मिळू नये."

थोडक्यात काय, वाटेल ते झाले तरी रशिया व जपानचे युद्ध होणार नाही ! !

मात्सुओकाने हिटलरवर नकळत मात केली होती. हा करार जाहीर होताच रिबेन्ट्रॉप व हिटलर चरकले, परंतु वरवर त्यांनी या कराराविरुद्ध चकार शब्द काढला नाही. याला कारण असे होते, की रशियाचा पराभव जपानच्या मदतीशिवाय आपण करू शकू, अशा घमेंडीत दोघे होते...२२ जून, ४१ पासून विजयामागे विजय मिळवीत जर्मन सैन्ये मॉस्कोच्या परिघापर्यंत पोचली आणि सप्टेंबर ४१ च्या सुमारास तिथे मात्र त्यांच्या दुर्दैवाचे दशावतार सुरू झाले. हे दशावतार सुरू होण्यापूर्वीच रिबेन्ट्रॉपने जपानमधील जर्मन वकील जनरल यूजेन ऑट् याला पुन: पुन्हा संदेश दिले होते––

"Do everything to get the Japanese to promptly attack Soviet Russia in the rear."

[जपानला सोव्हिएट रशियाच्या पाठीत वार करण्यास उद्युक्त करण्यासाठी सर्व काही करा.]

मात्सुओका त्या प्रयत्नाला लागला होता, परंतु जपानी मंत्रिमंडळाचा या रशियाच्या पाठीत वार करण्याच्या विचाराला पाठिंबा नव्हता. या रस्सीखेचीत मात्सुओकाच मंत्रिमंडळाबाहेर फेकला गेला व जर्मनीची जपान, रशियावर पाठीमागून वार करील ही आशा कायमची मावळली.

### जादूची अक्षरे

ऑगस्ट १९४१ पूर्वी मात्सुओका मंत्रिमंडळाबाहेर फेकला गेला, तेव्हा जर्मनीचा रशियातील पराभव सुरू झाला नव्हता. जपानबाबत जर्मनीची एक आशा माव-ळली होती, तरी एक जिवंत होती.

जपान पॅसिफिकमध्ये ब्रिटिशांवर तुटून पडेल व एवढे जपानने केले तरी अंतिम जयाच्या दृष्टीने ते मोलाचे ठरेल.

परंतु जपानी मंत्रिमंडळ केवळ जर्मनीचे युद्ध डोळ्यांपुढे ठेवून युद्धात पडू इच्छित नव्हते. रशियाविरुद्ध हल्ला करण्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवला नव्हता. पॅसिफिकमधून ब्रिटन व डचांचा काटा त्यांना काढावयाचा होता, ,परंतु हे शक्य होण्यासाठी त्यांच्या दृष्टीने प्रथम पॅसिफिकमधील अमेरिकन आरमाराची वासलात लावणे आवश्यक होते.

कारण जपानच्या हालचालीकडे अमेरिका क्रुद्ध नजरेने पाहात होती. जपानने फ्रेंच-इंडोचायनावर स्वारी करून तो जिंकला व जपान-अमेरिका यांचे वितुष्ट वाढू लागले. प्रिन्स कोनोये यांनी अध्यक्ष रुझवेल्ट यांची गाठ घ्यावी, असा विचार जपानी मंत्रिमंडळापुढे आला. शांततेच्या वाटाघाटी अमेरिकन अध्यक्षांबरोबर सुरू झाल्या व त्यातून जपान-अमेरिका संधी होऊ शकला नाही, तर अमेरिका युद्धात ओढली जाईल हे स्पष्ट होते. हे हिटलरला नको होते. परंतु त्याचबरोबर जपानशी संधी करून अमेरिकेला ब्रिटनला मदत करण्याची मोकळीक मिळावी, ही गोष्ट पण नको होती. यासाठी टोकियोतील जर्मन वकिलामार्फत रिबेन्ट्रॉपने जपानचे अमेरिकेतील वकील नोमुरा यांना संदेश पाठविला—

"अमेरिकेला हे स्पष्टपणे कळवा, की जर अमेरिकेने जपानचे दोस्त—जर्मनी व इटली यांना विघातक अशा हालचाली चालूच ठेवल्या, तर त्रिपक्षीय करारानुसार जपानला जर्मनी—इटलीस उघडपणे मिळावे लागेल."

नोमुरा यांना पाठवलेला हा रिबेन्ट्रापचा संदेश जसाच्या तसा, अमेरिकन वायर-लेस यंत्रणेने अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट कार्डेल हल् यांना पोचता केला. जपानची पावले पॅसिफिकमधे आक्रमणाच्या दिशेने पडू लागताच अमेरिकन शास्त्रज्ञांनी टोकियो-बर्लिन, टोकियो-न्यूयॉर्क दिले जाणारे जपानी गुप्त परिभाषेतील संदेश जसेच्या तसे हाती लागतील, अशी व्यवस्था केली होती. अशा हाती येणाऱ्या संदेशांना 'magics' (जादूची अक्षरे) असे अमेरिकन गोटात संबोधण्यात येत असे.

नोमुरा यांना १६ ऑक्टोबर, १९४१ ला हा जर्मन संदेश टोकियोमार्फत मिळाला.

### जनरल टोजो

आता त्याच दिवशी प्रिन्स कोनोये यांचे शांततावादी मंत्रिमंडळ गडगडले. सेनाधिकाऱ्यांनी आता जोर केला होता. जनरल हिडेकी टोजो हे जपानचे

नवे प्रधानमंत्री आता झाले. मुख्यमंत्री, गृहमंत्री व प्रधानमंत्री अशा तिन्ही जबाबदाऱ्या जनरल टोजो यांनीच स्वीकारल्या होत्या.

अधिकारावर येताच टोजो यांनी अमेरिकेत वाटाघाटी करण्याचा नोमुरा यांना गुप्त संदेश पाठवला–

" अमेरिकेला आपल्या अटी कळवा व २५ नोव्हेंबर, १९४१ पूर्वी काय तो निर्णय घेण्यास सांगावा. संधी व्हावयाचा असेल, तर तो २५ नोव्हेंबरपूर्वीच व्हायला हवा. "

' टोजो ' चा गुप्त संदेश जसा नोमुराला पोचला, तसाच अमेरिकन परराष्ट्रखात्याच्याही हाती पडला. अमेरिकेला आता अंदाज येऊ लागला, की जपान युद्धाच्या धमकीच्या जोरावर बरेच उकळू पाहणार आहे, तेव्हा कार्डेल हल यांनी २६ नोव्हेंबर, १९४१ उजाडताच नोमुरा यांना अमेरिकेच्या मागण्या स्पष्ट कळवल्या.

(१) जपानने चीन व इंडोचायना यांच्या भूमीवरील सर्व लष्करी, हवाई व आरमारी तळ खाली करावे व (२) चुंकिंग येथील 'रिपब्लिक ऑफ चायना'च्या राष्ट्रवादी सरकारखेरीज अन्य कुठल्याही चिनी राजवटीला जपानने मान्यता देऊ नये.

या मागण्या जपान मान्य करणे शक्यच नव्हते. वॉशिंग्टनमधील वाटाघाटी फिसकटल्या होत्या. या वाटाघाटी फिसकटाव्या व युद्ध पेटावे, हीच गोष्ट जनरल टोजोला अभिप्रेत होती. म्हणूनच २५ नोव्हेंबर, १९४१ लाच सायंकाळी जपानी विमानवाहू बोटी पर्ल हार्बरचे प्रस्थान ठेवून मार्ग आक्रमू लागल्या होत्या.

टोजो यांनी जर्मनीतील जपानी वकिलाला ३० नोव्हेंबर, १९४१ ला गुप्त संदेश पाठविला.–

"Will you immediately interview Chanceller Hitler and Foreign minister and say very secretely to them that there is extreme danger that war may break out between Anglo-Saxon nations & Japan, through some clash of arms and add that the time of breaking out of this war may come quicker than anyone dreams–"

[ तावडतोब चॅन्सेलर हिटलर व परराष्ट्रमंत्री रिबेन्ट्रॉप यांची गाठ घेऊन त्यांना अत्यंत गुप्त म्हणून असे सांगा, की अँग्लोसॅक्सन वंशाचे देश व जपान यांच्यात काहीतरी लष्करी झटापट होऊन युद्ध होण्याचा धोका निर्माण झाला आहे. प्रत्यक्षात हे युद्ध कुणाच्या ध्यानीमनी नसेल इतक्या लवकर सुरू होण्याची शक्यता आहे. ]

दि. ३० नोव्हेंबर, १९४१ लाच या गुप्त संदेशाची प्रत अमेरिकन परराष्ट्रखात्याने कार्डेल हल यांचे हाती ठेवली व अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट यांनी ही गोष्ट व हा गुप्त संदेश तावडतोब पंतप्रधान चर्चिल यांना कळवण्याची व्यवस्था केली. २ डिसेंबर, १९४१ ला टोजोच्या गुप्त संदेशाची प्रत चर्चिल यांच्याही हातात

पडली. चर्चिल सांगतात—

"I received the decode of the telegram on December 2. It required no special action from Britain. We must just wait."

[ 'डिकोड' केलेली ही तार माझ्या हाती डिसेंबरच्या दोन तारखेला पडली. यावर आता ब्रिटनने मुद्दाम असे काहीच करण्यासारखे नव्हते. वाट पाहण्याव्यतिरिक्त आम्ही काही करू शकत नव्हतो. ]

**जपानचा आत्मनाश !**

अमेरिकेशी पॅसिफिकमध्ये युद्ध करणे हा जपानचा आत्मनाश ठरणार आहे, याबद्दल चर्चिल यांची खात्रीच होती. निदान एक जपानी पिढी यात खतम होईल. यामुळे जपान असे काही करील हे त्यांच्या तर्काला पटत नव्हते. युद्धाच्या आठवणी लिहिताना चर्चिल यांनी लिहिले आहे—

"But Government and people do not always take rational decisions. Some times they take mad decisions. I have not hesitated to record repeatedly my dis belief that Japan would go mad. However sincerely we try to put ourselves in another persons, position, we cannot allow for processes of human mind and imagination to which reason offers no key.

Madness is however an affliction which in war carries the advantage of surprise."

[ सरकार व जनता नेहमीच तर्कशुद्ध निर्णय घेतात असे होत नाही. काहीवेळा त्यांचे निर्णय अतर्क्य असतात. मी पुन्हा पुन्हा ही गोष्ट सांगत आलो होतो, की जपान असा काही आत्मघातकी निर्णय घेईल, यावर माझा विश्वास नाही. परंतु ही गोष्ट तर खरीच, की कितीही सहानुभूतीने आपण दुसऱ्याच्या ठिकाणी आहोत, अशी कल्पना करून विचार केला, तरी दुसऱ्या माणसांची मने व कल्पनाशक्ती यांचा अचूक वेध करता येत नाही. मनाचे व्यवहार उलगडण्यास तर्क पांगळा ठरतो. परंतु असा वेडेपणा हा असा एक दुर्गुण आहे, की जो लढाईत धक्का देण्याच्या दृष्टीने उपयुक्तही ठरतो. ]

टोजो याने असा वेडेपणा आता पत्करण्याचे ठरवले होते. बर्लिनमधील जपानी वकील ओशिमा याने टोजो यांच्या संदेशाप्रमाणे रिबेन्ट्रॉपची भेट घेतली व पॅसिफिकमध्ये अपेक्षेपेक्षा फारच लवकर युद्ध सुरू होण्याची शक्यता आहे, ही गोष्ट रिबेन्ट्रॉपच्या कानी घातली. ओशिमा यांनी ओघानेच प्रश्न केला—

"ब्रिटनला मदत करणाऱ्या राष्ट्राशी (अमेरिकेशी) वितुष्ट येऊन युद्ध पेटलेच तर जर्मनीची भूमिका यात काय राहील ?"

उत्साहाच्या भरात मागचा पुढचा फारसा विचार न करता रिबेन्ट्रॉपने

आश्वासन दिले–" जर्मनी अमेरिकेशी ताबडतोब युद्ध सुरू करील. "

२६ नोव्हेंबरची ही घटना आहे. हिटलरने काही महिन्यांपूर्वीच जपान अमेरिकेविरुद्ध युद्धात पडले तर जर्मनीही अमेरिकेशी युद्ध सुरू करील, असे तोंडी आश्वासन दिले होते व त्याच आधारावर रिबेन्ट्रॉप हे बोलला. ही गोष्ट खरी असली तरी हिटलरला यावेळी पॅसिफिकमध्ये अमेरिकेची खोडी जपानने काढावी, असे मुळीच वाटत नव्हते. कारण मॉस्कोच्या परिसरात जर्मन सैन्याने पहिले पराभव खाण्यास सुरवात केली होती. यावेळी जपानने ब्रिटन-अमेरिकेशी युद्ध न करता, रशियाच्या पाठीत प्रथम वार करावा, अशी हिटलरची भूमिका बनत चालली होती. निदान युद्ध करावयाचे असेल तर फक्त ब्रिटनशी युद्ध करावे, अमेरिकेला युद्धात ओढू नये, अशा मतावर हिटलर पोचलेला होता.

## रिबेन्ट्रॉपची टाळाटाळ

२९ नोव्हेंबरला जपानी वकिलाला रिबेन्ट्रॉपने तोंडी आश्वासन दिले खरे, परंतु पुढच्या ४८ तासांत फ्यूररशी बोलणे होताच, म्हणूनच रिबेन्ट्रॉप फिरला ! ओशिमा जेव्हा लेखी आश्वासन आता मागू लागला, तेव्हा रिबेन्ट्रॉपने टाळाटाळ सुरू केली. त्याने जबाब दिला—

" फ्यूररशी विचारविनिमय केल्याखेरीज निश्चित काही सांगता येणार नाही. फ्यूरर रशियन आघाडीकडे गेलेला आहे. तो परत आला की मग काय ते पाहू ! "

तीन डिसेंबरला ओशिमाने पुन्हा तगादा लावला. " अमेरिकेविरुद्ध युद्ध सुरू करू, असे लेखी आश्वासन ताबडतोब द्या. परिस्थिती बिघडत चाललेली आहे–" परंतु ३ डिसेंबरला हिटलर दक्षिण रशियन आघाडीवर, रशियाने उघडलेल्या नव्या चढाईला कसे तोंड द्यावे, याचा जनरल क्लीस्टबरोबर विचारविनिमय करीत होता.

रिबेन्ट्रॉपशी जपानच्या मागणीबद्दल बोलणे करण्यास सवड मिळताच हिटलरने तिढा टाकण्यास सांगितले—

" जर्मनी अवश्य अमेरिकेविरुद्ध युद्धात पडेल, त्याचबरोबर जपानने रशियाविरुद्ध युद्ध पुकारले पाहिजे . . . . "

जपानी पंतप्रधान जनरल टोजो याला हिटलर असे काही करील, याची कल्पना असावी, म्हणून ओशिमा यांना पाठवलेल्या ३० नोव्हेंबरच्या पत्रात त्यांनी सूचना दिल्या होत्या.

"Say that by our present move we do not mean to relax pressure agaihst the Soviet and we are prepared to turn upon her. However, now it is to our advantage to stress the south and for the time being we prefer to rfreain from any direct move in the north. "

[ या बाबतीत असे सांगा, की दक्षिणेकडील या आमच्या हालचालीमुळे सोव्हि-

एट रशियावरील दडपण ढिले करण्याचा आमचा मुळीच इरादा नाही. आम्ही कधीही त्यांच्यावर उलटण्यास सिद्ध आहोत, परंतु अगदी आताच दक्षिणेकडे रेटा देणे आमच्या हिताचे आहे व सध्यातरी उत्तरेच्या बाजूस काही हालचाल करण्याची आमची इच्छा नाही. ]

## टोजोची हिटलरवर मात

ठकासी भेटला ठक! टोजोने हिटलरला न दुखवता रशियाविरुद्ध युद्ध करण्याचे टाळले व पुढे केव्हाही आम्ही रशियावर उलटू असे मधाचे बोट लावून, जर्मनीला मात्र तावडतोब अमेरिकेविरुद्ध युद्धात उतरण्याचा आग्रह कायम ठेवला.

ओशिमा याने रिबेन्ट्रॉपला वरील खुलासा केला. आता प्रश्न उरला फक्त जर्मनी अमेरिकेविरुद्ध युद्धात येणार की नाही?

सहा डिसेंबर उजाडला. जनरल झुकॉव्ह यांनी मॉस्को येथे रशियन सैन्याची तोंडे उलटीकडे फिरवून जर्मन सैन्य मागे रेटण्यास सुरवात केली होती. कडाक्याच्या थंडीत व बर्फात जर्मन सैन्य आता मारता मारता इंचाने... अर्ध्या इंचाने, परंतु मागे येऊ लागले होते!

इकडे पॅसिफिकमध्ये त्याच दिवशी सहा विमानवाहू बोटी, त्याचबरोबर संरक्षणाकरता लढाऊ जहाजे व क्रूझर्स, विमानवाहू बोटींवर ३६० बॉम्बर–डाइव्ह बॉम्बर्स इत्यादी विविध लढाऊ विमाने, असा मोठा जपानी आरमारी काफिला पर्ल हार्बरवर हल्ला करण्याच्या दृष्टीने जपानच्या उत्तरेस असलेल्या कुरल बेटापाशी येऊन थडकला होता. ॲडमिरल नागूमो याच्या अधिपत्याखालील हा आरमारी व विमान काफिला पर्लहार्बर येथील अमेरिकेचा पॅसिफिकमधील सर्वांत मोठा नाविक तळ पहिल्या धडाक्याला नेस्तनाबूत करण्यासाठी दबा धरून आता तयार होता. टोकियोहून इशारा येताच हे कृष्णकारस्थान उरकावयाचे होते.

सहा डिसेंबरला सायंकाळी टोजो यांनी बर्लिनमध्ये जपानी वकिलाला संदेश पाठविला.

"जर्मनांना हे सांगा, की अमेरिकेकडून येणारी शस्त्रास्त्रांची व इतर मदतीची जहाजे आम्ही रशियापर्यंत पोचू देणार नाही. आम्हाला रशियन जहाजे बुडवता आली नाही तरी अमेरिकन जहाजे बुडवायला प्रत्यवाय नाही. तेव्हा जर्मनीने अमेरिकेविरुद्ध युद्धात पडण्याचे आश्वासन तावडतोब द्यावे."

ही गोळी लागू पडली म्हणा, किंवा तर्काला न उलगडणारे निर्णयही घेतले जातात, याची पुनः प्रचीती म्हणून म्हणा— हिटलरने जपानने रशियाविरुद्ध युद्धात यावे, ही आपली अट मागे घेतली!

टोजो जर्मनीच्या होकार–नकारासाठी आता थांबायला तयार नव्हता. कारण अमेरिकेला कुरल बेटाकडे गेलेल्या जपानी आरमारी विमानवाहू बोटींचा सुगावा लागण्यापूर्वी पर्ल हार्बरवरील हल्ला उरकणे भाग होते. म्हणून टोजोने जर्मनीतील

जपानी वकील ओशिमा याला पुढे असेही कळविले होते, की जर्मनीची समजूत पटत नसेल, तर नाद सोडून द्या ! टोजोच्या सुदैवाने व नाझींच्या दुर्दैवाने, हिटलरने जपानला रशियाविरुद्ध युद्धात ओढण्याची ही मोठी संधी नीट रावविली नाही खरी. हिटलरचे चित्तही यावेळी ठिकाणावर नव्हते. पहिल्या पराभवाने मनाचा तोल सुटलेला फ्यूरर आपला राग सेनापतींच्या हकालपट्टीवर काढण्यात याचवेळी अधिक गर्क होता.

सहा डिसेंबरला रात्री ९ वाजता– त्या दिवशी शनिवार होता– टोजोने अमेरिकेतील जपानी वकिलातीला सर्व कागदपत्रे नष्ट करा, असा गुप्त संदेश दिला.

परंतु मागे सांगितल्याप्रमाणे हा संदेश गुप्त राहिला नाही. अमेरिकन वकिलातीने हा संदेश डिकोड केला होता व रात्री ९।। वाजता अमेरिकन आरमारातील एक अधिकारी व्हाईट हाउसवर धावत गेला. त्याने अध्यक्ष रुझवेल्ट व त्याचवेळी त्यांच्याबरोबर असलेल्या हॅरी हॉपकिन्स यांच्यापुढे जपानी गुप्त संदेशाची प्रत ठेवली.

हॉपकिन्स यांनी तो संदेश वाचला व लगेच ते उद्गारले–This means war ! ( याचा अर्थ युद्ध आले......' )

युद्ध आले ही बातमी शनिवारी रात्री ९।। वाजता हॅरी हॉपकिन्स व अध्यक्ष रुझवेल्ट यांना मिळूनही जपान कुठे व कसा हल्ला करणार किंवा करू शकेल, याचा काहीच विचार अमेरिकेने केलेला नव्हता.

जपान नेमके काय करणार आहे, याचा सुगावा अमेरिकन अध्यक्षांना नव्हता, अमेरिकेतील जपानी वकिलातीला नव्हता, हिटलरला नव्हता, मुसोलिनीला नव्हता, की मार्शल स्टॅलिनला नव्हता.

## पर्ल हार्बरवर हाहाःकार

रविवार उजाडला. सात डिसेंबर, १९४१. जपानी विमानवाहू बोटींवरून ३६० जपानी बॉम्बर्सचा तांडा पहाटे आकाशात उडाला व पर्ल हार्बरच्या दिशेने दिशा कापू लागला.

पर्ल हार्बर बंदरात यावेळी अमेरिकेची ९४ लढाऊ बोटी व जहाजे उभी होती. बरोबर सकाळी ७-५५ ला जपानी विमाने पर्ल हार्बरवर आली व पहिला बॉम्ब पडला. ज्या मोठ्या आठ लढाऊ बोटी होत्या, त्यांवर जपानी विमानांनी विशेष रोख धरला.

बॉम्बवर बॉम्ब आदळू लागले. एकच हाहाःकार उडाला. असल्या जागी बोटी पेटू लागल्या. धुराचे प्रचंड लोट पर्ल हार्बरवर काळोखी पसरवू लागले. लढाऊ जहाजे विमानविरोधी तोफा सुरू होण्यापूर्वीच रसातळाला जाऊ लागली. भयानक स्फोटांनी दिशा दणाणू लागल्या. ८ वाजून २५ मिनिटांनी सूर मारणाऱ्या विमानांनी बोटीच्या बबातून टॉरपेडो मारले. ' अरिझोना ' बोट पेटत होती. ' ओखामा ' बोट कलं-

डली होती. ' वेस्ट व्हर्जिनिया ' व ' कॅलिफोर्निया ' बुडालेल्या होत्या. ' पेनिसिल्व्हानिया 'वर बॉम्ब फुटत होते. २,००० अमेरिकन–यांत खलाशी, नागरिक व आरमारी अधिकारी होते–अंगावर कपडे चढविण्यापूर्वीच मारले गेले. त्यांची प्रेते सर्वत्र विखुरली होती. २,००० अमेरिकन जखमी होऊन मरणयातना भोगीत होते. एवढा अनर्थ करून १० वाजता जपानी विमाने परतदेखील गेली– !

पॅसिफिकमधील अमेरिकन आरमाराचा दोन तासांत फडशा उडाला होता. पॅसिफिकमधून अमेरिकेचे आरमारी वर्चस्व संपुष्टात आणून, जपानी आरमाराला आता पॅसिफिकमध्ये धुमाकूळ घालण्यास पूर्ण मुभा झाली होती.

अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारण्याची अधिकृत घोषणा व हा हल्ला एकदम करण्यात आला. ही राजनीती नव्हती. हा दगाफटका होता. हे कृष्णकृत्य करताना जपानने ' आंतरराष्ट्रीय डेट् लाईन ' चा फायदा घेतला. म्हणजे आधी युद्ध पुकारले व मग हल्ला केला असे दिसत असले, तरी हल्ला प्रत्यक्षात आधीच उरकण्यात आला होता.

रविवार सायंकाळपर्यंत जपानने अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारून, पर्ल हार्बर उद्ध्वस्त केल्याची हादरा देणारी बातमी सर्वत्र पसरली.

## एकाच जहाजावरचे प्रवासी

त्या रविवारी सायंकाळी विनांट व अव्हरेल हॅरिमन यांचेसह चर्चिल ' चेकर्स ' या आपल्या निवासस्थानी बोलत बसलेले होते. चर्चिल यांनी रात्री ९ वाजताच्या बातम्या ऐकण्याकरिता वायरलेस सेट सुरू केला. रशियन आघाडीवरील रणकंदनाच्या व लिबियातील लढाईच्या बातम्या सांगितल्या जात होत्या. या बातम्या संपल्या आणि अगदी शेवटी जपानी विमानांनी हवाई बेटानजीक अमेरिकन आरमारावर हल्ला केल्याची बातमी ध्वनिक्षेपित झाली. एकीकडे चर्चिल विनांटशी बोलत होते, परंतु अखेरची बातमी ऐकताच हॅरिमन यांनी कान टवकारले. चर्चिल यांचे बोलणे मध्येच थांबवीत हॅरिमन यांनी म्हटले, " अमेरिकेविरुद्ध जपानने हल्ला चढविल्याची बातमी आताच सांगितली गेली– "

चर्चिल यांनी पुढच्या निवेदनावर लक्ष देण्यास सुरवात केली न केली तोच चर्चिल यांचा बटलर सॉयर्स हा धावत खोलीत आला व म्हणाला–

" आम्ही आताच बाहेर ऐकले, जपानने अमेरिकेवर हल्ला केला आहे–."

चर्चिल लगेच उठले व आपल्या कचेरीत जाऊन त्यांनी रुझवेल्ट यांना फोन लावला.

दोनतीन मिनिटांत रुझवेल्ट फोनवर आले. चाचल यांनी विचारले–

" Mr. President, what is this about Japan ?"

(अध्यक्ष महाराज–जपानविषयी हे काय ऐकतो आहे ?)

" It is quite true. They have attacked us at the Pearl Harbour. We are all in the same boat now. "

[सर्व अगदी खरे आहे. त्यांनी आमच्यावर पर्ल हार्बर येथे हल्ला केला आहे. आता आपण एकाच जहाजातील प्रवासी झालो आहोत. ]

जपानने अमेरिकेवर हल्ला केला, याची आपली प्रतिक्रिया चर्चिल यांनी कसलाही आडपडदा न ठेवता नोंदविली आहे–


"No American will think it wrong of me, if I proclaim that to have U. S. A. at our side was to me the greatest joy. I could not foretell the course of events; I do not pretend to have measured accurately the martial might of Japan, but now at this very moment I knew the U. S. was in the war, up to neck and into the death."

[अमेरिका युद्धात ओढली जाऊन आमच्या खांद्याशी खांदा लावून उभी राहणार, या घटनेने तेव्हा मी विलक्षण आनंदित झालो, असे मी आता जाहीरपणे सांगितले तर कोणाही अमेरिकन माणसाला त्यात वावगे वाटू नये. पुढे काय घटना घडणार होत्या, हे मी सांगू शकत नव्हतो..जपानच्या लष्करी सामर्थ्याचा अचूक अंदाज मला होता, असाही दावा मी करीत नाही, परंतु त्या विवक्षित क्षणी मला एवढेच समजत होते, की अमेरिका अगदी गळ्यापर्यंत आता युद्धात उतरलेली आहे आणि मरणाच्या गतीपर्यंत ती युद्धातच राहणार आहे. ]

आठ डिसेंबर, १९४१ ला इंग्लंडने जपानविरुद्ध युद्ध जाहीर केले. चर्चिल यांनी हा निर्णय घेताना अमेरिकेला तुम्ही जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारा, तरच आम्ही जपान-विरुद्ध युद्ध पुकारू, अशी कोणतीही अट घातली नाही. याचे कारण जर्मनी अमेरिके-विरुद्ध युद्ध पुकारण्याची शक्यता आहे, ही गोष्ट टोकियो–बर्लिन येथील संदेशाच्या देवाणघेवाणीची जी बित्तंबातमी अमेरिकेमार्फत चर्चिल यांना होती, त्यावरून स्पष्ट होती. प्रश्न होता जर्मनी अमेरिकेविरुद्ध युद्ध केव्हा पुकारतो एवढाच! अर्थात अशी काही हेरगिरी शक्य झाली नसती, तरीही चर्चिल यांनी असा आग्रह धरला नसता. कारण चर्चिल यांना ही गोष्ट समजत होती, की सामान्य मानवी तर्कानुसार जपान–अमेरिका युद्ध पेटल्यावर, जर जपान–जर्मनी सहकार्य व गळ्यात गळा चालूच राहिला, तर अमेरिकेला जर्मनीची गय करता येणार नाही. जर्मनीच्या चिथावणीने जपान उन्मत्त होऊन युद्धखोर झाला असताना, जपानबरोबरच्या युद्धात मरणारे अमेरिकन सैनिक म्हणजे हिटलरबरोबरील चहापानातील पडलेल्या माशा होत, असे म्हणण्याइतके अमेरिकन सरकार देशबुडवे नाही, अशी चर्चिल यांची खात्री होती.

### पहिला ठोसा आम्हीच देणार

जपानच्या युद्धप्रवेशाची धक्कादायक बातमी कळताच हिटलर ८ डिसेंबरला रात्री बर्लिनला परतला. रिबेन्ट्रॉपशी त्याने बोलणी केली. त्रिपक्षीय करारानुसार




जानेवारी १९४२

जपानवर कुणी हल्ला केला, तरच मदतीस जाण्यास जर्मनी बांधलेला आहे. यावेळी जपानने हल्ला केला असल्यामुळे त्रिपक्षीय करारान्वये जर्मनीला अमेरिकेविरुद्ध युद्धात पडण्याची जरूरी नाही, अशी पळवाट रिबेन्ट्रॉपने सुचवली. परंतु जो विचार चर्चिल यांनी केला, तोच अखेर हिटलरने केला असावा. इंग्लंडला सर्वतोपरी मदत करणारी व अटलांटिक चार्टरमध्ये नाझीवाद गाडण्यासाठी सिद्ध असल्याचा पुकारा करणारी अमेरिका जर्मनीविरुद्ध आज ना उद्या युद्ध पुकारणारच, असा त्यांचा बरोबर कयास होता, तेव्हा अमेरिकेने युद्ध पुकारण्याची वाट पाहण्यापेक्षा आक्रमणाचा पवित्राच कायम ठेवण्यासाठी हिटलरने अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारण्याचा निर्णय तडकाफडकी घेतला. या त्याच्या कारणपरंपरेचे प्रतिबिंब ११ डिसेंबरला त्याने राईशस्टॅगपुढे जे भाषण केले, त्यात स्पष्टपणे दिसते. त्यात त्याने सांगितले—

"We will always strike first. We will always deal the first blow."

[आम्हीच प्रथम प्रहार करणार! पहिला ठोसा आम्हीच देणार..]

शिवाय दुसरे महत्त्वाचे कारण हे होते, की ज्या तडाखेबंदपणे पाताळयंत्री जपानने पहिला रट्टा दिला होता, त्यावरून अंदाज बांधावयाचा तर एकदा पॅसिफिकमधून अमेरिका–ब्रिटनला हुसकले, की तो कबूल केल्याप्रमाणे रशियावर उलटणारच, अशी हिटलरची रास्त अपेक्षा होती. ११ डिसेंबर, १९४१ ला राईशपुढील भाषण व अमेरिकेविरुद्ध युद्धघोषणा, असा कार्यक्रम हिटलरने आखला व तो भाषणाच्या तयारीला लागला. युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिकेने केलेल्या जर्मनविरोधी कृत्यांची

यादी तयार होऊ लागली. अमेरिकेतील जर्मन वकील थॉमसेन याने ११ डिसेंबरला दुपारी ३–३० वाजता कार्डेल हल यांच्या हातात काय मसुदा ठेवायचा, याचा संदेश १० डिसेंबरला पाठवला गेला. ११-१२-४१ ला जर्मनीने अमेरिकेविरुद्ध युद्ध घोषित केले व त्याच दिवशी राईशपुढील भाषणात हिटलरने सांगितले––

## युद्धखोर अमेरिका

"हा माणूस (प्रे. रुझवेल्ट) मला गुंड (gangster) समजतो, यात मला फारसे काही वाटत नाही. कारण 'गँग्स्टर' हा शब्दच मुळी युरोपातला नसून, तो अमेरिकेतला आहे. ते काही असो, परंतु माझा अपमान रुझवेल्टकडून होऊच शकणार नाही. कारण रुझवेल्ट हा एक मूर्ख माणूस आहे, असे मी समजतो–जसा विल्सन होता. प्रथम युद्धाला चिथावणी द्यायची, मग खोटीनाटी कारणे तयार करावयाची, मग ख्रिश्चन धर्माचा ढोंगी बुरखा पांघरावयाचा व मानवजातीला युद्धाच्या खाईत ढकलावयाचे, हा या अमेरिकनांचा धंदाच आहे."

"रुझवेल्ट हा श्रीमंत घराण्यात जन्माला आलेला आहे. लोकशाही राजवटीत श्रीमंतांचे जीवनप्रवाह नेहमीच सुखासीनरीतीने होत असतात. माझा जन्म गरीब कुळात झाला व मला माझा मार्ग झगडा करीत काढावा लागला. जेव्हा पहिले महायुद्ध सुरू झाले, तेव्हा रुझवेल्ट अशा ठिकाणी होते, की तेथून आरामात त्यांना लढाईचे फक्त परिणाम पाहात बसता आले. दुसऱ्यांचे रक्त गळत असताना जे व्यापार–उदिमात गर्क असतात; त्यांनाच हे शक्य असते. मी तेव्हा साधा सैनिक होतो. वरून येईल त्या आज्ञेप्रमाणे लढत होतो. अर्थातच लढाईवरून मी परतलो तेव्हा, १९१४ साली होतो, तसाच पूर्वीसारखा गरीब होतो. युद्धानंतर रुझवेल्ट यांनी शेअरबाजारात उलाढाली केल्या. जगात आलेल्या मंदीचा व लोकांच्या दुःख-दैन्याचा फायदा घेऊन गडगंज पैसा केला. मी हॉस्पिटलात जखमी होऊन पडलेला होतो..."

"ज्यावर्षी मी राईशचा अधिकारी झालो, त्याचवर्षी रुझवेल्ट अमेरिकेचे अध्यक्ष झाले. जर्मनीत नाझी राजवटीमध्ये आर्थिक क्षेत्रात, कलेच्या व सांस्कृतिक क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती घडून आली, परंतु त्याच काळात प्रे. रुझवेल्ट यांना अमेरिकेची यत्किंचितही प्रगती करता आलेली नाही. याला कारण प्रे. रुझवेल्ट यांनी भोवती जमा केलेली ज्यू वंशाची भुतावळ."

"मग अर्थातच प्रे. रुझवेल्ट हे जगात कुठे युद्ध पेटवता येईल, या उद्योगाकडे पुन: वळले. जगात कुठे ना कुठे युद्धाची ठिणगी पडावी, यासाठी हा मनुष्य गेली कित्येक वर्षे प्रयत्नात होता. जगात कुठे युद्ध सुरू नसेल, तर यांच्या कारखान्यांत तयार होणाऱ्या शस्त्रास्त्रांना बाहेर मागणी कशी येणार ?"

"जर्मन देशाविषयी विचाराल तर आम्हाला एखाद्या रुझवेल्ट किंवा चर्चिलच्या दयाबुद्धीवर जगण्याची इच्छा नाही. जर्मनीला आपले हक्काचे स्थान हवे आहे.

जगण्याचा आपला अधिकार असले छपन्न रुझवेल्ट व चर्चिल आमच्याविरुद्ध उठले तरी जर्मनी सोडणार नाही. "

" निदान जगात एकतरी राष्ट्र अमेरिकेला घडा शिकविण्यासाठी उद्युक्त झालेले पाहून तुम्हा सर्वांना मोठा दिलासा वाटला असेल. जपानच्या सरकारने अनेक वर्षे यांच्याशी वाटाघाटी करून शांततेने प्रश्न सोडविण्याची कोशीस केली. अखेर त्यांचीही दमछाक झाली. "

" आमचे युद्ध सुरू झाल्यापासून आमच्याविरुद्ध अमेरिकेने इतक्या गोष्टी केल्या, की फक्त युद्धच पुकारायचे बाकी ठेवले. पण पहिला प्रहार आम्हीच करणार ! पहिला ठोसा आम्हीच देणार, असा निश्चय असल्यामुळे मी अमेरिकन वकिलाला पासपोर्ट देऊन मायदेशी पाठविण्याचे ठरवले आहे. जर्मनी आजपासून अमेरिकेला आपला शत्रू समजून त्याच्याविरुद्ध युद्ध घोषित करीत आहे. "

अमेरिकेविरुद्ध हिटलरने केलेले हे आरोप व आज अमेरिकेविरुद्ध कमुनिस्ट करीत असलेले आरोप यांतील विलक्षण साम्य लक्षणीय आहे. हुकूमशाही शक्ती, मग त्या नास्तिकवादी असोत वा कम्युनिस्ट असोत, त्यांना जगातील सर्वांत मोठी श्रीमंत लोकशाही असलेल्या अमेरिकेचे अस्तित्व हे सतत धोकादायकच वाटत राहणार.

## ते चित्र, हे चित्र !

सहा महिन्यांत युद्धाचे चित्र केवढे बदलले पाहा. सहा महिन्यांपूर्वी हिटलर-समोर फक्त घायाळ झालेले ब्रिटन हा एकच शत्रू होता. लढाई जवळजवळ जिंकल्यासारखीच होती. आता या घडीला मात्र जगातली तीन मोठी उद्योगप्रधान राष्ट्रे हिटलरविरुद्ध उभी ठाकली होती. अखेर शेवटी युद्धे ही आर्थिक ताकदी-शिवाय रेटता येत नसतात. इंग्लंड, रशिया व अमेरिका ही तीन राष्ट्रे एकटचा जर्मनीविरुद्ध आर्थिकदृष्टचा अधिक संपन्न ठरणार होती. इतकेच नव्हे तर मनुष्य-बळातही जर्मनी, इटली, जपान या तिघांपेक्षाही वरचढ ठरणारी होती. १९४१ साल संपण्याच्या संधिकाळात हिटलर व त्याचे नाझी अनुयायी हे या महत्त्वाच्या गोष्टीचा विचारही करू शकले नाहीत, हे त्यांचे दुर्दैव होय !

अमेरिकेशी युद्ध पुकारताच ब्रिटिश आपल्याविरुद्ध युद्ध पुकारणार, याची जपान्यांना अटकळ होती. जपानी विमाने—डाइव्ह बॉम्बर्स—ही ब्रिटिश युद्धनौकांच्या मागावर सुटलेली होती. ९–१२–१९४१ ला जपानविरुद्ध युद्ध घोषित करून चर्चिल यांनी रात्री आरमारदल-प्रमुखांची बैठक बोलावली. अतिपूर्वेकडे ब्रिटनने तावडतोब काय करावे, याचा अपरात्रीपर्यंत खल चालू होता. दोन मोठ्या ब्रिटिश युद्धनौका " प्रिन्स ऑफ वेल्स " व " रिपल्टस " या सिंगापूरला पोचलेल्या होत्या. या युद्ध-नौकांनी पॅसिफिकमध्ये घुसून, पर्ल हार्बरच्या वाताहतीतून वाचलेल्या अमेरिकन आरमारी दलाला सहाय्य करावे, की सिंगापूरच्याच परिसरात राहावे, याचा निर्णय

सकाळवर ढकलण्यात आला व रात्रीची बैठक संपली.

परंतु १० डिसेंबरला म्हणजे दुसऱ्या दिवशी ही दोन्ही जहाजे जपानी विमानांनी समुद्रतळाला धाडून ब्रिटिशांना हादरा दिला. आश्चर्य म्हणजे या दोन्ही युद्धनौका एकमेकांपासून हाकेच्या अंतरावर असताना बुडविण्यात आल्या.

चर्चिल यांना दोन्ही युद्धनौका जपान्यांनी बुडवण्याची बातमी फोनने कळताच त्यांचे हातपाय गळाले. आठवणीत चर्चिल लिहितात–

" So I put the telephone down. I was thankful to be alone. In all the war, I never received a more direct shock. As I turned over & twisted in my bed, the full honour of the news sank in upon me. There was no British or American capital ship in the Indian ocean or in the Pacific. Over all the expanse of waters Japan was supreme & we were weak & naked. "

[ मी टेलिफोन खाली ठेवला. माझ्या आसपास त्यावेळी कोणी नव्हते, हे उपकारच होते. सर्व युद्धकालात मी यापेक्षा अधिक मोठा आघात–असा थेट सोसला नाही. मी अंथरुणावर सारखा या कुशीवरून त्या कुशीवर होत असताना या आघाताची भयानकता मला अधिकाअधिक खचवून टाकीत होती. हिंदी महासागरात किंवा पॅसिफिकमध्ये नाव घेण्याजोगे एकही ब्रिटिश वा अमेरिकन जहाज आता उरलेले नव्हते. या अतिप्रचंड जलाशयावर जपानची सत्ता आता सार्वभौम झाली होती आणि आमची स्थिती केविलवाण्या नागव्यासारखी झालेली होती.]

## चर्चिल–रुझवेल्ट भेट

आता काय होणार, हे चर्चिल यांना क्षणभर उमगेना. अमेरिका युद्धात पडली होती खरी—हे वरदान ठरणार होते आणि काहीसा शापही–कारण आता अमेरिका आपली सर्व शक्ती जपान्यांना तडाखे देण्यासाठी एकत्रित करणार, हे उघड दिसत होते. स्वतःचे संरक्षक व आक्रमक युद्ध सांभाळून अमेरिका आता ब्रिटनला पूर्वीप्रमाणेच मदत कशी काय करणार ? चर्चिल यांना खात्रीपूर्वक असेच वाटत होते, की हिटलरविरुद्ध सुरू असलेले हेच प्रमुख युद्ध समजले गेले पाहिजे. एकदा हिटलर जमीनदोस्त झाला, की बाकीची आक्रमक राष्ट्रे उखडायला वेळ लागणार नाही. या दृष्टीने १२ डिसेंबरला चर्चिल यांनी अमेरिकेला जाण्याचे प्रस्थान ठेवले.

रुझवेल्ट भेटीसाठी बोटीवर चढण्यापूर्वीच हिटलरने अमेरिकेविरुद्ध युद्ध घोषित करून चर्चिल यांना बरेच काळजीमुक्त केले. म्हणजे आता हिटलर हा अमेरिकेचाही सरळ सरळ शत्रू झाला होता.

आठ दिवसांच्या जलप्रवासात चर्चिल यांनी आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून, प्रथम दोस्तांनी आफ्रिकेत उतरावे व पाठोपाठ शक्य तितक्या लवकर इंग्लिश खाडी ओलांडून फ्रान्समध्ये उतरावे, असा कार्यक्रम रुझवेल्ट यांच्यापुढे विचा-

रार्थ ठेवण्याचे ठरवले. चर्चिल यांचे हे युद्धधोरण बिनचूक होते. कारण अमेरिकन लष्करी तज्ज्ञ नेमके याच पद्धतीने विचार करीत होते. अर्थात या कार्यक्रमावर चर्चिल यांना रुझवेल्टची अनुमती मिळवण्यास मुळीच त्रास झाला नाही.

अध्यक्ष रुझवेल्ट यांनी अमेरिकेच्या युद्धसाहित्यनिर्मितीचे नवे वेळापत्रक पक्के केले. पुढील एक वर्षात अमेरिकेने जे युद्धसाहित्य निर्माण करण्याचे आश्वासन चर्चिल यांना दिले, त्याची यादी नुसती वाचली, तर अमेरिकेला युद्धात ओढून जपानने हिटलरच्या गळयात कसा धोंडा अडकवला, याची कल्पना येईल. १९४२ साली अमेरिकेने युद्धसाहित्य-निर्मितीची खालील उद्दिष्टे निश्चित केली.

| | |
|---|---|
| ४५,००० | लढाऊ विमाने |
| ४५,००० | टँक्स् |
| २०,००० | विमानविरोधी तोफा |
| १४,९०० | टँकविरोधी तोफा |
| ५,००,००० | मशिनगन्स् |

जपानी किंवा जर्मन-हल्ल्यापासून सुरक्षित अशा ठिकाणी अमेरिकन अस्त्रांचे हे कोठार निर्माण होऊ लागले. सर्व दृष्टीने ब्रिटिशांना अनुकूल असे युद्धनिर्णय पक्के करून चर्चिल यांनी १४ जानेवारी, १९४२ ला अमेरिका सोडली.

## रोमेलची पुन्हा धमाल

चर्चिल–रुझवेल्ट यांचा हिटलरच्या सैन्याचा पराभवच प्रथम कसा घडवून आणावा, याचा विचारविनिमय अमेरिकेत चालू असताना, तिकडे आफ्रिकेत रोमेलने पुन: धमाल उडवून दिली होती. त्याला हवे असलेले युद्धसाहित्य अखेर हिटलरने रवाना केले होते व भूमध्यसमुद्रातून आता ब्रिटिशांचे जवळजवळ उच्चाटन करण्याचाच घाट रोमेलने घातला होता. अेल्अघेला या ठाण्यापासून रोमेलने चढाईला सुरवात केली. सायरेशियाचा पुन: त्याने कबजा केला व ब्रिटिश–हिंदी सैन्य ३०० मैल मागे हटत बेंगाझी सोडून पळाले. बेंगाझी येथे जनरल ऑचिनलेक यांनी उन्हाळयातील चढाईकरता एकत्र केलेले युद्धसाहित्य व रसदही अलगद रोमेलच्या हाती पडली. अखेर फेब्रुवारीत टोब्रूकपाशी रोमेल थबकला व पुढील चढाईची तयारी करू लागला.

याच काळात झपाटयासरशी फिलिपाईन्समधील बाटनचे आखात जपान्यांनी कबजात घेतले व मॅकऑर्थरचे सैन्य तेथून पळाले. न्यू ब्रिटन व सालोमन बेटे जपान्यांनी जिंकली. मलाया व ब्रह्मदेशात जपानी सैन्य पुढे सरकत होते. १५ फेब्रुवारी, १९४२ ला सिंगापूर जपान्यांच्या हाती पडले. सिंगापूरला ८५,००० ब्रिटिश सैन्य जपानला शरण गेले. ब्रिटिशांच्या इतिहासात एवढया मोठया संख्येने ब्रिटिश सैन्य शरण गेल्याचे उदाहरण नाही.

रशियात घुसलेली सैन्ये वेळच्यावेळी मागे न घेण्याच्या बाबतीत हिटलरने जो

कठोरपणा दाखवला व असंख्य जर्मन सैनिकांचे बळी दिले, त्याचा परिणाम हा झाला, की रशियाने सुरू केलेल्या चढाईला सर्व आघाडीवर तात्काळ पायबंद बसला, २० फेब्रुवारीपर्यंत रशियन चढाईची वाफ विरून गेली व मार्च उजाडताच सर्व आघाडी थंडावली

उन्हाळ्यातील चढाई पुनः सुरू करण्यास अजून दोन महिन्यांचा अवधी होता. या चढाईत जर्मनीचा रोख मुख्यतः कॉकेशसवर राहणार होता. कॉकेशसच्या तेलखाणी ताब्यात घेऊन रशियन सैन्याच्या नाड्या तोडल्याशिवाय रशियाचा पराभव शक्य होणार नव्हता. कॉकेशसच्या खाणी हातातून न सोडण्याचा रशियनांचा आता निर्धारच होता. प्रत्यक्ष खाणी हातात पडण्यापूर्वी स्टॅलिनग्राडचा कबजा मिळाला, तरी हे तेल मध्यरशियात पोचणे कठीण होणार होते व स्टॅलिनग्राड जर्मनांच्या हाती पडणे, हे रशियाच्या दृष्टीने कॉकेशसच्या खाणीवर जर्मनांनी कबजा करण्यासारखेच होते. कॉकेशसमधून निघणारे तेल मुख्यतः स्टॅलिनग्राडमार्गे मॉस्कोपर्यंत जात असे. म्हणून स्टॅलिनग्राडच्या चढाईची तयारी करणारा जर्मन सेनानी जनरल पोलस (Paulus) याच्याजवळ हिटलरने यावेळी उद्गार काढले होते--


" If I do not get the oil of Maikop & Grozny then I must end this war- "

[जर मैकाप व ग्रोझ्नी येथील तेल हाती पडले नाही, तर मला हे युद्ध संपवावे लागेल.]

### हिटलरची नवीन सैन्यभरती

विमाने-टँक्स चालू राहण्यासाठी कॉकेशसचे तेल हवे होतेच, परंतु यापेक्षाही हिटलरला लगोलग सैन्यभरतीसाठी माणसे हवी होती. ११,६७,८३५ एवढे जर्मन सैन्य रशियन स्वारीत मारले. आतापर्यंत जखमी वा पकडले गेले होते, यांची जागा घेण्यासाठी तरुण रक्ताचा तुटवडा भासत होता. याची तरतूद करण्यासाठी जनरल कायटेल् हा जर्मनीच्या अंकित देशांच्या राजधान्यांत वाऱ्या करीत होता. मुसोलिनीला इटालियन सैन्य रशियन आघाडीवर पाठवण्यास उद्युक्त करण्यासाठी खास गोअरिंगची रवानगी रोमला करण्यात आली होती. या धमकीवजा विनंत्याना यश येऊन रुमानियन, हंगेरियन व इटालियन सैन्याच्या तुकड्या मार्च महिन्यात रशियात दाखल होऊ लागल्या होत्या.

सैन्य-तुटवड्याची ही जाहिरात मुसोलिनीच्या मनात जर्मनीविषयी साशंकता निर्माण करीत आहे, या संशयामुळे एप्रिलच्या २९ व ३० तारखेला साल्झबर्ग येथे हिटलरने मुसोलिनीची भेट घेतली. यावेळी मुसोलिनीचा जावई सियानो हजर होताच. या भेटीत हिटलर थोडा थकलेला असून, त्याचे बरेच केसही पांढरे होत गेल्याचे सियानोच्या लक्षात आले. आपल्या दैनंदिनीत सियानोने लिहिले आहे--



'प्रिन्स ऑफ वेल्स' या ब्रिटिश युद्धनौकेवर रुझवेल्ट, चर्चिल आणि अधिकारीवर्ग 'Onward Christion Soldiers' हे प्रार्थना गीत गात असताना...

"Fuehrer looked tired. The winter months in Russia have boarn heavily upon him. I see for the first time that he has many gray hair...."

याच सुमारास गोबेल्सने आपल्या दैनंदिनीत हिटलरवर आता म्हातारपणाची झाक आली असल्याचा उल्लेख केलेला आढळतो. गोबेल्स लिहितो—

"I noted that he has already become quite gray. He has a physical revulsion against frost & snow. What worries and torments the Fuehrer most is that the country is still covered with snow."

[ हिटलरचे बरेच केस करडे झाल्याचे माझ्या ध्यानात आले. बर्फाचा त्याला वीट आला आहे. फ्यूररला जाळणारी चिंता व व्यथा एकच आहे, की अजून रशियन भूभाग बर्फाच्छादितच आहे. ]

या भेटीतही हिटलरच सारखा बोलत होता व मुसोलिनी ऐकत होता. सियानो लिहितो—

"Hitler talks, talks, talks: Musolini suffers. War and peace, religion and philosophy, art & history. Musolini looked at his wrist watch. General Jodl after an epic struggle finally went to sleep. Kietel was reclining but he succeeded in keeping his head up."

[ हिटलर बोलतो आहे, बोलतो आहे, बोलतोच आहे. मुसोलिनीचे हाल आहेत ! युद्ध आणि शांतता, धर्म आणि तत्त्वज्ञान, कला आणि इतिहास, मुसोलिनीने मनगटावरच्या घड्याळात पाहिले. जनरल जोडलने अखेर झोपेला शरणागती दिली. कायटेलच्या डोळ्यांवर झोप घसरली आहे. तो पेंगुळला आहे, परंतु मान ताठ ठेवण्यात त्याला कसेतरी यश मिळालेले दिसते. ]

गोअरिंग, कायटेल यांच्या प्रयत्नांना यश येऊन १९४२ उजाडण्यापूर्वी २७ रुमानिया, १३ हंगेरियन, ९ इटालियन, २ स्लोव्हाक व, १ स्पॅनिश अशा ४१ तुकड्या (Divisions) सैन्य रशियात जर्मन सैन्याच्या दिमतीला हिटलरने उभे केले.

मे महिना उजाडला. रशियातील जर्मन चढाई सुरू होण्यापूर्वीच फेब्रुवारीत टोब्रूकपर्यंक येऊन थबकलेल्या रोमेलच्या सैन्याने (African corps) नव्या चढाईला प्रारंभ केला. ब्रिटिश व हिंदी सैन्य पळू लागले. आदल्या वर्षी ब्रिटिशांनी जवळजवळ २७० दिवस झुंजवलेले टोब्रूक या धडाक्यात २१ जूनला रोमेलने काबीज केले व दोन दिवसांनी त्याची सैन्ये इजिप्तमध्ये घुसली. जून संपण्यापूर्वी अलेक्झांड्रियापासून ६५ मैलांवर असलेल्या एल् अलेमिन् या शहरापर्यंत रोमेल पुन: येऊन थडकला.

यावेळी दोस्त सेनानी चकित होऊन नकाशात डोके खुपसून माघारीच्या फक्त बातम्या ऐकत होते. इजिप्त सर करून रोमेल लवकरच कॉकेशसकडे वळून, रशियात पुढे सरकणाऱ्या जर्मन सैन्याशी हातमिळवणी करणार, याबद्दल दोस्त सेनानींना आता संशयच उरला नाही.

परंतु रोमेलला आता फील्ड मार्शल हा किताब देऊन हिटलरने त्याचा सन्मान जरी केला, तरी रोमेलच्या या पराक्रमाचा उपयोग लिबियातून फक्त ब्रिटिशांना हुसकण्यापुरताच हिटलरला अभिप्रेत होता. इजिप्त काबीज करून सुवेझ कालवा हस्तगत करण्याचे महत्त्व हिटलरला पटलेले नव्हते व यामुळे रोमेलला आणखी मदत देण्यास त्याने ऐनवेळी पुन: नकार दिला.

एल् अलेमिनला रोमेल पोचला तेव्हा त्याच्याजवळ चालू स्थितीत असे फक्त १३ ट्रँक्स होते, यावर कुणाचा विश्वास बसेल काय ?

### रोमेल इजिप्तमध्ये

परंतु ही गोष्ट खरी होती. कारण दोस्त लष्कर पळत होते, तरी भूमध्यसमुद्रातील सिसिली बेट व लिबियाचा किनारा यांच्यामधील माल्टा या बेटावर ब्रिटिश

आरमाराने व विमानदलाने पकड ठेवलेली होती. रोमेलला इटालीमार्गे जाणाऱ्या रसदीच्या व शस्त्रास्त्रांच्या बोटी ब्रिटिश आरमाराने बुडवल्या होत्या. जूनच्या पहिल्या आठवड्यात भूमध्यसमुद्रातील माल्टा बेटाचा काटा, आता त्याचा नायटा झाल्यामुळे त्वरित काढून टाकू, असा आग्रह जनरल रीडरने हिटलरपाशी धरला. ज्या पद्धतीने जर्मन छत्रीधारी सैनिकांनी क्रीट बेटाचा कबजा केला, त्याप्रमाणे माल्टा कबजात घेऊन ब्रिटिश आरमाराला तेथून हुसकल्याखेरीज रोमेलची रसद अखंड चालू राहणार नाही, हे जनरल रीडरने हिटलरच्या पदोपदी नजरेस आणून पाहिले. परंतु हिटलरचे लक्ष इजिप्तकडे फारसे नव्हतेच. माल्टावर बॉम्बफेक करा व रोमेललाही अधिक पुढे तूर्त सरकण्याची गरज नाही, असा चुकीचा युद्धपवित्रा हिटलरने यावेळी घेतला. दैवाने या युद्धातील हिटलरला दिलेली अखेरची सुवर्णसंधी त्याने गमावली.

३ जुलै १९४२ ला एल् अलेमिन् येथील ठाण्यात बसून रोमेल लिहितो–

" Our strength has faded away–"

[ आमचा जोर ओसरून गेला आहे. ]

रोमेलची सैन्ये इजिप्तमध्ये घुसली. आता लवकरच ती अलेक्झांड्रियात शिरणार, तेव्हा रोमेलबरोबर आपणही विजयाच्या दिमाखासाठी हजर असावे, या इच्छेने मुसोलिनीची स्वारी लिबियात दाखल झाली होती. २ जुलैला त्याने हिटलरला तार केली–" इजिप्तमधील भावी सरकारसंबंधी कसे काय ठरवायचे ते कळवा " रोमेलला सर्व लष्करी अधिकार द्यावे व जबाबदार इटालियन माणसास इजिप्तचा मुलकी कारभारी नेमावे, अशा सूचनाही मुसोलिनीने पाठवल्या.

हिटलरचे उत्तर आले– " Matter is not urgent. " (या गोष्टी ठरविण्याची आताच जरूरी नाही.) हिटलरने असे उत्तर धाडावे याचे कारण- हेच होते, की रशियाला जमीनदोस्त करण्यापूर्वी हिटलर आपली शक्ती इजिप्तसाठी खर्च करण्यास आता मुळीच तयार नव्हता.

हिटलरने केवढी सुवर्णसंधी गमावली होती ! टोब्रूक पडले व २५,००० ब्रिटिश सैन्य शरण गेले, तेव्हा चर्चिल पुन: वॉशिंग्टन येथे रुझवेल्टच्या भेटीसाठी गेलेले होते. त्यांच्या हातात रुझवेल्ट यांनीच टोब्रूक पडल्याची तार ठेवली व ही धक्कादायक बातमी त्यांना कळली. अलेक्झांड्रियावर पाठोपाठ जोराचे हवाईहल्ले होणार, या कल्पनेने तेथील ब्रिटिश आरमार सुवेझच्या दिशेने रस्ता काटत असल्याचे वृत्त अॅडमिरल हारवूड याने पाठोपाठ पाठवले. १५ फेब्रुवारीला ८५,००० ब्रिटिश सैन्य सिंगापूर येथे फक्त सुमारे ३०,००० जपान्यांना शरण जाते व तीन महिने उलटण्यापूर्वी २५,००० ब्रिटिश फौजांना रोमेलच्या ७-८ हजार सैन्याने दाती तृण द्यावे, या घटनांचा अन्वय भयंकर होतो ! राज्यकर्त्यांनी लष्करी पिछेहाटीचे अन्वय व्यवस्थित लावले, तर जनता त्यांच्या पाठीशी उभी राहते, परंतु जनता पाठीत लाथ

घालील, अशीच भीती राज्यकर्त्यांना ज्या देशात उरत नाही, त्यांचे दुर्दैव कोण संभवणार ?

चर्चिल यांना काळजी वाटू लागली – सैन्याचे नीतिधैर्यच खचले की काय ? त्यांनी उद्‌गार काढले – " Defeat is one thing, disgrace is another."

लष्करी पराभव सहन करता येतात, परंतु छी:थू सहन करू नये ! हे नुसते पराभव नव्हते – ब्रिटिश सैन्याची ही जाहीर छी:थू होती. चर्चिल यांनीच स्वत: आत्मपरीक्षण सुरू केले.

त्यांच्यासमोर बसलेले अमेरिकन अध्यक्ष रुझवेल्ट यांनी विचारले – " आम्ही काय मदत करू शकतो ? " (What can we do to help ?)

चर्चिल यांनी लगेच सांगितले –

" आम्हाला मोठ्या संख्येने शेरमन टँक्स् द्या ! "

(Give us many sherman tanks as you can spare & ship them to the middle east as early as possible.)

अमेरिक अध्यक्षांनी 'शेरमन टँक्स्' कारखान्यांतून बाहेर पडताच मध्यपूर्वेकडे पाठविण्याचे आश्वासन दिले, परंतु या भेटीत केवळ लढाईतील लगेच लागणाऱ्या साहित्याचीच चर्चा नव्हती.

## अणुबाँबची तयारी

युद्धाच्या या रणधुमाळीतही " Tube Alloys " या गुप्त नावाखाली ब्रिटिश शास्त्रज्ञ अणुबाँब तयार करण्याच्या दिशेने वाटचाल करू लागले होते. यासंबंधी अमेरिकन शास्त्रज्ञांशी चर्चा करून यापुढील या दिशेचे प्रयत्न अमेरिकेत दोन्ही देशांच्या शास्त्रज्ञांनी चालू ठेवावे, असा महत्त्वाचा निर्णय चर्चिल यांनी घेतला.

अॅटम्‌बॉम्बच्या दिशेने ब्रिटन-अमेरिकेचे प्रयत्न चालू होते, परंतु या दिशेने जर्मन शास्त्रज्ञांनीही बरीच प्रगती केल्याचे वृत्त होते. शेरमन टँक्स् अजून अमेरिकन कारखान्यांतून बाहेर पडलेल्या नव्हत्या. ब्रिटिश सैन्याचे नीतिधैर्यच खचते की काय, या विवंचनेत चर्चिल होते. अशा परिस्थितीत माल्टाचा कवजा करून, रोमेलला पुरेसे शस्त्रसाहित्य व रसद देऊन सुवेझ गाठण्याचा पवित्रा हिटलरने घेतला नाही व लढाईतील अखेरची सुवर्णसंधी गमावली; असेच म्हटले पाहिजे.

चर्चिल अमेरिकेतून मायदेशी परतले व मागे प्रे. रुझवेल्ट व त्यांचे लष्करी सल्लागार यांच्यात मतभेद उडाला. जनरल मार्शल व अॅडमिरल किंग यांना उत्तर आफ्रिकेत अमेरिकन सैन्य उतरविण्याची कल्पना मान्य नव्हती. त्यांचे म्हणणे होते, की अमेरिकेने १९४२ मध्ये प्रथम जपान्यांचा मुकावला केला पाहिजे, परंतु प्रे. रुझवेल्ट यांनी चर्चिल यांच्याशी चर्चा करून ठरवलेला आपला निर्णय फिरवण्यास स्पष्ट नकार दिला...व उत्तर आफ्रिकेत दोस्त सैन्य उतरविण्याची योजना – ऑपरेशन टॉर्च – (Operation Torch) यावर लक्ष केंद्रित करण्याचे हुकूम अध्य-

क्षांनी सोडले. हा चर्चिल यांच्या कर्तृत्वाचाच भाग नाही काय ?


जुलै, १९४२ मध्ये अशारीतीने चर्चिल यांनी दूरगामी महत्त्वाची अशी पावले उचलून, भविष्यात बरेच काही घडेल, असे चित्र मनाशी उभे केलेले असले, तरी प्रत्यक्षात सर्वत्र हिटलरचीच सरशी होती. जूनमध्ये जर्मनांची रशियातील आघाडी पुनः गर्जू लागली. ८ ऑगस्टला मैकोप जर्मनांनी घेतले, परंतु मैकोप सोडण्यापूर्वी रशियनांनी तिथल्या तेलखाणी उद्ध्वस्त करून टाकलेल्या होत्या. स्टॅलिनग्राड हे शहर व्होल्गा नदी व डॉन नदीच्या दुआबात आहे. २३ ऑगस्टला जर्मन सैन्याने स्टॅलिनग्राडच्या उत्तरेस मुसंडी मारून व्होल्गा गाठली होती, तर २५ ऑगस्टला जनरल क्लीस्टच्या टँकस् ग्रोझनी या तेलाच्या मुख्य केंद्रापासून ५० मैलांवर असलेल्या मोझडॉक शहरावर कबजा करून बसल्या होत्या.

कॉकेशसमधील तेलाचा वास आता हिटलरला अस्वस्थ करू लागला. त्याने दक्षिण रशियात सैन्याचे नेतृत्व करणाऱ्या फील्ड मार्शल लीस्ट याला सर्व सैन्य एकत्रित करून ग्रोझनीच्या दिशेने रेटा देण्याची आज्ञा सोडली. व्होरोने ते स्टॅलिनग्राड या ३५० मैलांच्या आघाडीवर हिटलरच्या मदतीस आलेली हंगेरी, रुमानिया, इटली यांची सैन्ये हिटलरने उभी केली होती व कसलेले जर्मन सैन्य कॉकेशस्च्या दिशेने पुढे सरकत होते. हिटलरने या हालचालीत मोठाच धोका पत्करलेला होता. कारण कॉकेशस्च्या दिशेने पुढे पुढे चाललेल्या जर्मन सैन्याची पिछाडी कमकुवत होती व पुढे गेलेले सैन्य रशियन सैन्याने पिछाडीस आघात केला, तर कोंडले जाण्याची शक्यता होती. हिटलरचा धाडसीपणाचा भाग म्हणून हा एक धोका त्याला क्षम्य मानला, तरी २३ जुलैला रशियन सैन्य स्टॅलिनग्राड व कॉकेशस्च्या दिशेने पळत असताना जो दुसरा धोका त्याने पत्करला, तो अखेर जर्मनांच्या अंगाशी आला.

## स्टॅलिनग्राडही नाही, तेलखाणीही नाहीत

स्टॅलिनग्राडच्या उत्तरेस जर्मन सैन्य पोचले होते व स्टॅलिनग्राड यावेळी सहज जर्मनांच्या हाती पडले असते...परंतु " स्टॅलिनग्राड नंतर घ्या व आधी ग्रोझनी या तेलसाठ्याकडे वळा, " हा हिटलरने सोडलेला हुकूम सर्वस्वी चुकीचा ठरला. हिटलरचा तर्क असा होता, की स्टॅलिनग्राड व कॉकेशस् दोन्ही एकाच वेळी सर करता येतील. या आत्मविश्वासावरच त्याने स्टॅलिनग्राडच्या उत्तरेस पुढे गेलेल्या पॅन्झर तुकड्या मागे घेऊन कॉकेशस्च्या दिशेने फील्ड मार्शल लीस्टच्या मदतीला धाडल्या. पंधरा दिवस कॉकेशस्च्या दिशेने रशियन सैन्याशी झुंजीत घालवल्यावर हिटलरला आपली चूक कळून आली आणि या पॅन्झर तुकड्या त्याने फील्ड मार्शल लीस्टकडून काढून पुनः स्टॅलिनग्राडकडे वळवल्या, पण ही पुनः तिसरी चूक ठरली. कारण एकतर आता फील्ड मार्शल लीस्टला कॉकेशसच्या दिशेने पुढे सरकणे अशक्य होऊ लागले व स्टॅलिनग्राडला रशियनांनी आता पक्का मांड मांडण्यात यश मिळविले होते.

हिटलरच्या या चुकीच्या लष्करी निर्णयामुळे थोड्याच कालावधीत जर्मनांच्या




८ जानेवारी १९४३

हे लक्षात आले, की आता कॉकेशस घेणेही शक्य नाही व स्टॅलिनग्राडही पडत नाही. ही पराभूत भावना जर्मन सेनानींच्या मनात घर करू लागताच तिसऱ्या राईशच्या मृत्युघंटेचे टोले जर्मनांना ऐकू येऊ लागले.

१६ जुलैला हिटलरने वरील चुकीचे निर्णय घेण्यापूर्वी युक्रेनमधील हिटलरच्या युद्धछावणीत जर्मन चीफ ऑफ जनरल स्टाफ जनरल हाल्डर याने हिटलरला ही गोष्ट पटविण्याचा आटोकाट प्रयत्न केला, की कॉकेशस व स्टॅलिनग्राड दोन्ही एकदम घेण्याची ताकद जर्मन सैन्यात आता नाही. प्रथम स्टॅलिनग्राडचा कब्जा करू. परंतु हिटलर एकच गोष्ट धरून बसला होता, की रशिया आता संपल्यासारखाच आहे— " Russians are Finished ! "

हिटलर भ्रमात होता. स्टॅलिनग्राडचे मूळचे नाव झारित्सिन (Tsaritsyn) असताना या शहराच्या लढाईत रशियन यादवीयुद्धात स्टॅलिन याने याच रणभूमीवर झारचा सेनापती जनरल डेनिकिन् याचा जो पराभव केला, त्यामुळे झारित्सिनचे स्टॅलिनग्राड झालेले होते. या रणाचा कानाकोपरा स्टॅलिनला माहीत होता. जनरल डेनिकिनच्या सैन्याप्रमाणेच यावेळी जर्मनांनी स्टॅलिनग्राडला वेढा घातला होता व ही लढाई कशी जिंकायची याची रंगीत तालीम यापूर्वीच स्टॅलिनने केलेली होती.

## हाल्डरची हकालपट्टी

कॉकेशसमध्ये ५०,००० रशियन सैन्य होते व जर स्टॅलिनग्राडच्या उत्तरेस १,५०,००० रशियन सैन्य जमा झाले, तर डॉन नदीच्या अंगावरील जर्मन फळी कशी काय तग धरणार, हा प्रश्न हाल्डरला भेडसावीत होता. हाल्डरची आता खात्री झाली होती, की हिटलरचे निर्णय हे आता लष्करी डावपेचांना धरून केलेले तर्कशुद्ध निर्णय राहिलेले नसून, ते एका माणसाच्या 'केवळ लहरी' म्हणून घेतले जाऊ लागले आहेत.... तेव्हा आतापर्यंत हिटलरची सेवा केलेल्या या लष्करी तज्ज्ञ सेनापतीने, त्याला वाटणारा धोका स्पष्टपणे हिटलरला सांगण्याचे ठरवले. "हाल्डर हा पराभूत मनोवृत्तीचा," आहे, हा स्वतःच्या चुका लपविण्यासाठी उपयोगात येणारा शिक्का वापरून अखेर हिटलरने २४ सप्टेंबरला हाल्डरला डिसमिस् केले. यापूर्वीच पंधरा दिवस म्हणजे ९ सप्टेंबरला कॉकेशस घेण्यात हयगय केली, म्हणून फील्ड मार्शल लीस्ट याला गचांडी मिळाली होती. फील्ड मार्शल लीस्टला सेनाधिकारावरून ऐन लढाईत दूर करणाऱ्या फ्यूररचे डोके आता जवळजवळ फिरले आहे, ही गोष्ट हाल्डरने ओळखली व यापुढील वाटचालीत हिटलरची साथ करणे नको, या भावनेने २४ सप्टेंबरला हिटलरला चार परखड शब्द ऐकवण्याचे ठरवले. फील्ड मार्शल लीस्टला दूर करून त्याचे जागी दुसरा जनरल आणूनही भागणार नाही; कॉकेशस व स्टॅलिनग्राड एकदम घेताच येणार नाही, तसा प्रयत्न करण्यात धोका आहे, आत्मघात आहे, हे आपले मन त्याने हिटलरला ऐकवताच २४ सप्टेंबरला फ्रॅन्झ हाल्डरची हकालपट्टी झाली. हाल्डरच्या जागी जनरल झेइटलेर (Zeitzler) याची नेमणूक हिटलरने केली.

जनरल हाल्डर गेला, फील्ड मार्शल लीस्ट गेला, परंतु कॉकेशसच्या व स्टॅलिनग्राडच्या लढाईचे भवितव्य हिटलर बदलू शकला नाही. ऑक्टोबर महिन्यात स्टॅलिनग्राड शहरात खुद्द जर्मन सैन्य शिरले व इमारती-इमारतींसाठी हातघाईचे रणकंदन सुरू झाले. या लढाईत जर्मनांची पिछाडी कमकुवत व अविश्वसनीय होती, तर रशियाने सुमारे १,७५,००० सैन्य या एका लढ्यासाठी एकवटलेले होते. शहराच्या उत्तरेकडील व दक्षिणेकडील बगलांवर जर्मन सैन्याने कबजा केला होता. स्टॅलिनग्राडचा कबजा करण्याचा निकराचा प्रयत्न जर्मन सेनानी पोलस (Paulus) याने चालविला असला, तरी रशियन सैन्य दाद देत नव्हते. १० नोव्हेंबरच्या आत स्टॅलिनग्राड सर करतो, असे पोलस याने हिटलरला आश्वासन पाठवले होते... तर सर्वस्वी खऱ्या अर्थाने "जिंकू अथवा मरू," या निर्धाराने रशियन सैन्य येथे लढत होते. याच लढाईत हिटलरच्या सैन्याचे पेकाट मोडता येईल, असा स्टॅलिनचा हिशोब होता. कारण स्टॅलिनग्राडच्या पूर्वेकडून ठामपणे लढणारे रशियन सैन्य जर जर्मनांना पश्चिमेकडे मागे रेटू शकले, तर जर्मन सैन्याच्या उत्तर–दक्षिण बगला उघड्या पडून जर्मन सैन्यावर मोठेच गंडांतर आणता येईल, या हिशोबाने रशियन

सैन्य लढत होते.

बगला धोक्यात होत्या. असा धोका निर्माण होईल, असा स्पष्ट इशारा हिटलरला हाल्डरने दिलेला होता, परंतु 'होणारे न टळे' या तत्त्वाने हिटलर–स्टॅलिनग्राड पडणारच या इराद्याने हा सर्व धोका पत्करून–पोलसला स्टॅलिनग्राड त्वरित घेण्याचा लकडा लावीत होता.

अपेक्षेप्रमाणे साऱ्या गोष्टी घडणार, या आत्मविश्वासाने हिटलर युक्रेनमधील आपली छावणी सोडून प्रशियातील व्हिनित्सा येथील छावणीत परतला आणि त्याचवेळी फील्ड मार्शल रोमेलच्या रणक्षेत्रावर धक्कादायक गडबड सुरू झाल्याचे वृत्त त्याच्या कानी आले !

**[ अपूर्ण ]**

**[ पुढील अंकी–एल अलेमिनची निर्णायक लढाई आणि स्टॅलिनग्राडची झुंज ]**

## खुलासा

'नाझी भस्मासुराचा उदयास्त' ही लेखमाला 'माणूस' मध्ये जून १९६४ या अंकापासून सुरू आहे. ही लेखमाला असलेल्या 'माणूस'च्या मागील अंकांची अनेक वाचकांकडून सारखी मागणी येत आहे. अंक शिल्लक नसल्याने ही मागणी पुरी करता येत नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

—व्यवस्थापक

## वखवखलेल्या जीवनाचे भेदक चित्रण

' माझ्या कथा कोणत्या आणि मी आजवर अनुभवलेले जीवन कोणते हे मला सांगता येणार नाही. ' लेखकाच्या मा निवेदनाचे प्रत्यंतर प्रस्तुतचा कथासंग्रह वाचताना येते. जळजळीत अनुभवांवर फुललेल्या या कथा भावस्पर्शी आहेत.

कै. बी. रघुनाथांच्या कथा ' स्वप्नाळू ' नाहीत. त्या जिवंत, रसरशीत आहेत. मानवी मनात दडलेले सूक्ष्म अंतर्प्रवाह अत्यंत स्पष्टपणे व प्रभावीरीत्या लेखकाने मांडले आहेत. जे काही सांगावयाचे ते अगदी स्पष्ट नि सरळ निवेदिले आहे. त्यांच्या शैलीला आडवीतिडवी ' वळणे घेऊन फापटपसारा मांडणे ' माहीत नाही. त्यामुळे कथा रेंगाळत नाही. एकदम घुसते.

लेखकाने स्वतःच ' स्वतःविषयी ' असे म्हटले आहे, की " गोष्टीची सुरवात, मध्य, शेवट या विषयावर माझा अभ्यास मुळीच झालेला नाही. मला चांगली वाटली तीच सुरवात ! जिथे कथा संपवाविशी वाटली तोच शेवट !...भरून आलेले मन रिकामे झाल्यासारखे वाटणार नाही, तोवर पात्राच्या, प्रसंगाच्या किंवा दृश्याच्या वर्णनाचा ओघ का म्हणून थांबवावा ? " अशी आहे बी. रघुनाथांची प्रतिमा, स्वैरपणे विहार करणारी !

' हे हाडामासाचे शरीर ' या कथेत लेखकाने चंचलूच्या मनातील नाजूक संघर्षाचे अत्यंत कुशलतेने चित्रण केले आहे. पोटच्या मुलीप्रमाणे वाढविलेल्या चंदीच्या रूपामुळे व तारुण्यामुळे मनावरील ताबा सुटू पाहणाऱ्या चंचलूच्या एका वेगळ्या प्रकारच्या मानसिक संघर्षावर ही कथा उभारली आहे. चंदीची आई गुणी हिच्यावर चंचलूने अपार निरपेक्ष प्रेम केले होते. तिचे दुःख टाळण्यासाठी, तिच्या नवऱ्यासमोर व पंचासमक्ष त्याने तिच्या पोटच्या गर्भाचे जनकत्व मान्य केले होते. शरीरसंबंध घडला नसतानाही तिच्या मृत्यूने तो अत्यंत व्यथित झाला होता. लहानशा चंदीला त्याने लहानाचे मोठे केले, परंतु ती जसजशी मोठी होऊ लागली, तो तो एक वेगळीच भावना त्याला सतावू लागली. यौवनाने मुसमुसलेली चंदी पाहून क्षणाक्षणाला त्याला तिच्या आईची—गुणीची—आठवण येऊ लागली. या परिस्थितीत गोंधळलेल्या त्याच्या मनाची कुतरओढ मोठ्या समर्थपणे लेखकाने उभी केली आहे.

' बेकम सकिना ' या कथेचा शेवट चमत्कृतिजन्य व धक्का देणारा आहे. ' हे असंच होणार होतं, ' ही कथा वास्तवाचे दर्शन घडविते. म्हाताऱ्या पांडू गवळ्याची

लिबासारखी रसरसलेली तरणीताठी बायको 'तान्ही' पाहून यशवंतच्या वासनांचा डोंब उसळतो. आपल्या वासनातृप्तीसाठी तो एकेक पाऊलही उचलतो आणि एके दिवशी तान्ही स्वत:होऊन त्याच्या स्वाधीन होते. याच क्षणासाठी तळमळत असलेल्या यशवंतला प्रत्यक्षात मात्र काहीही करावयाचे धैर्य होत नाही. शेवटी त्याच्याच हाताखालील यासीन चपराश्याबरोबर तान्ही पळून जाते.

साहेबाला लाच मिळालेली शंभर रुपयांची नोट गंगाधरला सापडते, तेव्हा ती पचवून मिळणाऱ्या सुखाच्या तो नुसत्या कल्पना करीत राहतो आणि शेवटी ती नोट परत करतो; मात्र तीच नोट चोरून साहेबांचा नोकर व मजुरीण चैन करतात, हे 'गंगाधर' कथेत दाखविले आहे.

## सारा कठोर व्यवहार

वेश्या, चपराशी, पोलीस, गुंड, फकीर, पानवाले, टांगेवाले इत्यादी समाजामधील सर्व थरांतील माणसांच्या विविध प्रेरणांचे मोठे मार्मिक व भेदक चित्रण त्यांनी केले आहे. प्रतिष्ठित, सुसंस्कृत मूल्यांना या जीवनात काही वाव नाही. तेथे भावनांना विशेष थारा नाही. सत्यं, शिवं, सुंदरं असे काही भव्योदात्त येथे नाही. आहे तो वास्तव, कठोर व्यवहार. त्यात वावरणाऱ्या व्यक्तींच्या व्यथा लेखकाने स्पष्टपणे चितारल्या आहेत.

बाहेरच्या जगात मुक्तपणे संचार करू इच्छिणारी, परंतु रहीमच्या पाशवी वासनेला बळी गेल्यामुळे पंख तुटलेली, असहाय बनलेली 'मुमताज' (निरुद्ध जीवन), स्वत:चे घरकुल असावे, हे आपले स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी कोणाचीही शैय्यासोबत करणारी व शेवटी केवळ कुत्र्यासारख्या वखवखलेल्या वासनांमुळे निराश होणारी कुरूपलेली (कुत्रे), तुरुंगातून सुटलेल्या अलीला जिने आसरा दिला, परंतु जिची शेवटी शोकांतिका झाली ती उल्कत (खाटकाची गाय).

पैशाच्या मोहाने प्रत्यक्ष आईने व जिच्यावर वेश्यापण लादले आहे अशी 'राधा' (काळी राधा) आणि आपल्या बायकोचा राजरोस चाललेला व्यभिचार पाहूनही तिने पळून तरी जाऊ नये, म्हणून स्वाभिमान गिळणारा लंगडा लाला या सर्व व्यक्ती व त्यांची दु:खे अंत:करणाचा ठाव घेणारी आहेत.

लेखकाची शैली धारदार विषयाला एकदम हात घालणारी आहे. उपमा, उत्प्रेक्षा अगदी मोजक्याच पण मार्मिक. उदा.– 'संपत्तीची घुंगरे बांधून मिरवणाऱ्या अभिलाषेला पूर्तीची क्षितिजे' आपणहून सामोरी येतात, 'तिच्या बुबुळांवर पाण्याचा पातळ थर जमला. एखाद्या बिलोरी आरशावर एखादे चित्र काढावे तसे वाटले ते !,' 'सूर्याचे मिणमिणते दिवटे कामांध रजनीच्या धक्क्याने लवंडले की वाढत्या अंधारात...'

संस्कृतप्रचुरतेमुळे काही ठिकाणी क्लिष्टता आली आहे. उदा.– 'आत्मार्पणाच्या औत्सुक्याने द्रुतश्वसन झालेली राधा रम्य कंपनांचे प्रबंध लेवून ठाकली !,'

'एका सुटीचा आरंभ करणारी संध्याकाळ काही मधुरतर कल्पनांचे फटकार घेऊन यशवंताच्या मनाला अस्थिर करती झाली.'

तसेच विनाकारण मराठी शब्दांचे इंग्रजी शब्द देण्याची हौस लेखकांना दिसते. 'वावृच्या मागण्या (Claims) काही पुरवून टाकल्या,' 'संकीर्ण अर्जांची (Miscellaneous applications) एक फाईल...,' 'वरून आलेले तांतडीचे (Immediate) पत्र,' इत्यादी उदाहरणांवरून हे लक्षात येईल.

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत श्री. भगवंत देशमुख यांनी पुढील विधान केले आहे–" 'चक्र' सारख्या कादंबरीतून जे प्रत्ययकारी दलित जीवनचित्रण आज मराठी साहित्यात होत आहे, त्याच्या कितीतरी आधीची ही निर्मिती आहे, याचाही उल्लेख करावासा वाटतो." पण 'चक्र'ची प्रकृती वेगळी आणि या कथांची प्रकृती वेगळी आहे. 'चक्र' मध्ये जीवन मर्यादित आहे ते एका झोपडपट्टीपुरते. व्यक्तीपेक्षा झोपडपट्टीतच तेथे महत्त्व आहे. 'झोपडपट्टी' हा कादंबरीचा नायक आहे. म्हणून दोन्हींची तुलना अप्रस्तुत वाटते.

**अशोक जैन**

[**मिटलेले आकाश** : लेखक : बी. रघुनाथ. मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई ४. किंमत ६ रुपये. पृष्ठे १९२+२८]

४%
बचत खात्यावरील नवीन आकर्षक व्याज.
मुदतठेवींवर-जास्तीतजास्त ७½%
मुदतीप्रमाणें
MB
दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड
657

# गारंबीचा बापू

## दोन प्रतिक्रिया

: १ :

## बापू भेटलाच पण गारंबीही दिसली !

एखादी ललितकृती वाचली, की आपण भारावून जातो. त्या कलाकृतीतील नाजुक मनोव्यथा कुठे तरी घर करून बसतात. आयुष्यात तशीच तीव्र व्यथा कुठे बोचली, की त्या कलाकृतीची चटकन आपल्याला याद येते. स्थलकाल यांच्या बंधनातील असं काहीतरी नातं त्या व्यथेत आणि आपल्याला भेटलेल्या व्यथेत जाणवू लागलं, म्हणजे ते वाङ्मय ' अक्षर वाङ्मया'त जमा होतं. वाङ्मयातील कलागुणात श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरण्यासाठी अशा अनुभवांची याद आपल्याला यावी लागते. ' गारंबीचा बापू ' ही श्री. ना. पेंडसे यांची श्रेष्ठ कादंबरी आता नाट्य-रूपानं पाहात असताना माझ्या मनात वरील विचार आला.

पेंडसे यांनी ' हद्दपार ' आणि ' यशोदा ' या आपल्या दोन कादंबऱ्यांवर यापूर्वी दोन नाटकं लिहिली होती, पण नाटककार म्हणून पेंडसे कुठे तरी उणे पडत होते. कादंबरीत शब्दांच्या माध्यमातून एकामागून एक प्रसंगांच्या, वर्णनांच्या, संवादाच्या शिड्या उभ्या करून गारंबी, हर्णै, दापोली हा परिसर ते स्वच्छपणे डोळ्यांसमोर उभा करीत. त्या सर्व कादंबऱ्यांतून त्यातील व्यक्तीप्रमाणेच त्यातील ' लोकेल ' (घटितस्थळ) हेही एक जिवंत पात्र होतं. किंबहुना त्या ' लोकेल ' च्या दडपणा-खालीच सारी पात्रं वागत होती. त्या ' लोकेल 'चा एक विलक्षण तीव्र असा परि-णाम एकूण एक व्यक्तीवर होत होता. या कादंबरीतील स्थलविषयक वर्णनं आणि स्थलचित्रण यांना वगळणं म्हणजे आत्म्याची देहापासून फारकत करण्यासारखं आहे. आपण जे वाचत असतो वा पाहात असतो, त्या सर्वांठायी ती गारंबी, तिथलं दारिद्र्य, तिथले क्षुद्र आणि व्यवहारी लोक, ढोंगी आणि व्यभिचारी श्रीमंत या साऱ्यांनी एकरूप होऊन आमच्यासमोर प्रकट झालं पाहिजे, हीच आपली अपेक्षा असते. कादंबरीत ते होत होतं. कारण कादंबरीकाराला माध्यमाची तेवढी बंधनं नाहीत. त्या कादंबऱ्यांचं जेव्हा नाट्यरूप झालं, तेव्हा त्या नाटकात एक महत्त्वाचं पात्र यायचं राहून गेलं. ते म्हणजे ' लोकेल !' माणसांच्या हावभावांनी, सेट्स

राधे 'च्या भूमिकेत उषा किरण



— अपरिहार्य तडजोड !

आणि ध्वनी यांच्या मदतीनं, यथान्यास स्वरोच्चारांनी आणि त्याहीपेक्षा त्या ' लोकेल ' च्या अस्तित्वासाठी मुद्दाम योजाव्या लागणाऱ्या प्रसंगांनी ' लोकेल ' सजीव व्हायला हवं होतं. ' यशोदा ' आणि ' राजे मास्तर ' या दोन्ही नाटकांना समर्थ नट, उत्तम दिग्दर्शक आणि मातबर संस्था लाभूनही यश मिळालं नाही, याचं मुख्यत्वेकरून अपयश नाटचरूपांतराच्या रचनेतच आहे. ' राजे मास्तर ' मधे तर ती कथा कोकणात घडते आहे, हे मधूनमधून सांगावं लागत होतं आणि शिवाय त्या नाटकात प्रत्यक्ष काही समरप्रसंग घडण्यापेक्षा पूर्वी होऊन गेलेल्या समरप्रसंगांच्या नाटकी हकीकती होत्या. नाटक हे वर्तमानकाळावर चालतं. भूतकाळ कितीही श्रेष्ठ असला, तरी त्या पुण्याईवर नाटक यशस्वी होऊ शकत नाही. ' यशोदे'ची गत आणखी निराळीच आहे. त्यात ही चूक तर होतीच, पण त्याहीपेक्षा एक आणखी गफलत झाली होती. ज्या यशोदेच्या सौंदर्यानं सारा घात झाला, असं नाटकात वारंवार सांगितलेलं आहे व मावशी कळवळून सांगतात ते सौंदर्य यशोदेत वा नाटकात कुठे जाणवलेलं नाही. नाटकात यशोदेवर काही विचित्र प्रसंग आला आहे, की मावशीवर विचित्र प्रसंग आला आहे, याचा भ्रम उत्पन्न होतो. नाटक ही एक सांघिक कला आहे, हे जर मान्य असेल, तर आपल्याभोवतालची पात्रं काय वकूबाची आहेत, हे त्यानं लक्षात ठेवलं पाहिजे आणि आपल्या अभिनयाची आणि व्यक्तिदर्शनाची उंची त्यांच्याशी जमवून घेतली पाहिजे. संपूर्ण नाटक पाहिल्यानंतर एखाद्याच नटाच्या अभिनयाचा ठसा उमटणं ही दिग्दर्शकाच्या अपयशाची पावती होय.

## एकसंध परिणाम

' गारंबीचा बापू ' हे पेंडसे यांचे नाटक पाहिल्यानंतर एक आनंद झाला. तो एकसंध अभिनयाच्या परिणामाचा. यातील काही नट चित्रपटांतील यशामुळे लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत. डॉ. काशिनाथ घाणेकर यांच्या अभिनयकौशल्याबद्दलही

कोणी तक्रार करणार नाही. मूळ कादंबरीतही राधा आणि बापू या दोन पात्रांना विलक्षण महत्त्व आहे. असे असूनही आपल्या लोकप्रियतेचा किंवा अभिनयश्रेष्ठत्वाचा हट्ट पुरविण्यासाठी या नटसंचानं नाटकावर वा अन्य भूमिकांवर कसलाही अन्याय केलेला नाही. उषा किरण आणि डॉ. घाणेकर यांच्या लोकप्रियतेचा फायदा उठविण्याची दुर्बुद्धी दिग्दर्शक पुरुषोत्तम बाळ यांना झाली नाही, हे केवढे भाग्य! त्यांना कुठेही अवाजवी महत्त्व न देता, किंवा आक्रमक अभिनयास संधी न देता आरंभापासून अखेरपर्यंत त्यांनी संयम राखला आणि नटांनीही त्यांची बूज राखली. साऱ्या पात्रांनी नाटकातील आपल्या स्थानाबरहुकूम आणि दिग्दर्शकांच्या संयमाचा चाबूक पेलून भूमिका वठवल्या. त्यामुळे साऱ्या नाटकाचा ' एकसंध परिणाम ' प्रेक्षकांच्या मनावर उमटला. कोणत्याच नटाला त्याच्या असामान्य ताकदीसाठी अभिनयाची आतशबाजी करू देण्यात आली नव्हती. गल्लाभरू धोरणच ठेवायचं असतं तर नाटककाराला आणि दिग्दर्शकला उषा किरण यांच्या अस्तित्वाचा चुकीचा उपयोग करून घेता आला असता.

कौतुकाची आणखी एक गोष्ट, जी आजवर पेंडशांच्या नाटकात भेटली नव्हती, ती गारंबीही आम्हाला भेटली. शंभर टक्के नाही, पण बरीचशी. काही नाटकाच्या नेपथ्यातून भेटली, काही लकबीतून व शब्दोच्चारांतून भेटली, काही नाटककाराच्या योजकतेमुळे भेटली. ही गारंबीची अनपेक्षित गाठभेट मोठी सुखद होती. कारण आजवर खुद्द पेंडशांनीच आपल्या कादंबऱ्यांची नाट्यांतरे करूनही ती भेटू शकली नव्हती. रंगमंचावर ती प्रविष्ट झाल्याबरोबर प्रेक्षकवर्गाला तिनं भारून टाकलं. गारंबीचं ते दर्शन अशासाठी रोमांचकारी होतं, की रंगमंचातील आणि प्रेक्षागारातील अंतरच लोपविण्याचं काम तिनं केलं. प्रत्येकाच्या अंतःकरणात एक बापू असतो— चटेल, रंगेल, बंडखोर, उपेक्षित. त्या बापूच्या भेटीबरोबर प्रेक्षकांना आत्मीयता वाटू लागली. समोर घडतंय ते आपल्या जीवनातील एका अपूर्णतेचं दर्शन, ही भावना आपोआपच दृढ झाली. ज्या बापूचा शोध करण्यासाठी आपण वेस्टर्न चित्रपट पाहतो, सर्कस पाहतो, रोमांचकारी अद्‌भुत कथा वाचतो किंवा जीवनातही पराक्रम किंवा बंडखोरी करणाऱ्या जवळपासच्या व्यक्तीवर मोहोब्बत करतो, तो बापू आपल्यासमोर एकाएकी उभा राहिला तर आपण आश्चर्यचकित होणार की नाही? त्या आश्चर्याबरोबर सफलतेचा एक आनंदही प्रेक्षकांना मिळाला. डॉ. घाणेकरांच्या डोळ्यातील भाबडेपणा, हळवेपणा, करारीपणा, पराक्रमाची धुंदी आणि अशक्य असं काही नाही, याची खात्री वाटणारा बेबंदपणा, हे सारं खराखुरा बापू उभा करण्यासाठी हवंच होतं. डॉ. घाणेकरांशिवाय अन्य कुणी पर्यायी नट या भूमिकेसाठी तरी उपलब्ध नाही, असं जे मत मी पुरुषोत्तम बाळ यांना पात्रनिवडीच्या वेळी बोलून दाखविलं होतं, ते एवढ्या प्रमाणात खरं ठरेल, असं मात्र मलासुद्धा वाटलं नव्हतं. संभाजीच्या मनोवृत्तीत आणि गारंबीच्या बापूच्या मनोवृत्तीत एक विलक्षण साम्य आहे म्हणून

असेल कदाचित. डॉ. घाणेकर त्या भूमिकेप्रमाणेच याही भूमिकेत इतके रंगले, की स्टेजवर तर ते बापू म्हणून वावरत होतेच, पण रंगपटात आल्यावरही काही काळ ते बापूच्याच धुंदीत होते. या नाटकातले सर्व समरप्रसंग त्यांनाच पेलावयाचे असल्यामुळे त्यांची जबाबदारी मोठी होती. ' राजे मास्तर ' मध्ये राजे मास्तर भेटले नाहीत. ' यशोदे 'मध्ये यशोदा दिसली नाही, पण ' गारंबीच्या बापू 'मध्ये बापू भेटला आणि तो भेटला इतकंच नव्हे, तर तो गारंबीतच भेटला.

**व्यावसायिक तडजोड**

उषा किरण यांचे काम त्यांच्या उमद्या आणि सात्त्विक दर्शनामुळे पुष्कळसं यशस्वी झालं. शृंगाराच्या वेळीसुद्धा त्यांच्या चेहऱ्यावरचा तो उमदा भाव ढळला नव्हता. राधेच्या अंतःकरणातील दुःख जाणवावं, पण चेहऱ्यावर मात्र एक प्रसन्न आक्रमक व्यक्तिमत्त्व उमटावं, ही त्यांची किमया त्यांच्या नैसर्गिक दोषांना झाकू शकली. उषा किरण यांच्यापेक्षा आमच्या मनातली राधा थोडी निराळी आहे. थोडी सळसळणारी आहे. तिचं सौंदर्यही सात्त्विकतेपेक्षा आक्रमक आहे, पण हे जरी खरं असलं तरी उपलब्ध नटीमध्ये राधेच्या जवळपास पोचू शकतील, अशा उषा किरणच आहेत, हेही ध्यानी घेतले पाहिजे. ती भूमिका वाटते तेवढी सोपी नाही. व्यभिचार करूनही तिच्या डोळ्यांत पाप नाही, अशा एका सजाण स्त्रीचे ते चित्रण आहे. कामाग्नी पेटलेला असूनही केवळ धग आहे, धूर नाही, असा मामला चित्रित व्हावयास हवा आहे. उषाकिरण यांचं रंगमंचावरचं अस्तित्व नाट्यपूर्ण वाटतं. त्यांच्या व्यक्तिमत्त्वानं नैसर्गिक प्रतिकूलता झाकली जाते, हें जसं खरं, त्याचप्रमाणे राधेच्या प्रकृतिधर्मातील मर्म त्यांना समजलं असावं, असं सारखं जाणवत होतं. त्या केवळ शब्द बोलत नव्हत्या, तर मूर्तिमंत राधा म्हणूनच जगत होत्या. त्यांचं स्थूलत्व राधेच्या भूमिकेत अपेक्षित असलेल्या चापल्याच्या आड येत होतं, पण राधेच्या भूमिकेसाठी त्यांची निवड ही एक अपरिहार्य तडजोड करीत होती, यात कसलीच शंका नाही.

'गारंबीचा बापू ' या नाटकात अपेक्षित गतिमानता आहे आणि कोणताही प्रसंग अकारण धक्के देत नाही. अर्थात हे एक चढत जाणारं नाटक आहे आणि कसल्याही तत्त्वचिंतनापेक्षा जीवितातील मूर्तिमंत नाट्य बापूच्या, राधेच्या आणि यशोदेच्या रूपानं लेखकाला सांगायचं आहे. गारंबीच्या अस्तित्वाबरोबर जिथे जिथे कुठे दुर्दैवाला बळी पडलेली अभागी स्त्री, त्या दुर्दैवीपणाबरोबर आलेली लाचारी, त्या दुर्दैवातून उत्पन्न झालेला कर्णासारखा पराक्रमी पुत्र आणि जगाच्या विरुद्ध त्यातूनच उद्‌भवलेली बंडखोरी घडत असेल ती ती जागा, ती ती माणसं आपल्या समोर येत राहतात. जगाच्या रंगमंचावर घडत असलेला नित्याच्या अनुभवातला हा प्रसंग आपल्या अवू दृष्टीच्या सोयीसाठी पेंडशांनी गारंबीच्या चौकटीत आणून बसविला आहे आणि म्हणूनच काही विशिष्ट अर्थानं संकुचित असणारा हा

पसारा ती मर्यादा सोडून सुखेनैव कुठेही प्रवास करतो. चांगल्या कलाकृतीचं हे एक वैशिष्ट्य आहे, की ती कृती स्वतःचं जीवन जगतेच आणि व्यापक अशा जीवनाला स्पर्श करते.

## काही गफलती

या नाटकात किरकोळ स्वरूपाच्या काही गफलती राहिल्या आहेत. नाटक जिथे वस्तुतः संपलेलं आहे, तिथून पुढची पाचसात वाक्यं लेखकानं कुठल्यातरी मोहासाठी अकारण वाढविली आहेत. एक तर रंगमंचावरील अत्यंत पलीकडच्या टोकावर जाऊन ती म्हणायची आहेत आणि त्याहीपेक्षा जेथे शब्दांच्या वापराची गरजच उरलेली नाही, अशा वेळेस ती म्हटली गेली आहेत. शब्दांचा अवाजवी वापर हा लेखकानं पराभव मानावयास हवा. त्याचप्रमाणे विठोबाच्या घरातील दोन्ही दारांतून सर्व प्रकारची दूरची किंवा जवळची माणसं ये-जा करीत असतात. त्यांच्या त्या 'एन्ट्रीज' ना आणि 'एक्झिट्स' ना काही नियमच नाहीत. कोकणातील घरं देशावरच्या मानानं कमी बंदिस्त असतात; तरी कोठूनही, केव्हाही कुणी यावं आणि घरातल्या लोकांना चकित करावं, असा मामला तिथेही घडत असणं शक्य नाही. उलटपक्षी कोकणातील माणसांच्या स्वभावाचा विचार करताना नेपथ्यकारानं निर्माण केलेलं घर समर्पक असले, तरी दिग्दर्शकाने मात्र नो एन्ट्रिज् आणि एन्ट्रीज् असे बोर्ड लावायला हवे होते. तीच गोष्ट रावजीच्या हॉटेलची. त्या हॉटेलमध्ये गिऱ्हाईक येण्याच्या वेळेला एक सोवळी बाई येते, तारस्वरात भांडण करते, हीही गोष्ट मला वाटतं अप्रस्तुत आहे. गिऱ्हाईक येण्याच्या वेळेलाच राधा आणि बापू यांचे प्रेमप्रसंग दाखविण्याची पद्धतीही मला गलथानपणाची वाटते. कोकणातील स्त्री-पुरुषसंबंध लक्षात घेता हॉटेलसारख्या चटोर जागेपासून बायका किती दूर राहतात किंवा राहायला हव्यात, याचा दिग्दर्शकानं विचार करायला हवा. त्याऐवजी निदान बंदिस्त अशी हॉटेलला जोडून असणारी एखादी खोली दाखविली असती, तर ते जास्त उचित ठरलं असतं. रंगमंचावर काही गोष्टी दाखवणे अशक्य आहे, याची मला जाणीव आहे. तरीपण चुलीवरून धोतराच्या सोग्याने उतरवावा लागणारा चहा वाफा येण्याइतका गरम असायला पाहिजे. चिलीम ओढायची तर तिच्यातून धूर निघाला पाहिजे, हे सांगण्याची गरज नसावी. अशा अनेक बारीक-सारीक गोष्टींचे तपशील नाटकात राहून गेले आहेत.

नाटकातील दिनकरचं पात्र कादंबरीतील दिनकरच्या पात्रापेक्षा खूपच निराळं आहे आणि चांगलंही आहे. मित्रावर प्रेम करू इच्छिणारा पण प्रत्यक्ष मदत करू न शकणारा, परिस्थितीनं नाडलेला पण तरीही मनानं उदार असा हा सुसंस्कृत माणूस आपल्या भलाईनं प्रेक्षकांच्या जवळ सरकतो. चौथ्या अंकात त्याचे जे परिवर्तन दाखविलं आहे, तेवढेच काय ते खटकते. एक तर हा गृहस्थ या घरातल्या माणसाप्रमाणे तिथे का वावरतो ? आणि जर वावरत असेल, तर भलतेच प्रश्न रावेला का

करतो ? रावेच्या चतुराईनं, निष्ठेनं अखेरी तो तिचा थोरला दीर होतो, ही भूमिका रास्त वाटते; पण रावेची चतुराई मात्र जाणवत नाही. हा दोष चार–दोन सवाल–जबाबांनी भरून काढण्यासारखा आहे. हा प्रसंग एक हुकमी एक्का आहे आणि तो अधिक हृद्य होण्यासारखा आहे.

'गारंबीचा बापू' हे एक उत्तम दर्जाचं नाटक आहे, यात काही शंका नाही. त्यात उणीवा काही नाहीत, असे म्हणता येणार नाही. कुठे नाटकाचा कच्चेपणा आहे, कुठे कोकणच्या परिसराबाबत दिग्दर्शकाचं अज्ञान आहे, तर कोठे व्यावसायिक तडजोड आहे, तर कोठे शिकाऊ नटांची जाणीव आहे. पण हे सारं आहे, ते एका समर्थ नि यशस्वी नाटकात घडलं आहे, हे मात्र विसरता कामा नये. एखाद्या कलाकृतीचा आस्वाद घेताना रसभंग करणार नाहीत, असे दोष त्या कलाकृतीचे वैभव वाढवितात. मला वाटतं, या नाटकाचं असंच झालं आहे. गारंबीचा बापू त्याच्या गुणदोषांसकट प्रेक्षकांना आवडेल.

**ग. वा. बेहेरे**

: २ :

## आता जमले !

गारंबीचा बापू पाहायला जाताना मनात जरा धास्तीच होती. इतक्या उत्कृष्ट कादंबरीला नाट्यरूप देताना पहिल्या तीनही नाटकांप्रमाणेच याही नाटकाची 'अवस्था' होणार नाही ना, असा प्रश्न मनाला भेडसावीत होता. पण विशेष गोष्ट अशी, की पूर्वीच्या तीनही नाटकांपेक्षा हे नवे नाटक कितीतरी पटीने चांगले आहे, परिणामकारक आहे. पेंडसे यांचे त्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.

महापूर, राजे मास्तर, यशोदा या त्यांच्या तीन नाटकांवर घेतले गेलेले प्रमुख आक्षेप म्हणजे-याच कथानकावरील (अपवाद–'महापूर') त्यांनीच लिहिलेल्या कादंबऱ्या जितक्या प्रभावी वाटतात, तितकीच ही नाटके दुबळी वाटतात. कादंबरी वाचताना त्यातील वातावरण, व्यक्ती, प्रसंग यांचा वाचकांच्या मनावर जितका परिणाम होतो, त्याच्या दहा टक्के परिणामही त्या नाटकांतून दिसत नव्हता. बहुतेक सर्व बहारदार प्रसंग मिळमिळीत वाटले होते. या तीनही नाटकांतून महत्त्वाचे प्रसंग फुलविण्याचे कसब पेंडसे यांना साधले नव्हते.

पण पेंडसे यांची जिद्द मोठी दांडगी. 'नाटक जमलेच पाहिजे,' हा निर्धार करूनच जणू त्यांनी हे नाटक लिहिले असावे आणि म्हणूनच त्यांची ही रचना नजरेत भरावी अशीच झाली आहे.

पेंडसे यांचे यावेळी आवर्जून कौतुक करावेसे वाटते ते एवढ्याचसाठी, की गारं-

बीचा बापू या कादंबरीचा पसारा फार मोठा आहे. त्यातील प्रसंग सुसूत्ररूपाने नाटकात रचणे ही गोष्ट कठीण आहे, पण पेंडसे यामध्ये बरेचसे यशस्वी ठरले आहेत. विशेषत: पहिल्या दोन अंकात बापूच्या जीवनातील पूर्वभाग दाखविताना तर त्यांचे कौशल्य चांगलेच नजरेत भरते. त्या मानाने पुढील दोन अंक मात्र कमी पडतात. त्यामध्ये आवश्यक ते महत्त्वाचे प्रसंग नाटचरूपाने प्रत्यक्ष न दिसता केवळ त्यांचा उल्लेख तरी केला जातो, अगर त्यांना पार बगल तरी दिली जाते. साहजिकच पहिल्या दोन अंकांत चढत गेलेले नाटक पुढे पुढे परिणामाच्या दृष्टीने हळूहळू घसरू लागते.

## तिसरा आणि चौथा अंक

जबरदस्त जिद्द बाळगून बापू श्रीमंत होतो, इथून तिसरा अंक सुरू होतो, पण यापुढील दोनही अंकांत त्याने त्यासाठी किती कष्ट केले होते, मिळालेल्या अनुभवाचा किती अक्कलहुशारीने उपयोग करून घेतला होता, या गोष्टीचा उल्लेखही केलेला नाही. त्याचा उल्लेख होता तर तर बापूच्या कर्तृत्वावर साहजिकच प्रकाश पडला नसता का ? पण अपरिहार्यपणे बापूचे व्यक्तिचित्रण परिपूर्ण होत नाही. दिनकरची व्यक्तिरेखाही अशीच एकांगी झाली आहे. नाटकात दिनकर दिसतो तो केवळ बापूला मडाभडा बोलणाराच ! पण त्यामागे त्याला बापूबद्दल वाटणारे अबोल, नितांत प्रेम नाटकातून कुठेही व्यक्त होत नाही. दिनकरच्या मनाचा हा दुसरा महत्त्वाचा कप्पा उघडून दाखविण्यात पेंडसे विसरूनच गेले, असे म्हणायला हरकत नाही. वास्तविक या स्वभावाचे दर्शन घडेल, असा एखादा प्रसंग उभा करणे काही अवघड नव्हते. शेवटच्या दोन अंकांत व्यक्तिचित्रण प्रभावी करण्याबाबत जो ढिलेपणा दिसतो, तसाच प्रसंग निर्माण करण्याबाबतही दिसून येतो. सरपंच हे बापूचे सर्वांत मोठे ध्येय असते. इतर कोणत्याही गोष्टीत एकवेळ हार मानायला तयार असणारा बापू या बाबतीत ठाम उभा असतो, ही गोष्ट नाटकातून प्रभावीपणे दिसत नाही. त्यासाठी बापूचा केवढा आटापीटा होता, पण तेच नेमके उभे केलेले नाही. राधा आणि बापू यांच्या जीवनातील कित्येक प्रसंग कादंबरीत असे आहेत, की जे नाटकात येते तर प्रसंगांची रंगत कमालीची वाढली असती. ते या नाटकात जरादेखील उभे राहत नाहीत. साहजिकच बापूच्या जीवनात राधेला किती अनन्यस्थान होते, त्याची प्रचीती येत नाही. केवळ तिसऱ्या अंकात राधेला बंगल्यात आणावे किंवा नाही, त्याबद्दल त्याच्यात आणि मावशीत झालेला खटका दाखविला आहे, पण तोही नीटपणे न फुलविल्याने योग्य परिणाम साधत नाही. केवळ तेवढ्यानेच बापूच्या जीवनाला वेगळे वळण देणाऱ्या बापूची स्फूर्तिदेवता बनलेल्या राधेचे चित्रण पुरे कसे व्हावे ? त्या बाबतीत निराशा पदरी येते. एकंदरीत तिसरा आणि चौथा अंक पहिल्या दोन अंकांइतके ठसशीत झाले नाहीत एवढेच खरे. —

## शाबास बापू !

कलाकारांच्या अभिनयाचा विचार करायचा तर बापू (काशिनाथ घाणेकर) आणि राधा (उषा किरण) या दोनच प्रमुख भूमिकांचा विचार विशेष अगत्याचा. काशिनाथ घाणेकरांनी संभाजीच्या भूमिकेनंतर बऱ्याच काळाने रंगभूमीवर पाऊल टाकले आणि तितक्याच रुबाबात आणि थाटात ही भूमिका स्मरणीय केली आहे. जणू काही त्यांच्या कणाकणांतून बापू भिनला होता, भूमिकेचा संचार खऱ्या अर्थाने दिसून येत होता. त्यांचा मुद्राभिनय, हालचाली अभ्यासपूर्ण तर होत्याच, पण अत्यंत सहजपूर्ण आणि सुयोग्य होत्या. त्यांच्या ह्या कामाला प्रेक्षक एकदम खुषीची पावती देतो. काशिनाथ घाणेकरांची निवड करण्याबद्दल रंगदर्शनचे चालक अभिनंदनास पात्र ठरले आहेत, पण हेच श्रेय उषा किरण यांच्या बाबतीत मात्र मिळत नाही. बापूइतकीच तोलामोलाची राधेची भूमिका त्यांना द्यावी हेच आधी पटत नाही, कारण त्या आधी दिसल्या फार प्रौढ; कादंबरीत वर्णन केल्या त्यापेक्षाही मोठ्या वाटतात. त्याचप्रमाणे राधेच्या उत्कट भावना, अभिनयातील बारकावे जरूर त्या प्रमाणात व्यक्त करण्यातही त्या कमी पडतात. त्यांच्या अभिनयात अशी एकही जागा नव्हती, की ज्याला प्रेक्षकांनी वाहवा द्यावी. अन्य कलाकार कथानकाच्या दृष्टीने दुय्यम तर खरेच, पण त्यातही मनोहर (दिनकर), प्रभाकर आंबिये (रावज्या) आणि सरस्वती बोडस (मावशी) यांची कामे विशेष नजरेत भरतात. प्रत्येकाने आपले काम उमेदीने आणि आत्मीयतेने केल्याने त्या भूमिका साहजिकच स्मरणीय ठरल्या.

नाटकाचे दिग्दर्शक पुरुषोत्तम वाळ यांनी प्रयोग कसोशीने बसविला तर आहेच, पण ज्या प्रसंगाचे चित्रण लेखनदृष्ट्या सरस झाले नाही, तो रंगवून, परिणामकारक करून त्यांनी आपली चुणूक दाखविली आहे. दुसऱ्या अंकात रावजीच्या हॉटेलात बापूला विठोबाचे भूत दिसते, तो प्रसंग केवळ दिग्दर्शन-कौशल्यामुळेच रंगला आहे. तसेच तिसऱ्या अंकात राधेने बंगल्यामध्ये राहावे किंवा नाही, याविषयी झालेला वादाचा प्रसंग केवळ दिग्दर्शकामुळेच सुसह्य झाला आहे. पात्रांच्या हालचाली रेखीव आणि कौशल्यपूर्ण ठेवून स्टेज नेहमी हलते ठेवण्यातही दिग्दर्शकाची सफाई दिसते. एकंदरीत पेंडशांच्या पूर्वीच्या तीनही नाटकांना मिळालेल्या दिग्दर्शकांपेक्षा यावेळचे दिग्दर्शक पुरुषोत्तम वाळ अधिक यशस्वी ठरले आहेत.

श्याम आडारकर यांचे नेपथ्यही नजरेत भरणारे आणि वास्तव होते. विशेषत: रावज्याच्या हॉटेलचा सेट झकास जमला होता. प्रेक्षक निहायत खूष झाले, याबद्दल वाद नाही. दीपयोजनाही कौशल्यपूर्ण होती.

**सुधीर दामले**

## □ दर मिनिटास २० हजार पुस्तकांचे प्रकाशन

व्हिएटनाम, अल्जीरिया, सिंगापूर-मलेशिया यापेक्षा एक अगदी वेगळी समस्या आज जगापुढे 'आ' वासून उभी आहे. ही समस्या रोज वाढत असलेल्या ज्ञानामुळे निर्माण झाली आहे. दिवसेंदिवस शास्त्रीयज्ञानाची निर्मिती फार मोठ्या प्रमाणात होत असून, हे ज्ञान साठवून ठेवावयाचे कसे याची विवंचना आता शास्त्रज्ञ करत आहेत.

अमेरिकेतील नॅशनल सायन्स फौंडेशनने नुकत्याच केलेल्या एका पाहणीत जगात शास्त्रविषयक एक लक्ष मासिके प्रसिद्ध होत असतात, असे निष्पन्न झाले आहे.

यु. एस्. नॅशनल ब्यूरो ऑफ स्टॅंडर्डसने केलेल्या पाहणीनुसार जगात केवळ इंजिनीयरिंग व भौतिकी-शास्त्राविषयक सुमारे ३५,००० मासिके प्रसिद्ध होत असतात. या मासिकांतून प्रतिवर्षी सुमारे दहा लाख प्रबंध प्रसिद्ध केले जातात. आर्थिक शास्त्राचे महत्त्वही दिवसेंदिवस अधिक वाढत असून, वर्षाकाठी या शास्त्रविषयक ४५,००० कागदपत्रे प्रसिद्ध होत असतात. भारतात १९५५ साली शास्त्रविषयाला वाहिलेल्या मासिकांची संख्या २५० होती. आज दहा वर्षांनी ती ७५० वर जाऊन पोहोचली आहे.

असा हा ज्ञानाचा ओघ अव्याहतपणे वाहतो आहे. 'अनंत हस्ते' कमलावराने ज्ञान निर्माण होत आहे, पण ते ठेवायचे कोठे याचीच चिंता पडली आहे. जगाच्या इतिहासात आतापावेतो नव्हते एवढे शास्त्रज्ञ सध्या जगात असून, त्यांतील ९० टक्के शास्त्रज्ञ काम करून रोज काहीतरी लिखाण प्रसिद्ध करत असतात. दिवसेंदिवस वाढणाऱ्या लोकसंख्येप्रमाणे ज्ञानही सारखे प्रचंड वेगाने वाढत आहे. फरक एवढाच आहे, की आपल्याला अधिक माणसे नको आहेत, पण अधिक माहिती मात्र हवी आहे.


या प्रश्नात दोन बाबींचा समावेश आहे. एक म्हणजे हे ज्ञान जपून ठेवावयाचे कसे व दुसरे कमीत कमी वेळात आवश्यक ती माहिती या ज्ञानाच्या महासागरातून नेमकी काढावयाची कशी. शास्त्रज्ञ, सरकार, विविध संस्था यांना या गोष्टीची जाणीव झाली असून, त्या दृष्टीने प्रयत्नही चालू आहेत.

### प्रबंधांचा पाऊस

पहिला प्रश्न येतो तो प्रसिद्ध झालेले ज्ञान साठविण्याचा. मासिकांची संख्या कमी असणे व त्याचा आकार लहान असणे हे यात एक उत्तर असू शकेल. परंतु प्रत्यक्षात मात्र दरमहा नवनवीन मासिकांची सतत भर पडत असते. त्यामुळे मासिकांचे आकार कमी झाले असले तरी संख्या वाढत असल्याने प्रसिद्ध झालेल्या ज्ञानात मोठी भरच पडत आहे. शास्त्रीय ज्ञान त्वरित प्रसिद्ध होऊन ते संबंधितांना समजावे, एवढ्या

एकाच उद्देशाने शास्त्रीय मासिकाच्या संपादकावर प्रबंधांचा पाऊस पडत नसतो. तर त्याचबरोबर काही व्यक्तिगतही कारणे असतात. शास्त्रज्ञदेखील शेवटी हाडामासाची, राग-लोभादि भावना असलेली माणसे असतात. आपण लिहिलेले प्रसिद्ध व्हावे, अशी साहजिकच प्रत्येकाची इच्छा असते. तसेच ज्याचे लिखाण जास्त प्रसिद्ध झाले आहे, अशाला इतरांपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त होते व त्याचा दर्जाही वाढतो. त्यामुळे विविध लिखाणांचा संपादकांवर अक्षरश: पाऊस पडत असतो.

संपादकमहाशय अगदी वेगाने संपादनाची कात्री लिखाणास लावत असल्याने




"आश्चर्य आहे ! अरे रोज रोज हीच बत्ती का बिघडते ?"

मजकूर कमी होतो, तरीदेखील एवढयाने काही प्रसिद्धीचा खर्च कमी होत नाही!

या दृष्टीने कमीत कमी शब्दांत मजकूर लिहिता यावा म्हणून संक्षिप्तरूपांचा वापर करण्याचे प्रमाण भरमसाट वाढले. संक्षिप्तरूपाचे मूळ रूप काय, हे देण्यासाठी आणखी कागद खर्चण्याची भीती निर्माण झाली आहे.

'मायक्रो–फिल्म'च्या सहाय्याने ज्ञान जतन करून ठेवण्याची सोय आहे, हे सर्वश्रुत आहेच. आता मायक्रो–पुस्तकेदेखील तयार करता येतील. ओहियो संस्थानातील कोलंबस येथे भरलेल्या शास्त्रज्ञांच्या बैठकीत ही कल्पना मांडण्यांत आली. त्यानुसार पुस्तके, मासिके व वर्तमानपत्रे काहीशा पारदर्शक कार्डावर छापावीत. त्यामुळे २५० पानांचे सबंध पुस्तक केवळ ३" × ५" या आकाराच्या चार कार्डांवर छापता येईल. या प्रक्रियेमुळे दर मिनिटास २०,००० पुस्तके प्रसिद्ध करता येतील.

हॉर्वर्ड विद्यापीठातील प्राध्यापक जेरॉल्ड हॉर्टन यांच्या मते वीस वर्षांनंतर सर्वसाधारणपणे सध्याच्या दुप्पट वाचन शास्त्रज्ञांना करावे लागेल. जो जो ज्ञानाचा पसारा वाढतो आहे, तो तो त्यातून गरजेपुरते ज्ञान निवडून काढावयाचे कठीण होत आहे.


हे ज्ञान साठविण्यासाठी गणनयंत्रांचा (कॉम्प्यूटर्स) फार मोठा उपयोग होणार आहे. कार्ड व चुंबकीय टेपच्या सहाय्याने ज्ञानाचा फार मोठा साठा ही यंत्रे करीत आहेत. अवाढव्य ज्ञान या यंत्रांत कोंबून आपल्याला हवी ती माहिती क्षणार्धात देणारी यंत्रेही बनविण्यात आली आहेत. तांत्रिक प्रयोगशाळांतून या गणनयंत्राच्या वापरास आरंभही झाला असून, त्यांची संख्या वाढत आहे.

विविध कारखान्यांच्या कचेऱ्यांतून लांबलचक मोठ्या फायलींतून काय नोंदी केल्या आहेत, हे क्षणार्धात पडद्यावर दिसू शकेल, अशी सोय एका गणनयंत्राच्या सहाय्याने करण्यात आली आहे. त्यामुळे कागदपत्रांचा रोज जमणारा गठ्ठा बऱ्याच प्रमाणात कमी होईल. काही दिवसांनी 'टेलिफोन'इतकीच या यंत्रांची आवश्यकता निर्माण होईल. 'पुस्तक' ही वस्तू तर इतिहासजमा होऊन, ग्रंथालयांतून या यंत्रांच्या सहाय्याने सर्व काही पाहता येईल. या यंत्रांमुळे भाषांतर करण्याची सोयही लौकर होणार आहे. • • •

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्त मंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.



# पंजाब नॅशनल बँक

## तुमचा पैसा

सावधगिरीनें सांभाळते,

**सुरक्षित** ठेवते.

Pr 6527/Mar/Ad/2

MANOOS (Fortnightly) : 1 Sept. 1965 : 30 Paise : Regd. No. B 9304

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

# स्वस्तिक

## चप्पल्स



Parkerson/...

स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**